ध्ये-जवळकर.

९५२८
म. ग्रं. सं. ठाणें
विषय
सं. क्र.

REFBK-0003322

प्रकाशक

अच्युत बळवंत कोल्हटकर.

# जेधे-जवळकर.

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे,
अनुक्रम.......................... वि. ..........................
क्रमांक .......................... नों. दि. ..........................

प्रकाशक,

अच्युत बळवंत कोल्हटकर,

मार्कर बिल्डिंग, खेतवाडी मेनरोड, मुंबई नं. ४.

REFBK-0003322

म. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3322
संग्रह शाखा (स्थळ प्रत)

१९२७

किंमत ८ आणे.

प्रकाशक,

**अच्युत बळवंत कोल्हटकर,**

मार्कर बिल्डिंग, खेतवाडी मेनरोड, मुंबई ४.

मुद्रक,

**माधवराव पांडुजी बनकर,**

लक्ष्मी वैभव प्रेस, प्रार्थनासमाजसमोर, मुंबई ४

# सप्रेम समर्पण.



**श्री. गोविंदराव यशवंतराव शिंदे.**

स्वपराक्रमानें ऊर्जितावस्थेस येऊन आपण आपल्या वैभवाचा उपयोग इतरांना वर आणण्याकडे केलांत याबद्दल हें पुस्तक आपणांस अत्यंत आदरानें व प्रेमानें अर्पण केलें आहे.

आपला,

**अच्युत बळवन्त कोल्हटकर.**

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

## प्रस्तावना

हें पुस्तक प्रकाशित करण्याची सुसंधि मला मिळाली ही खरोखरच आनंदाची गोष्ट होय. श्री. **जेधे-जवळकर** ह्यांपैकीं श्री. **जेधे** ह्यांची आणि माझी ओळख फार पूर्वीची नाहीं आणि जी झाली तीही श्री. **जवळकर** ह्यांनींच करून दिली. श्री. **जवळकर** ह्यांची ओळख मात्र फार वर्षांपासूनची आहे. विशेष सांगण्यासारखी गोष्ट म्हणजे ही ओळख झाल्यापासून दोघांवरतीहि निरनिराळे प्रसंग आले आणि त्यांपैकीं कांहीं असे आले कीं ज्यांत पाताळाचें तारू अस्मानांत आणि अस्मानाचें तारू पाताळांत गेलें. पण ह्या सर्व वादळांतून ती ओळख कायम राहिली—वाढीला लागली—अकृत्रिम स्नेहांत रूपान्तर पावली. हें रूपान्तर नक्की कधीं झालें हें ठरवितां यायचें नाहीं. कोणत्या घुसळण्यास ताकाचें लोणी व्हायला लागतें ह्यांतलाच हा प्रश्न आहे—पण परिस्थितीच्या घुसळण्यांनीं आमची ओळख तुटली नाहीं हीच कायती महत्त्वाची गोष्ट आहे. ती वाढतच गेली व तिला खरोखरच ताज्या शुद्ध लोण्याचें रुचकर स्वरूप आलें. दुर्दैवानें माझे आणि रा. रा. **जवळकर** ह्यांचे कार्यपरिघ निराळे आहेत आणि ते असे आहेत कीं, त्यांत अगदीं परस्पर विरुद्ध गोष्टीं चाललेल्या असतात. लो. **टिळक** ह्यांचेवर अलोट प्रीति व भक्ति हा माझ्या आयुष्यपरिघाचा मुख्य विषय आहे. त्यांच्याशीं झालेल्या घनघोर रणसंग्रामानें त्या प्रीतीची व भक्तीची एक वीट देखील ढांसळली नाहीं. जवळकर हे ह्याच्या अगदीं विरुद्ध वातावरणांत वावरत असतात. **टिळक** हें नांव तिथें अगदीं वावडें असतें ! तें किती वावडें असतें हें सांगायला नकोच ! **देशाचे दुष्मन्** हें पुस्तक लिहिणारे रा. रा. **जवळकर**च होत एवढी आठवण दिली म्हणजे टिळकप्रेमाच्या अंशाचीहि कुणी आरोप करील असें वाटत नाहीं.

परंतु कार्याचे परिघ इतके विरुद्ध असतांहि रा. रा. **जवळकरांचें** आणि माझें सख्य टिकून राहिलें आहे. एवढेंच नव्हे ते सख्य वाढतें आहे–घटतें नाहीं. माझी बालंबाल खात्री आहे कीं माझेवर बरावाईट प्रसंग आल्यास रा. रा. **जवळकर** ह्यांच्या डोळ्यांत चटकन् पाणी येईल. माझ्यावर ते अंतःकरणपूर्वक प्रेम करणारे आहेत–आणि त्याचें कारण असें कीं त्यांना अंतःकरण आहे. **सत्यशोधक** समाज किंवा इतर समाज, **सत्यशोधक** चळवळी किंवा इतर चळवळी, ह्यांच्यांत आज शेंकडों, हजारों, लोक वावरत आहेत. पण त्यांत अंतःकरणाचीं माणसें थोडीं आहेत. कांहीं लोक तर खरोखर असे सांपडतील कीं ज्यांना अंतःकरणच नाहीं. अंतःकरण नसतांना चळवळ सुरू झाली म्हणजे तिला यश येत नाहीं. जवळकरांसारखें अंतःकरण त्यांत ओता म्हणजे यशाला कांहीं तोटा नाहीं.

अंतःकरण हा **जवळकरांचा** मोठा गुण आहे. किंबहुना **जवळकर** हे अंतःकरण आहेत. त्यांच्या शरीराचा बांधा–त्यांची बुद्धि–त्यांची कल्पकता–छे, त्यांचें अंतःकरण बघितलें म्हणजे ह्यांपैकीं कशाकडेहि लक्ष्य जात नाहीं. असें वाटतें कीं ते अंतःकरणाचे केलेले आहेत–अंतःकरणाचे बनविलेले आहेत. ते बोलतात ते त्यांचे बोल नसून त्यांचें अंतःकरण बोलत असतें–ते चालतात तो त्यांचा देह चालत नसून त्यांचें अंतःकरण चालत असतें. अंतःकरणाचा एवढा माणूस दुसरा क्वचित् असेल आणि म्हणूनच त्यांच्याकडे अंतःकरण ओढतें. ज्याला मन म्हणून आहे तो त्यांच्यापुढें विरघळतो. त्यांच्या अंतःकरणाचा हा परिणाम एवढाच होत नसून फार पुढें जातो. रा. रा. **जवळकर** हे **सत्यशोधक** चळवळीला मिळाल्यापासून ती फार वाढली ही गोष्ट सर्वांस माहीतच आहे. जर कुणाला असें वाटलें असेल कीं, कै. श्री. **शाहूमहाराज** ह्यांचा आधार होता तोंपर्यंतच रा. रा. जवळकर ह्यांची फुशारकी होती तर तोहि भ्रम आतां गेला असला पाहिजे. कारण रा रा. **जवळकर** हे खरे प्रसिद्धीस आले ते शाहूमहाराजांच्या स्वर्गवासानंतरच आले. शाहूमहाराजांच्या

नंतरच त्यांची खरी चळवळ झाली. शाहूमहाराज होते तोंपर्यंत **सत्यशोधक** चळवळीचें केंद्र पुण्यास नव्हतें. तें कोल्हापुरांत होतें. पण पुण्यांतली त्यानंतरची दंगल जवळकरांच्यामुळेंच उद्भवली. जवळकरांनींच एकामागून एक नवीं पुस्तकें काढून सरकारला दमविलें. सत्यशोधक समाजाचे लाख अनुयायी करण्याची महत्त्वाकांक्षी कल्पना जवळकरांचीच आहे व सत्यशोधक समाजाचे दौऱ्यामागून दौरे जे निघाले त्यांत व्याख्यानांचा पाऊस जर कोणी पाडला असेल तर तो जवळकरांनींच पाडला.

ह्या सर्वांस कारण जवळकरांचें अन्तःकरण ! जवळकरांचें अन्तःकरण फार तीव्र आहे-फार चपळ आहे-फार कळकळणारें आहे-फार जळजळीत आहे. त्यांस अन्तःकरण हा एकच देह आहे. त्यांना दुसरा देह नाहीं. त्यामुळें आज सत्यशोधक चळवळ ही चळवळ राहिलेली नसून हें अन्तःकरण झालेलें आहे. **सत्यशोधक** चळवळीचें तें पूर्वीचें रूप गेलें. आतां डाळिम्बीच्या दाण्यासारखीं टवटवीत तरुण माणसें सत्यशोधक चळवळींत जवळकरांच्या आसपास बघितलीं म्हणजे कौतुक वाटायला लागतें. मनुष्य सत्यशोधक समाजाच्या कितीहि विरुद्ध असला तरी त्याची कुतूहलबुद्धि जागृत होते.

अगदीं सुरवातीपासून **सत्यशोधक** चळवळीचा इतिहास घेतला तरीहि असें दिसून येतें कीं सत्यशोधक चळवळ म्हणजे फक्त अन्तःकरण आहे. ज्या वेळीं कै. ज्योतीबा फुल्यांनीं ती काढली त्या वेळीं तिला कोणतें बळ होतें ? तिला काय त्या वेळीं **शाहुमहाराजां**प्रमाणें राजाश्रय होता कीं **भास्करराव जाधवां**प्रमाणें बुद्धीचा पाठिंबा होता कीं मद्रास ब्राह्मणेतरांप्रमाणें विस्ताराचा आधार होता ? गरीब बिचारा ज्योतीबा व त्याचे गरीब बिचारे भक्त ही चळवळ कशीतरी धडपड करून चालवीत होते. त्यांना कुणी विचारीत नव्हते व तेहि कुणाला विचारीत नव्हते. त्या वेळीं अन्तःकरणाचें बळ हें एकच बळ ह्या चळवळीला होतें. ह्या बळावर ती टिकली, ह्या बळावर ती जिवन्त राहिली.

ज्योतिबांचे नंतर जिव्हाळ्याच्या कांहीं लोकांनीं ही चळवळ कांहीं दिवस चालविली. पण पुढें कांहीं काळ असा आला कीं ज्या वेळीं हा जिव्हाळ्याचा ओघ तुटला. सत्यशोधक चळवळ अजीबाद बन्द झाल्याचा हा समय होय. सत्यशोधक चळवळीचें नांवदेखील ह्या अवधींत उरलेलें नव्हतें व ही चळवळ अजीबाद बुडाली असाच सर्वांचा समज होता. असा हा काळ सुमारें दहा किंवा पन्धरा वर्षांचा असावा. एखाद्या झोंपडींत किंवा एखाद्या लहानशा " हॉल " मध्यें त्या वेळीं ज्योतीबा फुल्याचें कुणी तुणतुणें वाजवीत असेल तर कुणास ठाऊक ! पण सररहा म्हणायचें म्हणजे कै. **आगरकर** ह्यांचें नांव ज्याप्रमाणें मध्यन्तरीं दहा पन्धरा वर्षें अजीबाद बन्द झालेलें होतें त्याप्रमाणें कै. ज्योतीबा फुले ह्यांचेंहि नांव मध्यन्तरी नाहींसें होऊन गेलेलें होतें.

ह्या लाजीरवाण्या स्थितींतून सत्यशोधक चळवळ पुन्हां सुरू झाली ती श्री **शाहु** महाराजांच्या काळांत सुरू झाली. किंबहुना कारंजांत थोंपवून धरलेलें पाणी ज्याप्रमाणें जास्त जोरानें वर उडायला लागतें त्याप्रमाणें मध्यन्तरींच्या दहा पन्धरा वर्षांच्या विश्रान्तीनन्तर शाहुमहाराजांच्या प्रोत्साहनानें ती एकदम जोरानें फोंफावली. कोणी त्याला वावटळ म्हणायला लागले, कोणी त्याला टोळधाड म्हणायला लागले, कोणी त्यांना छापे आणि मोहिमी ह्यांचें रूप दिलें. एवढें खरें कीं ह्या काळांत ती एकदम जाणवूं लागली. सातारा प्रांतांत तर **सत्यशोधक** हा शब्द भीतिवाचक वाटायला लागला. **बोलशेव्हिक** म्हणजे ज्याप्रमाणें अक्राळविक्राळ व भयानक व्यक्तीची मूर्ति आपणांपुढें उभी रहाते, त्याप्रमाणें ह्या काळांत **सत्यशोधक** मनुष्याविषयीं लोकांची कल्पना झाली. त्याला लोक भ्यायला लागले, वचकायला लागले.

पण ह्याचेंहि कारण शाहुमहाराजांनीं ह्या चळवळींत अन्तःकरण ओतलें. शाहुमहाराज हे आंतल्या गांठीचे, पाताळयंत्री वळणाचे व वस्तादगिरींत मुरलेले असे मुत्सद्दी होते अशी अनेकांची समजूत आहे व शाहुमहाराजां-

विषयीं आदर असलेले लोकहि ही समजूत धारण करतात. पण त्यांस हें माहीत नाहीं कीं जिथें मुत्सद्देगिरीची सांचवणी असते तिथें अन्तःकरणाची पुष्करिणी कोरडी ठणठणीत पडते. मुत्सद्देगिरी व अन्तःकरण ह्यांची संगति फारच क्वचित् असते. कै. शाहुमहाराज ह्याच थोड्या पुरुषांपैकीं होते. परन्तु एवढें खरें कीं राजर्षि शाहुमहाराजांची तुफानी मुत्सद्देगिरी आणि अंतःकरणाचा अथांग रत्नाकर या चळवळीला मिळाला नसता—राजर्षि शाहूसारखी प्रेमळ माउली या चळवळीचे लाडकोड करवावयाला लाभली नसती, राजर्षि शाहूसारखा मी मी म्हणणारांना चारी-मुंडी चीत लोळवणारा बहाद्दर मुत्सद्दी या चळवळीला लाभला नसता तर ही सत्यशोधक चळवळ प्रार्थनासमाजासारखी पंगु किंवा मवाळ सुधारकांसारखी एकलकोंडी बनली असती.

म. जोतिबाच्या वेळेस या चळवळीचा चोहोंकडून उपहासच होत होता. ज्या त्या विद्वानानें उठावें आणि फुल्यांचा उपहास करून आपली विद्वत्ता दाखवावी, ज्या त्या माणसानें उठावें आणि म्हणावें "अरे हे पहा वर्णसंकर करणारे, महाराच्या हातचें अन्न खाणारे". ही निंदा, हा उपहास आज निंदा किंवा उपहास राहिला नाहीं "मी कोणत्याहि मनुष्याच्या हातचें अन्न खाण्यास तयार आहें" असें पन्नास वर्षांपूर्वी गर्जून सांगणाऱ्या जोतिबाची त्या वेळच्या सर्व पत्रांनीं टवाळी केली, ज्योतिबावर जेवढे म्हणून वाक्प्रहार करतां येतील तेवढे केले. हे वाक्प्रहार करणारे व उपहास करणारे दुष्ट लोक होते असें समजण्याचें कारण नाहीं. ज्योतिबांच्या या कृत्याबद्दल त्यांना दोष देणारे जसे हजारों ब्राह्मण होते तसे हजारों ब्राह्मणेतरहि होते. हिंदुधर्माच्या भवितव्यतेचा विचार करून त्यांत पाहिजे त्याच सुधारणा सुचविण्याची दूरदृष्टि सगळ्याच सामान्य माणसांना फुटूं लागली तर मग ज्योतिबांना तरी जन्म घेण्याची काय जरूर होती ?

ज्योतिबा फुले ह्यांस ख्रिस्ती म्हणणारे अजूनहि कांहीं लोक आढळतात. खरोखरच मला जर कोणत्याहि गोष्टीबद्दल अत्यन्त दुःख होत असेल तर तें

ह्याच गोष्टीबद्दल होय. ज्योतिबा देव नव्हते, ते माणूसच होते आणि त्यामुळें त्यांच्या हांतून चुक्या झाल्या नसतील किंवा झाल्या नाहींत असें कुणीहि म्हणूं शकणार नाहीं. ज्योतिबा फुल्यांनीं लिहिलेले कांहीं लेख मलाहि अत्यन्त नापसन्त आहेत. परन्तु हे लेखच काय, ज्योतिबा फुले ह्यांनीं लिहिलेली ओळन्ओळ किंवा शब्दन्शब्द कुणाला नापसन्त असला तरी त्यांचें अन्तःकरण कुणालाहि विसरतां यायचें नाहीं. परमेश्वर देखील अन्तःकरण बघतो–शब्द बघत नाहीं. मग आपण आपल्या देशबांधवांसंबंधानें तेवढें करावयास तयार असूं नये काय ?

राखावीं सकलांचीं अंतरें ।
भाग्य येतें तदनंतरें ॥

हा श्रीसमर्थ **रामदास** ह्यांचा अमोलिक उपदेश आपण नेहमीं पाठ करतों–उध्दृत करतों–मग ज्योतिबा फुल्यांसंबंधानेंच आपली इतकी अनुदारवृत्ति कां असावी कीं त्यांचें अंतःकरण आपल्याला पारखतां येऊं नये ?

ज्योतिबा फुले ह्यांना ख्रिस्ती म्हणविणारे लोक हें विसरतात कीं ख्रिस्ती झालेल्या मनुष्यांची यादी असते व ती यादी ख्रिस्ती धर्मालयांत ठेवलेली असते. ज्योतिबा फुले ज्या काळांत जन्माला आले तो काळ असा होता. ज्या वेळीं ख्रिस्ती धर्म आणि हिंदु धर्म ह्यांची झटापट चाललेली असे व जर्मन् युद्धाप्रमाणें प्रत्येक पक्षानें पाडाव केलेल्या माणसांचीं नांवें मोठ्या गर्वानें जाहीर करण्यांत येत असत. ज्योतिबा फुले हे त्यावेळचे एक जग-जाहीर गृहस्थ होते. निबन्धमालाकार–जे लुंग्यासुंग्या प्रतिपक्षाकडे कधीं ढुंकूनहि पहायचे नाहींत–त्यांनीं ज्याच्यावर लेखणी उचलली तो पुरुष सामान्य नव्हता ही गोष्ट अगदीं उघड आहे. असा पुरुष जर खरोखर ख्रिस्ती झाला असता तर ख्रिस्ती समाजास त्या वेळीं केवढा विजय वाटला असता ! त्यांनीं ही गोष्ट निशाणें आणि पताका लावून प्रसिद्ध केली असती. परंतु आपण ज्योतिबांस ख्रिश्चन् केलें किंवा ज्योतिबा आपले चर्चमध्यें येऊन ख्रिश्चन् झाले असें म्हणण्यास त्या वेळींहि कुणी ख्रिश्चन् मिशन् तयार झालें

नाहीं व अजूनहि कुणी तयार होत नाहीं. ज्योतिबा खिश्चन् नव्हते हें सिद्ध करण्यास यापेक्षां ज्यास्त पुरावा कोणता ?

**ज्योतिबा फुले** ह्यांनीं जर एखादी गोष्ट केली असेल तर ती एवढीच कीं त्यांनीं **सत्यशोधक** समाज काढून खिस्ती धर्माच्या प्रसारास आळा घातला. एंजिन्मध्यें वाफ अतिशय झाली ह्मणजे ती बाहेर सोडण्यासाटीं एखादा मार्ग ठेवण्याची यंत्रचालकांची पद्धति आहे. असा मार्ग न ठेवल्यास तें एंजिन् बिघडतें व फुटतें. हिंदुधर्म हा परमश्रेष्ठ, परमउच्च व स्वातंत्र्यमय आहे ही गोष्ट खरी आहे, परंतु ज्योतिबा 'फुले ह्यांचे काळांत त्याचें आवार इतकें कांटेरी झालेलें होतें कीं त्यांतून' स्वतंत्र हवेंत बाहेर पडण्याची शेंकडों किंबहुना हजारों जीवांस इच्छा होत होती. ह्या वेळीं हिंदुधर्म टिकविण्यास एकच उपाय होता आणि तो उपाय ह्मटला ह्मणजे हिंदुधर्माचें आवार मोटें करणें हाच होय. हा उपाय त्या वेळीं **परमहंस** मंडळीनें अमलांत आणला, हा उपाय त्या वेळीं **ब्रह्मसमाज** व **प्रार्थनासमाज** ह्यांनीं अमलांत आणला, हा उपाय त्या वेळीं **स्वामी दयानंद** ह्यांच्या **आर्यसमाजानें** अमलांत आणला, हा उपाय त्या वेळीं ज्योतिबा फुले ह्यांच्या **सत्यशोधक** समाजानेंहि अमलांत आणला. हिंदुधर्माच्या सांचलेल्या वाफेला वाव करून द्यायला जर इतक्या धर्मचालकांनीं प्रयत्न केले नसते तर हिंदुधर्माचा बॉयूलर त्याच वेळीं फुटून गेला असता ! ह्यांपैकीं **ब्रह्मसमाज** आणि **आर्यसमाज** ह्यांचे इतिहास लिहायला व गोडवे गायला मोठमोठीं माणसें पुढें आलेलीं आहेत. **परमहंस** मंडळी व **प्रार्थनासमाज** ह्यांचा इतिहासहि श्री. द्वारकानाथ गोविंद वैद्य ह्या विद्वान् व विवेचक लेखकानें नुक्ताच सुरस मराठी भाषेंत उतरलेला आहे. **सत्यशोधक** समाजाचा इतिहास लिहायला मात्र कोणी नाहीं. त्याचें कार्य लोकांकडून पारखलें व वाखाणलें न जातां वाऱ्यावरच पडलेलें आहे !

पण असें जरी आहे तरी त्याची कामगिरी कमी महत्वाची आहे असें नाहीं. माझी खात्री आहे कीं **सत्यशोधक** समाज जर त्या वेळीं

निघाला नसता तर जनसमुदायापैकीं हजारों लोक ख्रिश्चन् धर्मांत शिरले असते. क्रिकेटची ' प्रॅक्टिस ' चालली असतां चेंडू ठराविक हद्दीचे बाहेर जाऊं नये ह्मणून जसें एक " नेट् " ठेवलेलें असतें किंवा सर्कशींत उंच खांबाच्या वरील टोंकाशीं दोरींत पाय अडकवून हवेंत गिरक्या मारणारीं मुलें खालीं जमिनीवर आदळूं नयेत ह्मणून त्यांचेसाठीं जशी एक जाळीदार खोळ खालीं धरलेली असते त्याप्रमाणें त्या वेळच्या हिंदुधर्माच्या प्रखर तडाख्यांनीं दूर उडालेले चेंडू **सत्यशोधक** समाजानें नेमके अडवून धरले.. **सत्यशोधक** समाजाचें हें कार्य विसरण्याजोगें आहे काय ? पण ह्यावरून ज्योतिंबा फुले कोण ठरतात ? ख्रिस्ती ठरतात कीं हिंदु-धर्माचे उपकारक ठरतात ?

खरीं गोष्ट अशी आहे कीं जोंपर्यंत प्रचलित हिंदुधर्माला राजसत्तेची जोड होती म्हणजे इ. स. १८१८ साल येऊन जोंपर्यंत महाराष्ट्रीय राज-सत्तेचा नाश झालेला नव्हता तोंपर्यंत हिंदुधर्माच्या नांवाखालीं जीं सामाजिक दुःखें किंवा सामाजिक अन्याय चाललेले होते त्यांना तोंड फुटण्यास अवसर नव्हता. असल्या प्रकारच्या दुःखांना किंवा अन्यायांना स्वराज्याचे अंमलाखालीं देखील तोंड फुटत नाहीं असें नाहीं. अति झालें म्हणजे लोकांचा क्षोभ स्वराज्याचे अमलाखालीं देखील अनावर होतो व फ्रेंच रेव्हो-ल्यूशन् किंवा इंग्लंडमधील प्रॉटेस्टण्ट धर्माची स्थापना हीं ह्याचीं प्रत्यक्ष उदा-हरणें आहेत. परंतु त्यांतहि लोकांना फूस द्यायला एखादी परकीय सत्ता देशांत येऊन बसलेली असली म्हणजे असल्या अन्यायांविरुद्ध बंडें उद्भवायला कांहींच उशीर लागत नाहीं. हिंदुस्थानांत मराठी सत्ता होती तोंपर्यंत हिंदुधर्मांतील अन्ययांविरुद्ध निशाण उभें करायला लोक वचकत होते, पण मराठी सत्ता जाऊन तेथें इंग्रजी सत्ता आल्यावरोबर हा सर्व प्रकार बदलला व बंडखोर लोक निर्भयपणानें वावरूं लागले. इंग्रजसरकारासहि हिंदुधर्माचें प्राबल्य नकोच होतें. त्यांनीं ह्या बंडास प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष प्रोत्साहन दिलें आणि हिंदुधर्माविरुद्ध बंडेंच बंडें उसळलीं. हीं बंडें दोन प्रकारचीं होतीं. कांहीं Nihilist म्हणजे विध्वंसक होतीं व कांहीं Constitutionist म्हणजे

मनदशीर होतीं. Nihilist म्हणजे विध्वंसक लोकांस हिंदुधर्मच नको होता. त्यांची कितीहि समजूत घातली किंवा त्यांना कितीहि सवलती मिळाल्या तरी हिंदुधर्माचा विध्वंस करणें हेंच त्यांना कर्तव्य वाटत होतें. वडिलोपार्जित घर अपुरें पडलें म्हणून तें अजीबाद पाडण्यांतलाच हा प्रकार होय. हे लोक हिंदुधर्म झुगारून भराभर ख्रिस्ती झाले. परंतु सनदशीर ( Constitutionist ) लोक तसे नव्हते. त्यांना हिंदुधर्म पाहिजे होता, पण त्याच्या स्वातंत्र्याची सरहद्द त्यांना वाढवायची होती. त्यासाठीं वाटेल तो झगडा करायला ते तयार होते. त्यासाठीं वाटेल ती निन्दा किंवा छळ सहन करायलाहि ते तयार होते. त्यांचा एकच निश्चय होता कीं स्वधर्मांत राहूनच सर्व करायचें—वाटेल तें झालें तरी स्वधर्म सोडायचा नाहीं.

आणि ह्यांत विशेष आश्चर्याची गोष्ट अशी होती कीं प्रचलित हिंदुधर्म हा त्या काळीं नुसता ब्राह्मणेतरांनाच जाचक झालेला होता असें नव्हे तर तो जितका ब्राह्मणेतरांना जाचक होता तितकाच ब्राह्मणांनाहि जाचक होता. त्या काळच्या प्रचलित हिंदुधर्माविरुद्ध बंड करण्यांत जितके ब्राह्मणेतर होते तितके ब्राह्मणहि होते. मूर्तिपूजेचे निर्बंध, स्पर्शास्पर्शाचे निर्बंध, विवाहाचे निर्बंध व खाण्यापिण्याचे निर्बंध हे त्या वेळच्या जुलमाचे मुख्य प्रकार होते. ह्याशिवाय अनेक धर्मविधींनीं माणसें जखडून टाकलेलीं होतीं. अशा निगडित स्थितींत कुठें तरी हवाशीर ठिकाणीं पळून जावें असें कुणालाहि वाटणें साहजिक होतें. बाहेर इंग्रजांचें खुलें राज्य तर घरांत भटजीचें किंवा म्हाताऱ्या आजीचें सुलतानी साम्राज्य ! बाहेर मनुष्य मोठा पंडित असेल किंवा हायकोर्टांत जज्जाचें काम तो करून आला असेल, पण घरांत आल्याबरोबर म्हाताऱ्या आजीबाईचा हुकूम सुरू होऊन " आंघोळ करून येशील तरच घरांत पाऊल टाक " असें तिनें फर्माविलेंच !

त्या वेळीं घरांत आल्याबरोबर प्रथमतः आंघोळ करून नेसतीं वस्त्रें बदलावीं लागत असत असें त्या वेळच्या अनेक नामांकित माणसांनीं लिहिलेलें आहे. नुकतेंच **विविधज्ञानविस्तार**मध्यें सुप्रसिद्ध व्याकरणकार कै.

**दादोबा पांडुरंग** ह्यांचें जें आत्मचरित्र प्रसिद्ध होऊं लागलेलें आहे त्यांतही ह्या गोष्टीचा उल्लेख आहे. पण नुसतें स्नानच काय, त्या वेळीं एकहि गोष्ट अशी नव्हती कीं जिथें प्रचलित हिंदुधर्म जाचक होत नव्हता. आज हिंदुसमाजांतून सोंवळ्याओंवळ्याचें प्रस्थ मोडलेलें आहे—निदान पुष्कळ कमी झालेलें आहे. आजकाल खेड्यापाड्यांतून देखील ओंवळ्यानें जेवायला बसणाराला कुणी नांवें ठेवीत नाहींत, परंतु त्या काळीं तसें नव्हतें. माझ्या लहानपणींदेखील सोंवळ्याओंवळ्याचा एवढा कडक कायदा होता कीं एखाद्या चिंधीवर पाय पडल्यांबरोबर वस्त्र बदलावें लागत असे. सात आठ वर्षांच्या लहान मुलांची मुंज झाली कीं त्यांचे पाठीमागें सोंवळ्याचे सर्व निर्बंध लागत आणि ते इतके कडक असत कीं थंडीच्या महिन्यांत रात्रीं जेवायला उघडें बसायच्या वेळीं पोरें रडकुंडीला येत. त्यांपैकीं कुणी हट्ट केला तर तीं वडील माणसांच्या हातचा मार खात ! लहान वयांत सकाळीं भूक फार लागते ! पण त्या वेळीं आंघोळ केल्याशिवाय भात जेवायची सोय नव्हती. पण आंघोळ करायची म्हणजे तर आंगावर कांटा येई ! टिळकआगरकरांच्या वादांत भांडणाचा मोठा मुद्दा काय, तर रेल्वे स्टेशनवर लो. टिळक भात जेवले कीं नाहीं ? आगरकर म्हणाले कीं टिळक भात जेवले व टिळक म्हणाले मी भात जेवलों नाहीं ! केवढा हा महत्वाचा मुद्दा आणि ह्यावर भांडण कुणांत तर लो. **टिळक** आणि कै. **आगरकर** अशांसारख्या लोकोत्तर विद्वानांत !

हें सोंवळ्याओंवळ्याचें झालें. इतर बाबतींतहि असेच कडक कायदे होते ! कै. **विवेकानंदांनीं** म्हटल्याप्रमाणें त्या वेळचा हिंदुधर्म **जेऊं नको, शिऊं नको** ह्या अष्टाक्षरांत येऊन बसलेला होता ! त्या वेळीं विद्वानांच्या पुढें, ग्रामण्यांच्या सभांत किंवा जातगंगेच्या समोर जे बडे प्रश्न निघायचे ते असे कीं अमुकाला अमक्याचा "विटाळ" झाला का ? किंवा अमुक अमक्याच्या पंक्तीला जेवला का ? राष्ट्रांतले प्रश्न काय ते हे ! ह्यांशिवाय दुसरे प्रश्न नाहींत. बुद्धिवान् लोकांची बुद्धि सर्व ह्यांत खर्च व्हायची ! पुढारी लोकांचा सारा वेळ ह्यांत खर्च होऊन जायचा ! जेवण्याच्या आणि शिवण्याच्या

ह्या भीतीमुळेंच परदेशास जायचें म्हणजे हिंदु लोकांनी प्राणसंकट वाटे! आई-बापांना अशी भीत पडे कीं मुलगा परदेशांत जाणें म्हणजे तो स्वधर्माला व जातीला मुकणें! त्यापेक्षां तो मेलेला बरा किंवा आपण डोळे मिटलेले चांगले!

ह्याशिवाय ब्राह्मण लोकांना दुसरी अत्यन्त जाचक गोष्ट म्हणजे विधवावपन! प्रचलित हिंदुधर्माविरुद्ध बंडाळी उत्पन्न करायला ही गोष्ट जितकी कारणीभूत झाली तितकी दुसरी कोणतीहि झाली नसेल! वैधव्याची आपत्ति स्त्रियांवर कोणत्याहि काळीं आली तरी ती वाईटच! पण ज्या वेळीं चवदा पन्धरा वर्षांची, आठ नऊ वर्षें वयाची किंबहुना **चार पांच** वर्षेंच वयाला झालेली व अजूनहि बोबडें बोलत असलेली एखादी बाला, तिच्या अल्पवयांतला—तिच्या अर्भकावस्थेंतल्या लग्नांतला—नवरा वारल्यामुळें—विधवा होई व त्या वयांतदेखील तिचें वपन करायचा आईबापांवर प्रसंग येई त्या वेळीं त्यांच्या चित्ताची कालवाकालव काय होत असेल ह्याची कल्पना सहृदय वाचकांनींच करावी! ती लिहायला आमचेजवळ लेखणी नाहीं! आम्ही एवढेंच सांगतों कीं अशा "विधवा" बघण्याचा प्रसंग माझे स्वतःवर आलेला आहे. पुढें त्यांचें काय झालें, कालाच्या वाळवंटावरील त्या लहान कणिका—किंवा प्रचलित निर्बंधांच्या ओसाड बागेंतल्या त्या कोमल कलिका—पुढें कशा रीतीनें होरपळत राहिल्या—त्या मृत्युवश होऊन गेल्या किंवा अजूनहि आपला कष्टी जीव जाळीत बसलेल्या आहेत—हेंहि कळायचा मार्ग नाहीं, पण त्यांच्या त्या अत्यंत करुणामय मूर्ति आठवल्या म्हणजें अजूनहि डोळ्यांत पाणी येतें.

तेव्हां जर कुणाचा असा समज असेल कीं फक्त ब्राह्मणेतर समाजच त्या काळच्या धर्मनिर्बंधांच्या उकडहांड्यांत उकडून निघत होता तर तें खरें नाहीं. त्यांत ब्राह्मणवर्गहि शिजत होता व त्या आधणाच्या पाण्यांत जितके ब्राह्मणेतरांचे अश्रु पडत होते तितकेच ब्राह्मणांचेहि अश्रु सांडत होते. किंबहुना ब्राह्मणवर्गातल्या अनाथ स्त्रियांचीं निष्पाप

रक्तें ह्या आधणांत पडलेलीं आहेत–त्या निष्पाप रक्तांच्यामुळें ह्या आधणाला आधणपणा आलेला आहे. आजच्या ब्राह्मण समाजांत असा एकहि मनुष्य सांपडणार नाहीं कीं ज्याची आई, आजी, मावशी किंवा मावळण ह्या भयंकर कसोटींतून जात असतांना जिच्या मांडीवर तो वाढलेला नाहीं.

त्यांत आणखी पुनर्विवाहाचा निर्बंध ! मग काय विचारतां ? प्रचलित हिंदुधर्मापुढें मुख्यतः ब्राह्मणांनाच **दे माय, धरणी ठाय** झालें. ब्राह्मणवर्ग इतर वर्गापेक्षां श्रेष्ठ मानला जात असेल व सार्वजनिक पंगत बसली ह्मणजे ब्राह्मणांचे पाट माजघरांत व बाकीच्यांचीं पानें बाहेरच्या सोंप्यांत असा प्रकार होत असेल–पण ह्याखेरीज ब्राह्मणवर्गास कोणतेंहि सुख नव्हतें. ज्याच्या पायाचें तीर्थ ब्राह्मणेतरांना घ्यावें लागतें तो हा वर्ग नव्हे. दुसऱ्याच्या घरच्या लाडूपोळ्यावर जो तट्ट फुगतो तो हा वर्ग नव्हे. लग्नांतल्या दक्षिणेवर जो उदरनिर्वाह चालवितो तो हा वर्ग नव्हे. ब्राह्मणवर्ग अगदीं निराळा आहे व हाच वर्ग मुख्यतः पुढारी गणला जात आहे. आपल्या पायाचें तीर्थ दुसऱ्यास देणारा, दुसऱ्याच्या घरच्या लाडूपोळ्यांवर तट्ट फुगणारा व लग्नमुंजींतल्या दक्षिणेवर उदरनिर्वाह चालविणारा जो वर्ग त्यास **भिक्षुक**वर्ग असें नांव आहे. ब्राह्मणेतर ज्यास **भट** ह्मणतात ते हे भिक्षुक–ब्राह्मण नव्हेत. ब्राह्मणवर्ग स्वतः ह्या भिक्षुकवर्गाच्या अमलाखालीं आहे व ब्राह्मणेतरांवर भिक्षुकवर्गाचें जेवढें साम्राज्य आहे तेवढेंच ब्राह्मणवर्गावरहि आहे. ब्राह्मणवर्गास इतरांप्रमाणेंच भिक्षुकवर्गाच्या पायाचें तीर्थ घ्यावें लागतें, ब्राह्मणवर्गास इतरांप्रमाणेंच भिक्षुकवर्गासाठीं लाडूपोळ्या कराव्या लागतात व ब्राह्मणवर्गाच्या घरीं लग्नमुंजी झाल्या ह्मणजे पहिली बाब भिक्षुकवर्गाच्या दक्षिणेचीच असते. एवढेंच कशाला ? गरीबींत संसार करणाऱ्या ब्राह्मणकुटुंबांतल्या नवराबायकोच्या जोडप्यांपैकीं नवरा घरीं मरून पडला ह्मणजे पुढें उत्तरक्रियेंतल्या दक्षिणेला भिऊन कितीतरी अनाथ ब्राह्मण स्त्रियांनीं पतिनिधनामुळें फुटलेला टाहो थांबवून धरलेला आहे !

निःपक्षपात दृष्टीनें विचार केला ह्मणजे अशा रीतीनें ब्राह्मणवर्ग हा प्रचलित धर्मनिर्बंधाखालीं पार चिरडून गेलेला आहे ! ब्राह्मण-वर्गावरील निर्बंधांचें ओझें आणि ब्राह्मणेतर वर्गावरील निर्बंधांचें ओझें ह्यांची तुलना करण्याचा आमचा विचार नाहीं. परंतु संसार सुखावह करण्यास विवाहस्वातंत्र्य, जिह्वास्वातंत्र्य व आचारस्वातंत्र्य ह्या ज्या तीन गोष्टी लागतात त्या तिन्हींचा ब्राह्मणवर्गाच्याजवळ पूर्वी पूर्ण अभाव होता व, अजूनहि बराचसा आहे. ब्राह्मण म्हटला कीं त्याच्या पाठीमागें सोंवळ्या-ओंवळ्याचे कायदे लागले ! त्यास दुसऱ्या कुणाच्याहि हातचें खातां यायचें नाहीं ! ठराविक अन्नापेक्षां दुसऱ्या कोणत्याहि पदार्थावर वांसना जाऊं देतां यायची नाहीं व धर्माचारांपैकीं कोणत्याहि आचाराची उपेक्षा करतां यायची नाहीं ! तो जंगलांत असला तरी त्याला श्रावणी केलीच पाहिजे व त्यानें कितीहि वेडेंवांकडें तोंड केलें तरी त्याला पंचगव्य घेतलेंच पाहिजे. ब्राह्मणस्त्रिया तर निर्बंधाखालीं नुसत्या भरडल्या जात होत्या ! आठव्या नवव्या वर्षी वैधव्य आलें तरी पुनर्विवाहाची आडकाठी व त्यांतहि वपनाचा अघोर प्रसंग ! हाय, हाय ! ब्राह्मण मुलींचे ते हंबरडे अजूनहि वातावरणांत घुमत असतील. श्रीकृष्ण प्रभूच्या कानांवर अभागी हिंदुस्थानची स्वांतंत्र्यार्थ फोडलेली आरोळी जर जात नसेल तर ती ह्या हंबरड्यामुळेंच जात नसेल !

सध्यां **ब्राह्मण** आणि **भट** ह्या शब्दांचा फार घोंटाळा करण्यांत येतो. बहुतेक लोक हे शब्द समानार्थक वापरतात. पण ही चूक आहे हें ह्या विवेचनावरून लक्ष्यांत येईल. **भटशाही** आणि **ब्राह्मणशाही** ह्या अगदीं निराळ्या शाह्या आहेत. **भटशाही** मंत्रोपजीवी असते, परोपजीवी असते. ब्राह्मणशाही तशी नसते. आतां मंत्रपठन हाहि एक धंदा आहे कीं नाहीं आणि वकील किंवा डॉक्टर हे जर Consultation ह्मणजे सल्ला देण्या-करितां पैसे घेतात तर मंत्रपठनासाठीं भिक्षुकांनींहि पैसे कां घेऊं नयेत वगैरे मुद्दे भिक्षुक वर्गातर्फे काढण्यांत येत असतात. ह्या मुद्याचा विचार मी पुढें करीन. परन्तु तूर्त मला जें सांगायचें आहे तें एवढेंच कीं

**ब्राह्मणशाही** आणि **भिक्षुकशाही** ह्या एक नव्हेत. ब्राह्मणशाहींतील एकहि मनुष्य दुसऱ्यापासून दक्षिणा घेत नाहीं, दुसऱ्याचे घरीं लाडूपोळ्या झोडण्यास जात नाहीं किंवा आपले पाय पुढें करून त्यांचें तीर्थ घ्या असें म्हणत नाहीं. हे भिक्षुकशाहीचे व्यवसाय आहेत. ब्राह्मणशाहींतील कोणीहि मनुष्य ते करीत नाहीं, एवढेंच नव्हे तर तें करणें कमी प्रतीचें आहे असें तो मानतो.

मग असा प्रश्न येतो कीं ब्राह्मणवर्ग व भिक्षुकवर्ग एकच आहे असा जो घोंटाळा तिऱ्हाईत लोकांचा उडतो, तो कां? ते जर अगदीं स्वतंत्र वर्ग आहेत व जर एकाच्या धंद्याला दुसरा कमीपणाचा समजतो तर मग तिऱ्हाइतांना तरी असा भ्रम कां उत्पन्न व्हावा? ह्याचें कारण एवढेंच कीं मुलतानी आणि शीख ह्यांचीं जशीं नातींगोतीं असतात त्याप्रमाणें भिक्षुकवर्ग आणि ब्राह्मणवर्ग ह्यांचीं नातींगोतीं असतात. त्यांच्यांत रोटीबेटी-व्यवहार होतो. मुलतानी लोकांतून जशी शीख लोकांत भरती होत असते त्याप्रमाणें भिक्षुकवर्गांतून ब्राह्मणवर्गांत नवीन माणसें येत असतात. एकाच कुटुंबांत एक भाऊ भिक्षुक व एक भाऊ गृहस्थ असू शकतो व ह्या गृहस्थवर्गालाच ब्राह्मणवर्ग असें म्हणण्यांत येतें. भिक्षुकवर्ग व ब्राह्मणवर्ग ह्यांचे ह्या प्रकारचे लागेबांधे आहेत, पण ह्यांतच त्यांचें पृथक्करण आहे. भिक्षुकवर्गांतून ब्राह्मणवर्गांत नवीन भरती होते, पण जो एकदां ब्राह्मणवर्गांत शिरला तो परत भिक्षुकवर्गांत जात नाहीं. ब्राह्मणवर्ग जरी भिक्षुकवर्गाच्या पायां पडत असला किंवा त्याचें चरणतीर्थ घेत असला, तरी भिक्षुकवर्ग कमी दर्जाचा मानला जातो. त्यामुळें गृहस्थपणाच्या उच्च वर्गांत जो मनुष्य एकदां शिरला तो वाटेल तशी परिस्थिति बदलली तरी भिक्षुकवर्गांत पुन्हां शिरत नाहीं. एवढेंच कशाला? ब्राह्मणवर्गास '**भिक्षुक**' ह्या नांवाचाहि अपमान वाटतो. जे हे भिक्षुक ते भट! ब्राह्मण हे भट नव्हेत. म्हणून ब्राह्मणवर्गाच्या हृदयास जर एखादी गोष्ट झोंबत असली तर त्यांना "**भट**" ह्या नांवानें संबोधणें होय! सार्वजनिक चळवळींत

शिरणाऱ्या माणसांनीं **भट** हा शब्द उच्चारून ब्राह्मणवर्गाच्या हृदयास घरें पाडणें चांगलें नाहीं. अन्तःकरणें जोडावींत, अन्तःकरणें तोडूं नयेत. वाणी शुभ बोलावी, उत्साह चढविणारी बोलावी. ब्राह्मणेतरांस **शूद्र** ह्या शब्दाचें जेवढें वावडें आहे तेवढेंच ब्राह्मणवर्गास **भट** ह्या शब्दाचें आहे. नेहमीं दुसऱ्यास प्रोत्साहन द्यावें, त्याचे पाठीवर थाप मारावी. त्याचा मानभंग–तेजोभंग करूं नये. ब्राह्मणवर्गास **भट** म्हटल्यानें त्यांचा तेजोभंग होतो. ब्राह्मणेतरांस **शूद्र** म्हणण्याचा जसा काळ गेला तसा ब्राह्मणांना **भट** म्हणण्याचाहि काळ गेला. त्या जुन्या काळांतल्या चुक्या होत्या. त्या perpetuate (कायम) करणें चांगलें नाहीं. सध्यांचा काळ अन्तःकरणें तोडण्याचा नाहीं, अन्तःकरणें जोडण्याचा आहे. **सत्यशोधक** पक्ष हा अन्तःकरणाचा पक्ष आहे. **सत्यशोधक** पक्ष म्हणजे अन्तःकरण आहे. म्हणून मी विचारतों कीं त्याचेपुढें, ब्राह्मणवर्गानें जर अन्तःकरणांतलें दुःख सांगितलें व ब्राह्मणांस " **भट** " म्हणूं नका असें विनविलें तर ती विनंति वांया जाईल काय ?

**भट** म्हणजे कोण हें वर सांगितलेंच आहे. **भट** म्हणजे भिक्षुकी करणारा, दुसऱ्याचे घरीं हव्यकव्य करणारा किंवा दक्षिणा घेणारा परोपजीवी मनुष्य ! ब्राह्मणवर्ग परोपजीवी नाहीं. तो धंदा किंवा काबाडकष्ट करून पोट भरणारा वर्ग आहे. ब्राह्मणवर्गांत सावकारापासून तों शिंपी काम करणाऱ्यापर्यंत सर्व धंद्याचीं माणसें आहेत. कांहीं ब्राह्मणांनीं मोच्याचीं देखील दुकानें घातलेलीं आहेत. पण ब्राह्मणवर्गातील मनुष्य मोच्याचें दुकान घालो किंवा सावकारी करो, तो कुळकर्णीपणा करो, किंवा मामलेदारी चालवो, तो कधींहि परोपजीवी रहात नाहीं. परान्नावर पोसणें ही गोष्ट ब्राह्मण मनुष्यास स्वभावतःच अप्रिय आहे. बारीक निरीक्षण केल्यास ब्राह्मणवर्गातील माणसें उद्योगी, मितव्ययी व बरींचशीं निर्व्यसनी आढळून येतात. ब्राह्मणवर्गांत शेतकी करणारींहि माणसें आहेत. त्यांच्यांतील पुरुष बैल चालवितात, स्त्रिया शेतांत काबाडकष्ट करतात. ब्राह्मण **पाटील** तर वाटेल तितके आहेत. तर-

वारीचेंहि ब्राह्मणवर्गास कुपथ्य नाहीं. पहिले बाजीराव, पहिले माधवराव, हरिपंत फडके, परशुरामभाऊ पटवर्धन हे विख्यात तरवारबहाद्दर होते. महाराणी **लक्ष्मीबाई** अशांसारख्या तरवारबहाद्दर स्त्रियाहि ब्राह्मणवर्गांत झालेल्या आहेत. संपत्तीकडेहि ब्राह्मणवर्गाचा ओढा विशेष नाहीं. संपत्तिमान् होण्यापेक्षां कार्यकारी होण्याकडे त्यांत अनेकांचा ओढा असतो आणि ह्यामुळेंच ब्राह्मणवर्ग इतर वर्गांपेक्षां श्रीमंत नाहीं. जमिनीचा महसूल किंवा इन्कमटॅक्स ह्या सरकारी उत्पन्नाच्या दोन्ही बाबी घेतल्या तरी त्यांत ब्राह्मणवर्गाचा नंबर फारच खालीं आहे. ब्राह्मण-वर्गानें शंभर वर्षें मराठी राज्य हांकलें. तें त्यांनीं न्यायानें मिळविलें कीं अन्यायानें मिळविलें हा प्रश्न ह्या वेळीं नको. माझ्या मतानें तें त्यांनीं न्यायानें मिळविलें व अन्यायानें घालविलें. परंतु तें त्यांनीं अन्यायानें मिळविलें असें जरी गृहीत धरलें तरी शंभर वर्षें राज्य करूनहि **बाळाजी विश्वनाथ** कोंकणांतून येतांना जितका गरीब होता तितकाच ब्राह्मणवर्गांतील सामान्य मनुष्य आज गरीब आहे. शंभर वर्षें राज्यलक्ष्मी हातांत असतांहि ते गबर होऊन बसले नाहींत. कित्येक ब्राह्मण कुटुंबें तर खरोखर अन्नास मोताद आहेत. धार्मिक निर्बंधामुळें ब्राह्मणेतर वर्गांचे डोळे जितके पांढरे होत असतील त्याहून हे निर्बंध ब्राह्मणवर्गाचा ज्यास्त पिष्टा पाडीत आहेत.

ब्राह्मणवर्गाची ह्या निर्बंधांतून मुक्तता होणें जरूर होतें. ब्राह्मणेतर वर्गांसहि हे धार्मिक निर्बंध जाचीत होते. हे धार्मिक निर्बंध सर्व लोकांनाच असह्य झालेले होते. पण ह्या निर्बंधांच्या किल्ल्या भिक्षुक-वर्गाचे कडोसरीस होत्या आणि भिक्षुकवर्ग हे निर्बंध सैल करण्यास नाकबूल होता. पन्नास पंचावन वर्षांपूर्वीं पुणें येथें पुनर्विवाहाचा जो जंगी वाद झाला त्या वेळीं खुद्द शंकराचार्य ह्या वादाचें निरीक्षण करीत होते, तरी अखेरचा निर्णय पुनर्विवाहाचे विरुद्ध झाला. ब्राह्मण मुलींना पुनर्विवाह करूं द्यायचा नाहीं, तिचें लग्न होऊन एक महिनाहि झाला नसला तरी तिचा पुनर्विवाह होऊं द्यायचा नाहीं, ती आठ वर्षांची अजाण पोरगी असली

व मनुयाज्ञवल्क्य ह्यांनीं म्हटल्याप्रमाणें **यथा कन्या तथैव सा** असें जरी तिचें वय असलें तरी तिचा पुनर्विवाह होऊं द्यायचा नाहीं ! नाहीं ! तिचा पुनर्विवाह होऊं द्यायचाच नाहीं !

भिक्षुकशाहीनें खुद्द ब्राह्मण वर्गाविरुद्ध एवढा आग्रह धरल्यानंतर आतां ह्याला उपाय काय ? ह्याला एक उपाय म्हणजे हिंदुधर्म सोडून देणें. हा उपाय Nihilist (विध्वंसक) पक्षानें केला. पण Constitutionist ( सनदशीर ) लोकांनीं त्यावर निराळीच युक्ति काढली. त्यांनीं ठरविलें कीं जर भिक्षुकवर्ग इतका दुराग्रह धरीत असेल तर भिक्षुकवर्गाचा अंमल झुगारून द्यायचा व धार्मिक सत्तेच्या किल्ल्या आपल्या हातीं घ्यायच्या ! भिक्षुकवर्ग ऐकत नसेल तर न ऐको ! ते आपले गुरुच नव्हेत. जे आपली सत्ता सौम्य करण्यास तयार नाहींत—नको—त्यांची सत्ताच नको ! त्याचेऐवजीं आपणच राज्याधिकार हातीं घेऊं, भिक्षुकशाहीच्या एकछत्री राज्याचे ऐवजीं आपणच लोकशाहीचें सर्वछत्री राज्य स्थापन करूं. इंग्लंडमध्यें दुसऱ्या जेम्स राजाचा जुलूम ज्या वेळीं असहन झाला आणि ज्या वेळीं तो राजा कोणत्याहि तडजोडीस कबूल होईना त्या वेळीं इंग्लंडमधील जनतेनें हेंच केलें, फ्रान्सच्या राज्यक्रांतीच्या वेळींहि असेंच झालें आणि प्रत्येक राज्यक्रांतीचे वेळीं असाच प्रकार होत असतो.

ही क्रांति करण्यांत **परमहंस**समाज, **प्रार्थनासमाज**, **ब्रह्म**समाज, **आर्य**समाज हे जसे प्रमुख होते तितकाच **सत्यशोधक** समाजहि प्रमुख होता. ह्या सर्वांनीं मिळून प्रचलित हिंदुधर्माची कोंडी फोडली व हिंदु राहून हिंदु लोकांस इतर धर्मामधील स्वातंत्र्य मिळवून दिलें. ह्या पंथ-स्थापकांच्या फौजा म्हणजे विजयी क्रान्तिकारकांच्या फौजा होत्या ! ह्या सर्वांच्या अंगीं विजयीपणाचें स्फुरण होतें आणि त्यामुळें झपाट्या-सरशीं त्यांचे हातून कार्य झालें ! **प्रार्थनासमाज, ब्रह्म**समाज वगैरे समाजांनीं आपला मोर्चा ब्राह्मणसमाजाकडे वळविला व त्यांतील लोक हस्तगत करण्याचा सपाटा चालविला. प्रार्थनासमाज, परमहंससमाज

ह्या सर्वांचे अनुयायी ब्राह्मणवर्गांतले होते. त्यामुळें त्यांस पाण्ढरपेशा जातींतल्या लोकांची सहानुभूति मिळाली; त्यांनीं आपलें स्वतंत्र सिंहासन स्थापन केलें—भिक्षुकशाहीस फेंकून दिलें.

**सत्यशोधक** समाजहि क्रान्तिकारक लोकांपैकींच होता, पण ज्याप्रमाणें दोन क्रान्तिकारकांपैकीं एकानें उत्तरेकडून हल्ला करावा व दुसऱ्यानें दक्षिणेकडून हल्ला करावा त्याचप्रमाणें **प्रार्थनासमाज** वगैरे पंथांनीं आपल्या कक्षेंत पाण्ढरपेशा वर्गास आणण्याचें सुरू केलें आणि **सत्यशोधक** समाजानें खेडेगांवें व गांवकरी लोक ह्यांचीं मनें काबीज करण्याचा प्रयत्न केला. **प्रार्थनासमाज** धर्मप्रचारकाचा झगा घालून आला, **सत्यशोधक**समाज घोंगडी पांघरून आला. **प्रार्थनासमाजानें** इंग्रजी भाषा उचलली, **सत्यशोधक**समाजानें शुद्ध मराठी सुरू केली. **प्रार्थनासमाज** उपासनामंदिरांत उभा राहिला, **सत्यशोधक** समाज शेताच्या खळ्यावर थडकला. **प्रार्थनासमाज** तत्त्वज्ञान बोलूं लागला, **सत्यशोधक** समाज प्रचलित स्थिति मांडूं लागला. **प्रार्थनासमाजानें** संगीत गाणीं चालू केलीं, **सत्यशोधक** समाज लावण्या म्हणूं लागला. **प्रार्थनासमाजानें** पेटीचे सूर काढले, **सत्यशोधक** समाजानें डफावर थाप मारली. प्रार्थनासमाजानें कल्पना उचंबळायला लावल्या, सत्यशोधक समाजानें हृदयें उचंबळून सोडलीं !

**प्रार्थनासमाज** आणि **सत्यशोधक**समाज ह्यांतील अंतर हें आहे. बाकी त्यांची उत्पत्ति एकच आहे, ध्येय एकच आहे आणि स्वरूपहि एकच म्हणजे क्रांतिकारकाचें आहे. **प्रार्थनासमाजानें** उत्तरेकडून सुरवात केली, **सत्यशोधक**समाजानें दक्षिणेकडून सुरवात केली. **प्रार्थनासमाजानें** वरच्या मजल्याकडे दृष्टि ठेवली. **सत्यशोधक**समाजानें तळमजल्याकडे दृष्टि ठेवली. **प्रार्थनासमाजानें** हिंदुधर्माचें डोकें काबीज केलें, **सत्यशोधक**समाजानें त्याच्या तळपायाला गुदगुल्या केल्या. ह्या गुदगुल्यांमुळें जनता हंसली आणि सत्यशोधक समाजाकडे बघायला

लागली. प्रार्थनासमाजास जनतेला खुलवितां आलें नाहीं. **सत्य-शोधक** समाजाचा जलसा उभा राहिला म्हणजे पांच हजार काय आणि दहा हजार काय, वाटेल तितके लोक जमायला अडचण पडत नाहीं. पण प्रार्थनासमाजाचा पन्नासावा वाढदिवस आला तरी पन्नास लोक जमायचीहि मारामार पडते !

हें वर्णन अतिशयोक्तीचें आहे असें कोणी ह्मणतील. **सत्य-शोधक** समाजाचे जलशास हजारों लोक जमतात हें कबूल करणें कोणास दुःखप्रद वाटेल, त्याचप्रमाणें प्रार्थनासमाजाच्या " फंक्शन्स "ना पन्नास लोक जमणें मुश्किलीचें पडतें हें कबूल करणेंहि कोणास जड जाईल. आतां ह्या दोन्ही गोष्टी अतिशयोक्तीच्या आहेत असेंच आपण धरून चालूं. तरीहि एवढी गोष्ट मान्य करावीच लागेल कीं गेल्या पन्नास वर्षांत **प्रार्थनासमाजा**ची चळवळ खेड्यापाड्यापर्यंत उतरूं शकली नाहीं आणि **सत्यशोधक** समाजाची चळवळ पांढरपेशांपर्यंत चढूं शकली नाहीं. दुसऱ्या भाषेंत बोलायचें म्हणजे प्रार्थनासमाजाचे चळवळींत Philosophy ( तार्किक चर्चा ) आहे, पण Heart ( अंतःकरणाचा फुलेरा ) नाहीं, आणि सत्यशोधक चळवळींत Heart ( अंतःकरणाची लाट ) आहे, पण Philosophy ( ज्ञानाची उसळी ) नाहीं.

**सत्यशोधक** समाजाची प्रगति जर ह्यापुढें करायची असेल तर ती कोणत्या दृष्टीनें करायला पाहिजे हेंहि ह्यावरून सहज समजून येणार आहे. **सत्यशोधक** समाजाला अंतःकरण आहे, पण अजून अन्तर्दृष्टि नाहीं आणि ही अंतर्दृष्टि आल्याशिवाय त्याच्या प्रयत्नाची पूर्तता व्हायची नाहीं. Head and Heart—**ज्ञान** आणि **अंतःकरण** ह्यांची ज्या वेळीं जोड जमते त्याच वेळीं एखादें मत विश्वविजयी होतें, नाहींतर त्यास एकांगीपणा येण्याचा सम्भव असतो. एखादा प्रांत काबीज करायचा म्हणजे त्यांतील **जमीन** आणि **किल्ले** हे दोन्ही ज्याप्रमाणें सर करावे लागतात त्याप्रमाणें एखादी चळवळ सर्वव्यापी करायची म्हणजे सुशिक्षित आणि

अशिक्षित; पांढरपेशे आणि गांवकरी, नागरिक आणि शेतकरी, बुद्धिमान् आणि अंतःकरणवंत, मानदार आणि इमानदार, Classes आणि Masses, ज्ञाता आणि जनता, Head आणि Heart, ह्या दोहोंचाहि कबजा घ्यावा लागतो. ह्या दोहोंचा कबजा घेण्याचा प्रयत्न आतांपर्यंत फक्त स्वामी **दयानंद** ह्यांच्या आर्यसमाजानें केला आणि म्हणून एके बाजूस स्वामी **श्रद्धानन्दां**सारखे ज्ञाते तर एके बाजूस गांवोगांवच्या प्रचारकांसारखे कार्यकर्ते ह्या चळवळींत निर्माण झाले. अजूनहि ज्ञानसमृद्धीच्या बाजूनें आर्यसमाजाची सम्पत्ति पूर्ण झालेली नाहीं. द्वैत, अद्वैत, वेदांत, मीमांसा ह्यांच्याप्रमाणें सर्वमान्य तत्त्वज्ञान अजूनहि आर्यसमाजामध्यें निर्माण व्हायचें आहे. आणि म्हणूनच आर्यसमाज कितीहि लोकप्रिय असला तरी तो अजून **योद्धा** म्हणून प्रसिद्ध आहे, **ज्ञानदाता** म्हणून प्रसिद्ध नाहीं. ह्याचे उलट सनातन हिंदुधर्माची घडी आज किती जरी विसकटलेली असली तरी त्यांतील तत्त्वज्ञानाचा भाग इतका खंबीर व इतका मनोरम आहे कीं **उपनिषदें, भगवद्गीता, ब्रह्मसूत्रें, जैमिनी, पतंजलि, शंकराचार्य, रामानुजाचार्य** वगैरेंचा हात **ॲरिस्टाटल्, प्लेटो**, अशांसारखे प्राचीन तत्त्वज्ञानीच नव्हेत तर **स्पेन्सर, मिल्** ह्यांच्यासारखे आधुनिक तत्त्ववेत्तेदेखील क्वचित्च धरूं शकतील.

अर्वाचीन कालांत अशांसारखे ज्ञानाचे प्रवाह वाहविण्याचे प्रयत्न **ब्रह्मसमाजानें** व त्याच्या खालोखाल **प्रार्थनासमाजानें** केले. देवर्षि **देवेन्द्रनाथ** टागोर, **केशवचन्द्र सेन**, बाबू **प्रतापचन्द्र मुजूमदार**, पंडित **शिवनाथ शास्त्री** ह्यांचे ह्या दृष्टीचे प्रयत्न खरोखरच प्रशंसनीय आहेत. आपल्या बाजूस अशांसारखे पायाशुद्ध प्रयत्न फारसे झालेले नाहींत, पण कै. सर **रामकृष्ण गोपाळ भाण्डारकर, महादेव गोविंद रानडे, वामन आबाजी मोडक** ह्यांच्या प्रार्थनांनीं उच्च विचाराच्या प्रांतांत जनतेस नेण्याचा व त्यांच्या चित्तास शांति देण्याचा यशस्वी प्रयत्न केलेला आहे. ह्या तिन्ही पुरुषांजवळ व विशेषतः **भाण्डारकर** आणि **रानडे**

ह्यांच्या जवळ इतकें अगाध ज्ञान होतें कीं प्रासंगिक उपेसनांपेक्षां धर्मज्ञाना-वर एखादा सोपपत्तिक ग्रंथ त्यांस सहज रचतां आला असता ! तसें त्यांनीं केलें नाहीं हें दुर्दैव होय !

आतां जी गोष्ट **प्रार्थनासमाजानें** देखील पूर्णपणें केली नाहीं ती गोष्ट **सत्यशोधक** समाजानें करून दाखविली नाहीं ह्यांत आश्चर्य नाहीं. पण त्याशिवाय धार्मिक कार्य किंवा कोणत्याहि कार्य चळवळीस पूर्णता येणार नाहीं. आज **सत्यशोधक** समाजास जर कोणती गोष्ट हवी असेल तर ती ही कीं तिला Philosophy—ज्ञानसमृद्धि—पाहिजे. ज्या चळवळींत अंतःकरणाचे फवारे व ज्ञानाचे झरे ह्यांची सोबत जमते ती चळवळ पूर्ण होते व तिलाच टिकाऊपणा येतो. Philosophy ऊर्फ ज्ञानसमृद्धि हिच्याशिवाय चाल-लेली धार्मिक चळवळ ह्मणजे लढाईंत शीर उडून नाचत राहिलेलें धड होय. हृदयाच्या उसळीशिवाय उत्पन्न झालेली चळवळ ह्मणजे चेहेरा वगैरे शरीराचा उत्तम भाग असून खांद्यापासून खालीं सर्व अंग लुलें पडलेलें होय. पहिलीस गति असते, पण दृष्टि नसते, दुसरीस दृष्टि असते, पण गति नसते. **प्रार्थनासमाज** ही अशा प्रकारची चळवळ आहे. तिला दृष्टि आहे, पण गति नाहीं. ह्याचे उलट **सत्यशोधक** समाजास गति आहे, पण दृष्टि नाहीं.

एवढेंच काय, आज **सनातन हिंदुधर्म** म्हणून जो कांहीं राहिलेला आहे तोहि आज **प्रार्थनासमाजा**प्रमाणेंच झालेला आहे, म्हणजे त्यास **दृष्टि** आहे पण **गति** नाहीं. त्याचे जवळ उत्तमप्रकारचें तत्त्वज्ञान आहे हें वर सांगितलेंच आहे. ह्या तत्त्वज्ञानाच्या बळावर त्याला आज युरोपला दिपवितां येईल, अमेरिकेवरहि छाप पाडतां येईल. ज्या वेळीं **विवेकानन्दां**सारखीं माणसें ह्यास अमेरिका खंडांत घेऊन गेलीं त्या वेळीं त्यांना तिथें खरोखर छाप पाडतां आली. त्याचें नुसतें टवटवीत मुख पाहिलें तर तो सुंदर दिसतो—त्याची छबी श्रीकृष्णासारखी मनमोहक दिसते. पण त्याच्या हातापायांकडे पहायची सोय नाहीं, कारण त्याची गति गेलेली आहे,

त्याचे हातपाय लुले पडलेले आहेत. त्याचा नुसता **बस्ट** [ चेहेरा-मोहरा ] बघितला म्हणजे कोणीहि खूष होऊन जातो आणि ह्याच खुषीच्या लहरींत "उपनिषद्s are the solace of my life, उपनिषद्s are the solace of my death" ( उपनिषदांनीं मला इहलोकांत शांति दिली, उपनिषदांनींच मला मृत्यूचे वेळीं शांति मिळेल, ) असे उद्गार पाश्चात्य पंडित काढीत असतात. मॅडम् **ब्लॅव्हॅटस्की** ह्याचमुळें हिंदु धर्मावर फिदा झाली, मिस् **नोबल** वगैरे पाश्चात्य स्त्रिया ह्याचमुळें हिंदु धर्मावर फिदा झाल्या. परंतु हिंदुधर्माचा चेहेरा इतका गोंडस असून त्याचे हातपाय आज लुले पडलेले आहेत. अमेरिकाच काय, अटकेबाहेर जायचें-देखील सामर्थ्य त्यास राहिलेलें नाहीं. तो हिंदुस्थानांत तरी टिकतो कीं नाहीं ह्याची आज काळजी पडलेली आहे.

सुदैवानें स्वामी **विवेकानन्द**, स्वामी **रामतीर्थ** वगैरे महापुरुषांच्या परिश्रमामुळेंच सनातन हिंदुधर्म हा **सत्यशोधकसमाज**, **प्रार्थनासमाज**, **आर्यसमाज़**, **परमहंससमाज** वगैरे चळवळींच्या सुरवातीला जसा होता तसा आज आडमुठा राहिलेला नाहीं. तो आज बराच पुढें सरकलेला आहे. बाहेरून आल्याबरोबर आज कडकडीत धर्माभिमानी घराण्यांतहि कुणाला स्नान करावें लागत नाहीं. सोंवळ्याचा दरारा जवळ जवळ लुप्त-प्रायच झालेला आहे. आठ वर्षांच्या मुलीचें सध्यां कुणी लग्न करीत नाहीं, आणि अल्पवयांतच काय पण प्रौढ वयांतहि पुनर्विवाह केल्यास समाज तिकडे डोळेझांक करतो. मुली **बी. ए.** झालेल्या आहेत, **एम्. ए.** झालेल्या आहेत, बायका म्युनिसिपालिटींत शिरल्या आहेत, कौन्सिलांतहि शिरण्याच्या बेतांत आहेत. केशवपनाचें आतां कुणी नांव काढीत नाहीं व जातीजातींत लग्नें झालीं तरी समाजाला चालतात. "अस्पृश्यां"ना कोणीं जवळ घेतल्यास तो वाळींत पडत नाहीं, त्यांच्या पंक्तीला जेवल्यासहि समाज चालवून घेतो. अस्पृश्यांना देवळांत येऊं दिलें पाहिजे असें कांहीं लोकांना कां होईना, पण वाटूं लागलें आहे, आणि त्यांना पाणी भरूं देण्या-

बद्दल जागोजागीं ठराव झालेले आहेत. ते कोणी अंमलांत आणलेले नाहींत व ते अंमलांत आणूं द्यायचीहि आज कोणाची इच्छा नाहीं, पण दुराग्रहाचा हाहि ताण फार दिवस टिकेल असें वाटत नाहीं. नेटानें प्रयत्न केल्यास अस्पृश्योद्धार हा केवळ दहा पांच वर्षांचा प्रश्न राहिलेला आहे. बाहेर देशीं आतां सर्व लोक बिनदिक्कत जात असतात व येतांना एखादी परजातींतली बायकोहि करून घेऊन येतात. हिंदुधर्मांतून परधर्मांत गेलेले आतां सररहा हिंदुधर्मांत परत येतात, एवढेंच नव्हे तर एखादा अस्सल, जातिवंत मुसलमान किंवा युरोपियन् हिंदु झाल्यास त्यालाहि हिंदुधर्मांत जागा मिळते. खाद्यपेयांसंबंधानें डॉ. मुंजांसारखे हिंदु सभेचे अध्यक्षहि मांसाहारापर्यंत ब्राह्मणांना मुभा देत आहेत, तेव्हां आतां खाद्यपेयाच्या प्रश्नाचाहि बाऊ राहिलेला नाहीं हें उघड आहे.

म्हणजे **ज्योतिबांनीं** ज्या मुद्यांसाठीं परिश्रम सुरू केले, ज्यासाठीं कै. **भांडारकर** खपले, ज्यासाठीं कै. **महादेव गोविंद रानडे** झगडले किंवा ज्यासाठीं स्वामी **दयानंद** ह्यांनीं आर्यसमाज सुरू केला ते सर्व मुद्दे आज सनातन हिंदु धर्मानें कबूल केलेले आहेत. पन्नास पाऊणशें वर्षांपूर्वी असें वाटत होतें कीं ह्यांपैकीं एकेक मुद्दा प्रस्थापित करायला एकएक शतक लागेल. पण हे सर्व मुद्दे अर्ध्या पाऊण शतकांच्या आंतच हिंदुधर्मानें कबूल केले आहेत. हें श्रेय बंडखोरांचें कीं बिनबंडखोरांचें, आघाडीच्या शिपायांचें कीं गांवांतल्या रहिवाशांचें—हें ठरविणें खरोखर कठिण आहे. खरें म्हटलें म्हणजे हें सर्वांचें संकलित श्रेय आहे. ह्यांत बंडखोर आणि बिनबंडखोर ह्या दोघांचाहि सारखा वांटा आहे. **ज्योतिबा** फुले क्रांतिकारक होते, **आगरकर** क्रांतिकारक होते, **रानडे, भांडारकर** क्रांतिकारक होते, बाबू **देवेंद्रनाथ** क्रांतिकारक होते, **दयानंद** क्रांतिकारक होते—ह्याचे उलट लो. **टिळक**, पंडित **मदनमोहन मालवीय, सुरेंद्रनाथ बानर्जी, श्रीमद्विवेकानंद** किंवा **स्वामी रामतीर्थ** ह्यांनीं स्वतःस कधींहि क्रांतिकारक म्हणविलें नाहीं. परंतु दोघांचें एकच कार्य झालें.

ह्यांनीं त्यांना ओढलें, त्यांनीं ह्यांना ओढलें. ह्यांनीं त्याच्यावर झोड उठविली, त्यांनीं ह्यांच्यावर झोड उठविली. पण अखेरीस सर्व एका "भूमिके"वर उभे राहिले. लो. टिळकांचे शिष्य म्हणविणारे **डॉ. मुंजे** व महात्मा ज्योतिबा फुले ह्यांचे शिष्य म्हणविणारे श्री. **भास्करराव जाधव** ह्यांचे विचारप्रांत आज अगदीं एकच आहेत. फक्त लेबलें निराळीं आहेत.

आणि ह्यावरूनच **सत्यशोधक** समाजानें आज काय केलें पाहिजे हें सहज दिसून येणारें आहे. जोंपर्यंत सनातन हिंदु समाज हा आडमुठा होता, तोंपर्यंत बंडखोर किंवा क्रांतिकारक हें रूप त्याला अवश्य होतें. पण ज्या अर्थी तो आज आडमुठा राहिलेला नाहीं त्या अर्थी तें बंडखोरीचें स्वरूप आज ठेवायचें कांहीं कारण नाहीं. जोंपर्यंत किल्ल्याचा दरवाजा उघडला जात नव्हता, तोंपर्यंत तरवारीचे हात करणें जरूरीचें होतें, पण किल्ला उघडून दिवाणखान्यांत बोलावणें आलें असतांहि पट्टयाचे हात करीत आंत शिरणें· ह्याचेयोगानें विनाकारण द्वेषभाव धुमसतो. **आर्य-समाजा**नें हें चटकन् ओळखून त्याप्रमाणें गेल्या चारपांच वर्षांत आपलें धोरण बदललें. त्यामुळें दहा वर्षांपूर्वीं जो आर्यसमाज हिंदु समाजाला शत्रुसारखा भासत होता तो आज मित्रासारखा भासूं लागला आहे. नाहीं-तर पूर्वीच्या आमदानींत स्वामी श्रद्धानंदांचें एवढें वजन पडायची काय छाती होती ? आज स्वामी श्रद्धानंद हे क्रांतिकारक पक्षाचे आहेत असें कोणीहि मानीत नाहींत. ते सनातन धर्माचे अध्वर्यु असे मानले जातात आणि त्यांच्यासाठीं प्रत्येक घरांत आणि प्रत्येक झोंपडींत अश्रूंचे पूर लोटतात.

ह्या बाबतींत श्री शिवाजी महाराज ह्यांचें उदाहरण फार लक्ष्यांत ठेवलें पाहिजे. मनुष्य नवीन कार्य अंगावर घेतो किंवा नवीन कल्पना काढतो त्या वेळीं तो क्रांतिकारक समजला जाणें अगदीं अपरिहार्य आहे, परंतु पुढें त्यास क्रांतिकारकाचा झगा टाकून उद्धारकाचा झगा घेणें इष्ट असतें. कोणतीहि क्रांति घेतली तरी तो जुन्या कल्पनेचा सुधार किंवा जुन्या

तत्त्वाचा उद्धारच असतो. मनुष्य स्वतःस शेवटपर्यंत क्रांतिकारक ह्मणवून घेईल तर त्याच्याविषयीं लोकांच्या मनांत आपुलकी उत्पन्न होणार नाहीं. क्रांतिकारक मनुष्याविषयीं लोकांच्या मनांत विस्मय व आदर उत्पन्न होतो, पण आपुलकी उत्पन्न होत नाहीं. आपुलकी उत्पन्न व्हायला क्रांतिकारकाचा वेष प्रतिकूल आहे. आपुलकी उत्पन्न व्हायला लोकांना असें मनापासून वाटलें पाहिजे कीं हा मनुष्य जुनें तत्त्व ज्यास्त सुकर स्वरूपांत मांडायला आलेला आहे–तो पहिलें घर मोडायला आलेला नसून जुनें घर ज्यास्त मोठें करायला आणि त्याला रंगसफेती द्यायला आलेला आहे.

श्रीशिवाजीमहाराज क्रांतिकारक आहेत अशी त्यांच्याविषयींची कल्पना जावळीच्या प्रकरणापर्यंत लोकांत होती. जावळीच्या मोऱ्यांकडून श्रीशिवाजी महाराजांना जो इतका विरोध झाला त्याचें कारण हे कोणीतरी विचारशून्य क्रांतिकारक आहेत अशी लोकांची समजूत होती. बंडखोरांविषयीं लोकांच्या मनांत आदर व विस्मय असतो व 'वाः रे बहादूर' असें ते त्याच्याविषयीं मनांत म्हणतात, पण त्यांस कांहीं ध्येय आहे असें लोक मानीत नाहींत. श्रीशिवाजीमहाराजांनीं तोरणा वगैरे घेतला त्या वेळीं लोकांना विस्मय वाटला, पण हा हिंदु स्वराज्याचा ध्येययुक्त प्रयत्न आहे अशी चन्द्रराव मोऱ्यांच्या प्रकरणापर्यंत लोकांस खात्री पटलेली दिसत नाहीं. मोऱ्यांनींहि श्रीशिवाजीमहाराजांस विरोध केला त्याचें कारण हे कोणीतरी द्वाड व दंगेखोर आहेत अशी त्यांची समजूत होती. चंद्रराव मोरे वगैरे लोक धर्माभिमान किंवा राष्ट्राभिमान ह्यांच्या अगदीं विरहित होते अशी जी आपण कल्पना करतों ती आपली चूक आहे. ते धर्माभिमानशून्य किंवा राष्ट्राभिमानविवर्जित मुळींच नव्हते. परन्तु मनुष्य कितीहि स्वदेशाभिमानानें भरलेला असला तरी तो **तंट्या भिल्ल** किंवा **बाबू चष्मेवाला** ह्यास मदत करील काय ? कधींहि करणार नाहीं.

जावळीच्या मोऱ्यांनींहि ह्याच कारणामुळें श्रीशिवाजीमहाराजांना मदत केली नाहीं. ते त्यांच्याशीं युद्ध करायला उभे राहिले. तें बंड मोडायचा

त्यांनीं विचार केला. जावळीप्रकरणानंतर लोकांस श्रीशिवाजीमहाराजांच्या स्वराज्यध्येयाची ओळख वाटायला लागली. ह्या वेळीं लोकांना समजायला लागलें कीं महाराज हे क्रांतिकारक नव्हेत—ते स्वराष्ट्रतारक व स्वधर्मोद्धारक आहेत. महाराष्ट्राचें राज्य काबीज करतांना इंग्रजसरकार देखील छत्रपतींचे प्रधान **पेशवे** हे राज्याची व्यवस्था नीट ठेवीत नसल्यामुळें छत्रपतींच्यातर्फे आपण पेशव्यांपासून राज्याचा ताबा घेत आहोंत असा जाहीरनामा काढावा लागला ! मग श्री शिवाजी महाराज हे तर प्रत्यक्षच स्वधर्मोद्धारक होते. तेव्हां जावळी प्रकरणानंतर त्यांच्याविषयीं लोकप्रेमाच्या महासागराला भरती येऊं लागली ह्यांत नवल तें काय ?

क्रांतिकारकांनीं क्रांतीच्या सुरवातीनंतर क्रांतीचा परका वेष फेंकून देऊन स्वधर्मोद्धारकाचा बाणा पत्करला असतां केवढें कार्य होतें ह्याचें आणखी एक उदाहरण म्हणजे महाराष्ट्रांतील संतांची कामगिरी होय ! महाराष्ट्रिय संतांनीं प्रचलित धर्मकल्पनांत भयंकर क्रांति केली ही गोष्ट निर्विवाद आहे. किंबहुना प्राचीन वैदिक कल्पनांवर बौद्धधर्मानें जेवढे आघात केले त्यापेक्षांहि महाराष्ट्रिय साधुसंतांनीं ज्यास्त केले.

वेद आम्हांसी रूसला
आह्मीं धरलें त्याच्या बाला

ह्या साधूसंतांच्या विनयोक्तीपेक्षां वेदांवर बौद्धधर्म काय ज्यास्त आघात करणार ? परंतु बौद्धधर्म हा क्रांतिकारक म्हणून आला—साधूसंत उद्धारक म्हणून आले. बौद्ध धर्मानें बंडखोरी आरंभली—साधूसंत संरक्षक म्हणून उभे राहिले. बौद्धधर्म शिव्याशाप देत आला—साधूसंतांनीं प्रेमाची भाषा केली. बौद्धधर्म बुडविण्याकरितां आला—साधूसंत नम्र वृत्तीनें उभे राहिले. बौद्धधर्माचे हातांत पठाणाचा सुरा होता—साधूसंतांनीं शस्त्रक्रियेचा चाकू उचलला. बौद्धधर्म वैदिक धर्माचें पोट फाडीन म्हणाला—साधूसंत ह्मणाले, आह्मांसहि पोट फाडायचें आहे, पण तें पुन्हां शिवायचें आहे. बौद्धधर्माजवळ विध्वंसनाचें कार्य होतें—साधूसंतांजवळ संस्थापनेचें कार्य

होतें. ह्याचा परिणाम असा झाला, कीं बौद्धधर्म हा लोकांना "आपला" असा कधींच वाटला नाहीं. अखेरीस श्रीशंकराचार्यांनीं त्याची उचलबांगडी केली. पण बौद्धधर्मापेक्षांहि ज्यास्त क्रांति करूनहि साधूसंत लोकांना आपलेसे वाटले व जनतेच्या देव्हाऱ्यांत ते कायमचे जाऊन बसले.

आर्यसमाज हे धोरण लवकर शिकला आणि म्हणून अखिल हिंदुसमाजास तो ज्यास्त प्रिय होऊं लागलेला आहे. **दयानंदां**च्या वेळीं हिंदुसमाजाचे व त्याचे उडालेले खटके आतां दोघेहि विसरून गेलेले आहेत व ते एकमेकांना ज्यास्त ज्यास्त मिठ्या मारूं लागले आहेत. प्रार्थनासमाजाच्या लक्ष्यांत अजून हें येत नाहीं व ब्राह्मणसमाजहि अजून हें शिकला नाहीं. पण ह्यामुळें हिंदुसमाजाचे मनांत अजूनहि त्यांच्याविषयीं परका भाव आहे. सत्यशोधक समाजाची भावी प्रगतिहि ह्याच मार्गानें व्हायला पाहिजे. प्रचलित हिंदुधर्माचे बालेकिल्ले आतां सर झालेले आहेत व हिंदु समाजानें आपखुषीनें किल्ल्याचे दरवाजे उघडलेले आहेत. तो सर्वांना आदबीनें दिवाणखान्यांत बोलावीत आहे. ह्या वेळीं गुरगुरण्याची, क्रोधाची, ईर्षेची, संतापाची किंवा क्रांतीची भाषा कशाला ?

**सत्यशोधक** समाजाला हें करणें फारसें अवघड नाहीं. उलट एका तऱ्हेनें त्यासहि ही गोष्ट फारच चांगल्या रीतीनें साधेल. **प्रार्थनासमाज** किंवा **ब्रह्मसमाज** ह्यांस ही गोष्ट इतकी साधणार नाहीं. **आर्यसमाजा**नें जनता व सुशिक्षित वर्ग ह्यांच्याशीं प्रथमपासून नातें जोडलेलें आहे, तसें नातें **सत्यशोधक** समाजानें जोडलेलें नसलें, तथापि जनतेचा आणि त्याचा संबंध आहे. लोकसमुदायाशीं इतका जिह्वाळ्याचा संबंध असल्यावर क्रांतिकारकाचा वेष टाकून संस्थापकाचा अधिकार उचलणें कितीसें अवघड आहे ? धर्मसंस्थापकांना जी अडचण पडते ती जनतेची अन्तःकरणें काबीज करण्यासंबंधाची असते. पण **सत्यशोधक** समाजास ती गोष्ट प्रथमपासूनच साध्य आहे. आतां फक्त सुशिक्षित उर्फ

विण्याचा प्रयत्न ह्यापुढें करणें इष्ट आहे. धर्मस्वातंत्र्याचें उच्च तत्त्व ज्याला ज्याला म्हणून पटेल त्याच्या त्याच्या मागें लागून त्यास आपल्यांत समाविष्ट केल्याशिवाय महात्मा ज्योतिबा फुल्यांनीं जो मार्ग चोखाळला त्या मार्गाचें पूर्ण चीज झालें असें ह्मणतां यायचें नाहीं. स्वातंत्र्याचा महामंत्र प्रत्येक व्यक्तीला द्यायचा आणि जो जो भेटेल त्याच्या पायांतील बेड्या तोडून टाकायच्या असा सररहा प्रयत्न केल्याशिवाय ज्या उद्देशानें महात्मा ज्योतिबा फुले ह्यांनीं सत्यशोधक स्थापला त्या उद्देशाला पुरा वाव कसा मिळेल? स्वातंत्र्याचा हा मंत्र सररहा देत असतांना ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असा भेद पाळणें शक्य नाहीं. स्वातंत्र्याचीं तत्त्वें म्हणजे आकाशांतील निर्मळ वातावरणांतून येणारा स्वातंत्र्याचा अमृतपर्जन्य आहे. तो सर्वांच्याकरितां आहे व सर्वांना त्याचा मुबलक लाभ देणें हेंच योग्य आहे.

प्रस्तुतचा हिंदुसमाज जरी तत्त्वदृष्ट्या सर्वांच्यासाठीं असला तरी त्यांत आज अनेक वर्गांना मज्जाव आहे. "अस्पृश्य" ह्मणून गणला जाणारा वर्ग तर इतका दुर्दैवी आहे कीं त्याला आजच्या हिंदुधर्मापासून फारच थोडा लाभ आहे. अशा रीतीनें एकलकोंडा बनलेल्या हिंदु समाजाचीं तत्त्वें जरी कितीहि संग्राहक असलीं तरी त्या तत्त्वांचा कांहींएक उपयोग नाहीं. नुसतें तत्त्व म्हणजे कृति नव्हे—नुसतें तत्त्व ह्मणजे लोकांचा उपयोगहि नव्हे. तत्त्व ज्या वेळीं कृतींत उतरतें त्याच वेळीं त्या तत्त्वाचा फायदा होतो. हिंदुधर्म आज अनेक वर्षें किंवा अनेक शतकें जो विजयाला मुकलेला आहे त्याचें कारण त्यानें तत्त्व ठेवलें, पण कृति टाकली! हिंदुधर्माला अशा रीतीनें उपयोगशून्यता आली. इतका सुंदर हिंदुधर्म, पण तो निरर्थक किंबहुना अनर्थकारक झाला. ही चूक **सत्यशोधक** समाजानेंच काय, पण कोणत्याहि धार्मिक चळवळीनें करतां उपयोगी नाहीं. धार्मिक चळवळींनीं अन्यायांच्या पाठीमागें लागावें, पण व्यक्तींच्या किंवा समाजांच्या पाठीमागें लागूं नये!

अन्याय करणाऱ्या व्यक्तिहि न्यायाच्या इच्छेनें प्रवृत्त झालेल्या असतात. हिंदूंवर जुलूम करणारा औरंगजेबहि आपण अल्लाची सेवा

पांढरपेशा समाज उरलेला आहे. ब्राह्मणवर्ग ह्याच वर्गांत येतो. ब्राह्मण ह्मणजे भट नव्हेत. उलट भटशाहीपासून ब्राह्मणेतरांवर जितका जुलूम होतो तितकाच किंबहुना त्याहूनहि ज्यास्त जुलूम ब्राह्मणवर्गावर होतो. ब्राह्मणेतर वर्गाइतकाच ब्राह्मणवर्ग कींव करण्याजोगा आहे. समाज तारायचा, राष्ट्र उद्धरायचें, लोकांना सन्मार्गाला लावायचें, त्यांत ब्राह्मण कसले आणि ब्राह्मणेतर कसले ? तुकाराम महाराजांनीं ब्राह्मणांसाठीं एक गाथा आणि ब्राह्मणेतरांसाटीं दुसरा गाथा लिहिला नाहीं. एकनाथांनीं ब्राह्मणांसाठीं एक रामायण व ब्राह्मणेतरांसाठीं दुसरें रामायण लिहिलें नाहीं. नामदेवांनीं ब्राह्मणांसाठीं एक प्रार्थना व ब्राह्मणेतरांसाठीं दुसरी प्रार्थना लिहिली नाहीं. 'धर्मस्थापनेचे नर'–त्यांना सर्व समाज सारखा ! पर्जन्याप्रमाणें सर्वांवर सारखी उपदेशवृष्टि करायला ते तयार असतात. ज्यांना हवी असेल त्यांनीं ती घ्यावी आणि स्वतःचा उद्धार घडवून आणावा. ज्यास ती नको असेल त्यांनीं ती वृष्टि होत असतां खुशाल दुरभिमानाच्या छत्र्या धराव्या. त्याबद्दल कुणाची ना असणार ?

पण ह्याला आपण बंडखोर नाहीं तर संस्थापक आहोंत ही जाणीव सत्यशोधक समाजांत वाढली पाहिजे. अजून त्याच्यांतील तरुण अनुयायांच्या डोळ्यांवर धर्मक्रांतीची लाली आहे. अजून त्यांचें मन बंडाच्या आवेशानें खवळलेलें आहे. अजून त्यांच्या कानांत तरवारींचा खणखणाट आहे. हा तरवारींचा खणखणाट एके काळीं योग्य होता. एके काळीं तरवार मारून प्रचलित हिंदुधर्मसमजुतीचे तट फोडून जायचें होतें. परंतु आतां त्यांची जरूरी नाहीं. आतां स्वातंत्र्यतत्त्वाचे पुरस्कर्ते, हिंदुधर्मातील नवीन युगाचे प्रचारक, हिंदुस्थानच्या नवजीवनाचे संस्थापक ह्या नात्यानें सर्व समाजाकडे बघितलें पाहिजे व ह्या नात्यानेंच सर्वांशीं आचरण ठेवलें पाहिजे.

आणि असें आचरण ठेवायचें म्हणजे ब्राह्मण ब्राह्मणेतर हा भेद सत्यशोधक समाजानें करतांच उपयोगी नाहीं. सत्यशोधक समाजानें धर्मस्वातंत्र्याचें विशाल ध्येय सर्व लोकांपुढें एकदम ठेवून तीं तत्त्वें सर्वदूर बिंब-

विण्याचा प्रयत्न ह्यापुढें करणें इष्ट आहे. धर्मस्वातंत्र्याचें उच्च तत्त्व ज्याला ज्याला म्हणून पटेल त्याच्या त्याच्या मागें लागून त्यास आपल्यांत समाविष्ट केल्याशिवाय महात्मा ज्योतिबा फुल्यांनीं जो मार्ग चोखाळला त्या मार्गाचें पूर्ण चीज झालें असें ह्मणतां यायचें नाहीं. स्वातंत्र्याचा महामंत्र प्रत्येक व्यक्तीला द्यायचा आणि जो जो भेटेल त्याच्या पायांतील बेड्या तोडून टाकायच्या असा सररहा प्रयत्न केल्याशिवाय ज्या उद्देशानें महात्मा ज्योतिबा फुले ह्यांनीं सत्यशोधक स्थापला त्या उद्देशाला पुरा वाव कसा मिळेल ? स्वातंत्र्याचा हा मंत्र सररहा देत असतांना ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर असा भेद पाळणें शक्य नाहीं. स्वातंत्र्याचीं तत्त्वें म्हणजे आकाशांतील निर्मळ वातावरणांतून येणारा स्वातंत्र्याचा अमृतपर्जन्य आहे. तो सर्वांच्याकरितां आहे व सर्वांना त्याचा मुबलक लाभ देणें हेंच योग्य आहे.

प्रस्तुतचा हिंदुसमाज जरी तत्त्वदृष्ट्या सर्वांच्यासाठीं असला तरी त्यांत आज अनेक वर्गांना मज्जाव आहे. "अस्पृश्य" ह्मणून गणला जाणारा वर्ग तर इतका दुर्दैवी आहे कीं त्याला आजच्या हिंदुधर्मापासून फारच थोडा लाभ आहे. अशा रीतीनें एकलकोंडा बनलेल्या हिंदु समाजाचीं तत्त्वें जरी कितीहि संग्राहक असलीं तरी त्या तत्त्वांचा कांहींएक उपयोग नाहीं. नुसतें तत्त्व म्हणजे कृति नव्हे—नुसतें तत्त्व ह्मणजे लोकांचा उपयोगहि नव्हे. तत्त्व ज्या वेळीं कृतींत उतरतें त्याच वेळीं त्या तत्त्वाचा फायदा होतो. हिंदुधर्म आज अनेक वर्षे किंवा अनेक शतकें जो विजयाला मुकलेला आहे त्याचें कारण त्यानें तत्त्व ठेवलें, पण कृति टाकली ! हिंदुधर्माला अशा रीतीनें उपयोगशून्यता आली. इतका सुंदर हिंदुधर्म, पण तो निरर्थक किंबहुना अनर्थकारक झाला. ही चूक **सत्यशोधक** समाजानेंच काय, पण कोणत्याहि धार्मिक चळवळीनें करतां उपयोगी नाहीं. धार्मिक चळवळींनीं अन्यायांच्या पाठीमागें लागावें, पण व्यक्तींच्या किंवा समाजांच्या पाठीमागें लागूं नये !

अन्याय करणाऱ्या व्यक्तिहि न्यायाच्या इच्छेनें प्रवृत्त झालेल्या असतात. हिंदूंवर जुलूम करणारा औरंगजेबहि आपण अल्लाची सेवा

करीत आहोंत ह्या समजुतीस बळी पडलेला असतो. त्या वर्गातील इतर व्यक्ति तर केवळ अनुकरणानें चाललेल्या असतात. त्यांची ती " मनोवृत्ति " बदलणें हें खरें शहाणपण आहे—ह्यांत खरा विजय आहे. त्या व्यक्तींच्या किंवा त्या समाजाच्या पाठीमागें लागून एका विशिष्ट वर्गावर रोख धरणें हें व्यापकत्वाला व विजयाला बाधक आहे. विरोधी समाज आपल्या उपदेशानें वळविण्याचें सामर्थ्य आपल्या अंगांत पाहिजे—त्याच्यावर जिह्वा अथवा तरवार ह्यांचे प्रहार करण्यानें मतांचा प्रसार होत नाहीं. उपदेशाच्या माधुर्याची ऊब हळुहळु वाढवा म्हणजे—मनुष्य आपल्या जुन्या मतांचें पांघरूण आपोआप टाकून देतो. त्यास धोपटीत सुटा कीं तो तुमचा शत्रु होतो, तो प्रतिकाराची इच्छा धरतो, तो स्वतःत सुधारणा करून तुमच्यापेक्षां एवढा श्रेष्ठ होण्याचा संभव असतो कीं तुह्मांला पराभव द्यायला तो समर्थ होतो. नेपोलियनला आपले शत्रु बडवितां आले, पण जिरवितां आले नाहींत, ह्मणून तेच शत्रु त्याच्यांच विद्येच्या जोरावर त्याचा पाडाव करण्यास समर्थ झाले. औरंगजेबानें हिंदुलोकांवर एवढा कटाक्ष ठेवला ह्मणूनच त्यांच्यांत श्रीशिवाजी महाराज उत्पन्न होऊन त्यांनीं औरंगजेबाच्या देखत त्याच्या कार्याचा विध्वंस केला. बौद्ध लोकांनीं जें कार्य उचललें तेंच साधुसंतांनीं त्यांच्यापेक्षांहि यशस्वी केलें. पण बौद्ध लोकांना विरोधी पक्ष पचवितां न आल्यामुळें ते अखेरपर्यंत परकेच राहिले—आणि क्रांतिकारकांपेक्षांहि ज्यास्ती क्रांति करून महाराष्ट्रिय संत महाराष्ट्रिय जनतेचे पंचप्राण झाले—त्यांच्या स्नेहबिंदूंतील स्नेह व रक्तबिंदूंतील तेज बनले !

थोर लोक अन्यायांकडे पाहतात—ज्यांचेतून अन्याय उत्पन्न होतो त्या व्यक्तींकडे किंवा समाजाकडे पहात नाहींत. त्या थोर लोकांचा हा जन्मसिद्ध स्वभाव आहे आणि ह्मणून त्यांच्या हातांत ऋद्धिसिद्धि तयार असतात. थोरांचें थोर कार्य चाललें असतां अमुक कोणत्या जातीचा, आणि तमुक कोणत्या जातीचा, हा क्षुद्र विचार त्यांना स्पर्शहि करीत नाहीं. ते कार्याकडे

दृष्टि ठेवतात व त्या कार्यास जे हातभार लावतात ते त्यांचे प्यारे बनतात! पहिल्या बाजीराव साहेबांनीं हा ब्राह्मण, हा मराठा, हा धनगर, असला क्षुद्रभाव विपाप्रमाणें दूर ठेवून आपल्या देणग्यांची खैरात मर्दुमकीच्या लायकीप्रमाणें सर्वांवर केली आणि म्हणूनच **शिंदे, होळकर** हीं घराणीं उदयाला येऊन महाराष्ट्राच्या पडत्या काळांतदेखील तीं आज मराठ्यांची कीर्ति, इभ्रत व अब्रू सांवरून धरीत आहेत. निजामशहाला क्षणोक्षणीं लढाईत लोळवत असतांहि मुसलमानांचा द्वेष बाजीरावानें स्वप्नांतहि केला नाहीं. एवढेंच नव्हे तर मुसलमानी राजसत्तेला धुळीला मिळविणाऱ्या ह्या बहाद्दराच्या मर्दुमकीकडे पाहून **मस्तानी**सारखी एक मुसलमान तरुणीहि त्यांचेवर फिदा झाली! हिंदुधर्मांत जो येईल त्याच्या कुळशीलाकडे न पाहतां त्यास **मराठा** जातींत सामील करण्याची अत्यन्त उदार कल्पना श्री. **जवळकरां**नीं काढलेली आहे आणि ती इतकी थोरपणाची आहे कीं तिला सीमाच नाहीं. श्रीमंत बाजीरावसाहेबांनींहि मस्तानीच्या मुलाची मुंज करून त्यास हिंदुधर्मांत सामील करून घ्यायची कल्पना दोनशें वर्षांपूर्वीच्या त्या जुन्या काळांत काढली! महाराष्ट्राच्या सरहद्दीवर जर त्या वेळीं शत्रु खडे नसते तर ज्याप्रमाणें कै. श्रीशाहुमहाराजांनीं कोल्हापुरच्या **खोचीकरां**स एका मुसलमान स्त्रीचेपासून झालेलीं मुलें **मराठा** जातींत सामील करून घेऊन हिंदुधर्माचें सौभाग्य वाढविलें त्याप्रमाणें बाजीरावसाहेबांनींहि मुसलमान स्त्रीच्या पोटच्या मुलाची मुंज गाजवून हिंदुधर्माचें क्षेत्र वाढविलें असतें. कै. स्वामी **श्रद्धानंद** ह्यांनीं हिंदुधर्माचें विस्तारक्षेत्र अधिक विस्तीर्ण करून विश्वव्यापकत्वाची शोभा त्यास आणण्याचा जो प्रयत्न केला त्यास बीजभूतानें कै. श्रीमंत बाजीरावसाहेबांचेहि प्रयत्न साहाय्यभूत झालेले आहेत. थोर माणसें जातपात पहात नाहींत—कार्य पहातात. त्यांचा रोख जुलमावर असतो, जुलूम करणाऱ्या व्यक्तींवर नसतो.

ह्याचें बाजीरावसाहेबांपेक्षांहि मोठें उदाहरण ह्मणजे वर सांगितल्याप्रमाणें श्रीशिवाजीमहाराजांचें होय! बाजीरावसाहेब मुसलमानी सत्तेविरुद्ध

लढत असतांहि मुसलमान जातीवर ज्याप्रमाणें रोख धरीत नसत त्याप्रमाणेंच श्रीशिवाजी महाराजांचाहि मुसलमान जातीवर रोख नव्हता. कल्याणच्या मुसलमान सुभेदाराची सून त्यांनीं केवळ्या उदार पवित्रतेनें तिच्या पतीकडे पाठविलें ह्याची साक्ष इतिहासाच्या परममंगल विजयघंटा देत आहेत. त्यांनीं आपल्या सैन्यांत मुसलमान लढवय्ये ठेवले—आपल्या आरमारांत मुसलमान "ऑफिसर" नेमले. दिल्लीपति औरंगजेबाच्या मगरमिठींतून मोठ्या हिकमतीनें स्वत:ची सुटका करून घेत असतां त्यांना त्यांत सहाय्य करणारा कोण होता ? तर एक **मुसलमान** सेवक! हिरोजी फर्जंदाप्रमाणें औरंगजेबाच्या रागाचा सपाटा सहन करायला तो उभा राहिला—त्यानें आपली मान दिली, पण इमान सोडलें नाहीं.

पण श्रीशिवाजी महाराजांच्या मनाचें अत्यंत मोठें औदार्य ह्मणजे आपल्या राज्याभिषेकाच्या वेळीं त्यांनीं दाखविलेली शांति होय ! ते राज्याभिषेक करायला निघाले असतां ज्या वेळीं महाराष्ट्रांतील भिक्षुक-वर्गानें " आम्ही तुह्मांस राज्याभिषेक करीत नाहीं " असें साफ उत्तर दिलें, त्या वेळीं एखादा **बाबुराव यादव** असता तर त्यानें डोक्यांत राख घातली असती—एखादा **आंबेडकर** असता तर " ह्यापेक्षां मी मुसलमान होईन " असा त्यानें धाक दाखविला असता—एखादा **औरंगजेब** असता तर त्यानें ब्राह्मणवर्गाची कत्तल करण्याचा हुकूम फर्मावला असता ! परंतु श्रीशिवाजी महाराजांनीं ह्यांपैकीं कांहींएक केलें नाहीं. महाराष्ट्रिय भिक्षुक-वर्गास मान्य असलेल्या श्रीकाशीक्षेत्रांतील एक पंडित त्यांनीं आणविला व त्याचेकडून राज्याभिषेक करवून घेऊन महाराष्ट्रिय भिक्षुकवर्गाचा विरोध नाहींसा केला! ह्या अलौकिक उदार वर्तनाचीं अमृततुल्य फळें महाराष्ट्रास पुढें चाखायला मिळालीं ! ब्राह्मणांपासून तों अत्यंत अशिक्षि-तांपर्यंत सर्व वर्ग महाराजांवर दिलखुष राहिले आणि संभाजी महाराजांनंतर महाराष्ट्राची गादी जिंजीला गेली असतांहि महाराष्ट्रांतील सर्व वर्ग एक होऊन त्यांनीं महाराष्ट्राच्या शत्रूंना येथून पिटून काढले. महाराष्ट्राच्या

इतिहासांतील हा भाग ह्मणजे कैलासवासी झालेल्या श्रीशिवाजी महाराजां-नंतर जोमानें जिवंत राहिलेल्या त्यांच्या कर्तबगारीचा उत्तमोत्तम गाभा होय ! ह्या प्रसंगाचें वर्णन करीत असतां युरोपियन् इतिहासकारहि गहिंवरतात–पाझरतात–जगाच्या इतिहासांतील अत्यंत विरळ अशा प्रसंगां-पैकींच हा प्रसंग होय असें कबूल करतात ! त्रिकालकीर्ति शिवाजी महा-राजांच्या हिमालयोत्तर उदार वृत्तीचाच हा विजय होय ! त्याचाच हा दुमदुमाट–त्याचाच हा घमघमाट !

पण इथें असा प्रश्न उद्भवतो कीं एक घाव दोन तुकडे करून एखादें कार्य जर सहज साधण्याजोगें आहे, तर तेथें उदारपणाचे इतके वळसे कशाला ? पण त्याचें उत्तर असें आहे कीं एक घाव दोन तुकडे केल्यानें जय मिळाला असें तात्पुरतें वाटतें, पण तो जय खरा नसतो व तो टिकतहि नाहीं. जगांत असें एकहि तत्त्व नाहीं कीं जें "घाव" घातल्यामुळें तुटलेलें आहे. तें तितक्यापुरतें जरी दबलें तरी तें पुन्हां वर डोकें काढतें. ख्रिस्ती धर्मावर हत्यार चालवून एक घाव दोन तुकडे करण्याचा अनेक रोमन् बादशहांनीं प्रयत्न केला, पण ख्रिस्ती धर्माचें उच्चाटन हा ह्याचा परिणाम न होतां उलट **रोम** ही ख्रिस्ती धर्माची **मुख्य गादी** झाली. औरंगजेबाचें उदाहरण वर दिलेंच आहे. त्यानें जसे **संभाजी**महाराजांचे हाल केले, तसे शिखांचेहि हाल केले ! पण त्यामुळें मराठेहि बुडाले नाहींत व शीखहि बुडाले नाहींत ! उलट त्याचेमुळें औरंगजेब मात्र बुडाला ! त्याला मराठी मुलखांत येऊन कबर घ्यावी लागली व त्याच्या मरणास दहा बारा वर्षे होतात न होतात तोंच **बाळाजी विश्व-नाथा**ला दिल्लीस जाऊन सय्यद बन्धूविरुद्ध त्याच्या वंशजाला सहाय्य करावें लागलें. तेव्हां एक घाव दोन तुकडे करूं–चेचूं–ठोकूं–नेस्तनाबूद करूं–ही भाषाच चुकीची आहे. ह्या जगांत पचवितां येतें–खचवितां येत नाहीं. विरोधी पक्षाशीं शान्त वृत्तीनें वागून प्रेमाच्या उदरांत त्यांना पचविण्याचा प्रयत्न कराल तर ते पचतील, पण ठोसेबाजीखालीं त्यांना खचवूं असें मनांत

आणाल तर ते ज्यास्त बलाढ्य होतील. शान्तीच्या वृत्तीमध्यें स्वतःचा घात आहे ही कल्पना चुकीची आहे. श्रीशिवाजीमहाराजांनीं प्रतिपक्षाशीं उदारपणाचें वर्तन केलें म्हणून श्रीशिवाजीमहाराज नामशेष झाले नाहींत–प्रतिपक्षीच नामशेष झाले ! तुकाराममहाराजांच्या वह्या इंद्रायणींत बुडविल्या म्हणून तुकाराममहाराजांची अभंगवाणी नामशेष झाली नाहीं–प्रतिपक्षीच नामशेष झाले ! एकनाथाचे अंगावर त्याचे प्रतिपक्षी शम्भर वेळां थुंकले म्हणून एकनाथ नामशेष झाले नाहींत–प्रतिपक्षीच नामशेष झाले.

प्रतिपक्षाचा विरोध नाहींसा करण्याचा उत्कृष्ट उपाय ह्मणजे जुलमाविरुद्ध मोहीम करणें–व्यक्तींविरुद्ध किंवा कोणत्याहि विशिष्ट वर्गाविरुद्ध मोहीम करणें नव्हे ! नवीन मत स्थापायचें म्हणजे जुन्या मताच्या विरुद्ध मोहीम करावीच लागते. पण जुन्या मताचे विरुद्ध ही जी मोहीम करायची त्यांतील यशस्वी मार्ग ह्मणजे जुन्या मताचीं माणसें शांति आणि प्रेम ह्यांचे साधनांवर आपल्यांत आणून त्यांचीं मतें पचवून टाकणें–जुन्या मतांच्या लोकांवर आघात करून त्यांना विह्वळ करणें नव्हे ! विह्वळ करण्याच्या मार्गानें तेढ वाढते, शत्रुत्व वाढतें, विरोधी पक्ष बळावतो, विजय दूर होत जातो.

पण शांति धरणें ह्मणजे तडजोड करणें किंवा आपलीं मतें सोडून देणें असाहि त्याचा अर्थ नाहीं. Truth knows no compromise–सत्याला समेट आवडत नाहीं. दोन आणि दोन ह्मणजे चारच ! ते तीनहि नव्हेत किंवा पांचहि नव्हेत. प्रतिपक्ष्यांना खूप करण्याकरितां जर आपण दोन आणि दोन पांच असें कबूल करायला लागलों तर कोणत्याहि चळवळींत खरेपणा राहणार नाहीं. **सत्य** हा प्रत्येक चळवळीचा प्राण आहे. चळवळींत सत्य असेल तरच तिला यश येईल, नाहींतर येणार नाहीं. सूर्य पृथ्वीचे भोंवती फिरत नसून पृथ्वी सूर्याचे भोंवती फिरते असे जेव्हां **कोपर्निकस**नें प्रतिपादन केलें त्या वेळीं **पोप**नें त्याचेवर बहिष्कार टाकून त्याचा पुष्कळ छळ केला. पण इतका छळ सोसूनहि **पृथ्वी फिरते हेंच खरें** असें ह्मणायला तो कचरला नाहीं. **शांति** ह्याचा अर्थ आपलीं

तत्त्वें सोडून देणें नव्हे. **शांति** ह्याचा अर्थ मेंगेपणाहि नव्हे. **शांति** ह्याचा अर्थ अजागळपणाहि नव्हे. **शांति** ह्याचा अर्थ अपमान सोसणेंहि नव्हे. जो आपला अपमान करील त्याला तिथल्या तिथें चटकणी दिलीच पाहिजे. जो आपल्या अंगावर येईल त्यास लोळविलाच पाहिजे. गबाळी पोषाख करून लोकांच्या दयेला पात्र होणें हाहि **शांति** शब्दाचा अर्थ नाहीं. जरा नीटनेटका किंवा गहिरा पोषाख केला, मिशीवर पीळ दिला किंवा दंडाचा आवाज केला ह्मणून **शांति** बिघडत नाहीं. **शांति** ही **स्वाभिमान** किंवा **कुरेंबाजपणा** ह्यांची द्वेष्टी नव्हे. **शांति** ह्याचा अर्थ कोणाचाहि द्वेष न करणें. **शांति** ह्याचा अर्थ शक्य तितकें दुसऱ्याशीं जमवून घेणें. **शांति** ह्याचा अर्थ कुरापती उकरून न काढणें. **शांति** ह्याचा अर्थ समाजाच्या अन्तःकरणावर आपलीं तत्त्वें ठसविण्याकरितां **ठोसेबाजी**च्या ऐवजीं **समजुती**च्या मार्गाचा अवलंब करणें ! ह्या मार्गास जरा उशीर लागतो. ठोसेबाजीइतकें तात्कालिक यश त्यास येत नाहीं. पण जें यश येतें तें कायमचें असतें. ठोसेबाजीचें यश ठोसेबाजीबरोबरच जातें, पण कोणत्याहि व्यक्तीचा किंवा वर्गाचा द्वेष न करतां समजुतीच्या, स्वार्थत्यागाच्या व सत्यप्रतिपादनाच्या मार्गानें मिळविलेलें यश कधींहि नाहीसें होत नाहीं.

**ब्राह्मण**वर्ग आणि **भिक्षुक**वर्ग हे दोन वर्ग जर आपण घेतले तर त्यांतील **ब्राह्मण**वर्ग हा **भटशाही**च्या दोषांपासून मुक्त आहे हें मीं मागें दाखविलेंच आहे. तो स्वतःच **भटशाही**च्या जुलमाचा बळी आहे. त्यानें भटशाहीचे जुलूम कोणावर कधींहि केले नाहींत व ते करण्याची त्याची प्रवृत्तिहि नाहीं. भिक्षुकवर्गाचीं 'पातकें' ब्राह्मणवर्गावर विनाकारण बसविलीं गेलीं आहेत आणि त्यामुळें भिक्षुकवर्गाच्या नालस्तीचे वरवण्टे ब्राह्मणवर्गावर विनाकारण फिरविले गेलेले आहेत. वस्तुतः हिंदुस्थानांत जसे बाकीचे समाज आहेत, तसाच ब्राह्मण समाज आहे. ते जसे उद्योगी आहेत, तसाच हाहि उद्योगी आहे. ते जसे पापभीरु आहेत, तसाच हाहि पापभीरु

आहे. भटशाहीचीं जीं सुखदुःखें त्यांना आहेत, तींच ह्यासहि आहेत. मीं वर दाखविल्याप्रमाणें इतर समाजांशीं तुलना करतां ब्राह्मण समाज संपत्तीनेंहि अधिक नाहीं. जमीन महसूल व इन्कमटॅक्स ह्या ज्या सरकारी उत्पन्नाच्या दोन बाबी त्यांत ह्यांचें नांव फारच खालीं आहे.

मग **भट**शाही ही कोण? **भट**शाही ह्मणजे प्रचलित धर्मसमजुतींची अंमलबजावणी करण्याकरितां जो एक विशिष्ट वर्ग प्रत्येक समाजांत निर्माण झालेला असतो ती **भट**शाही! सरकारी कायद्यांची अंमलबजावणी करण्या-करितां जसे सरकारी अधिकारी नेमलेले असतात, तसाच हा एक अधिकारी वर्ग प्रत्येक राष्ट्रांत निर्माण झालेला असतो. ह्यास वेतन कोठें **दक्षिणे**च्या रूपानें देण्यांत येतें व कोठें पगाराच्या रूपानें देण्यांत येतें. हिंदुधर्माची प्रवृत्ति प्रायः लोकशाहीकडे असल्यामुळें हिंदुधर्मांत **दक्षिणे**चें रूप जास्त प्रचलित आहे. हिंदुधर्मांत उत्पन्नें, पगार किंवा अग्रहार नाहींत असें नाहीं. धर्मस्थानांचा प्रश्न ह्यामुळेंच वारंवार उत्पन्न होतो. पण अशीं उत्पन्नें असणारे भिक्षुक एकंदरींत थोडे! मुख्यतः त्यांच्या निर्वाहाची बाब ह्मणजे भोजन व दक्षिणा! पण ह्यामुळें त्यांचा उदरनिर्वाह **दिवाणांच्या पगाराप्रमाणें** लोकमतांवर अवलंबून बसलेला आहे. लोकांत श्रद्धा असेल तर ते त्यांना दक्षिणेला आणि भोजनाला बोलावतील, नाहींतर नाहीं. **बोले** बिलानें तर त्यांना लोकांच्या ज्यास्तच मुठींत आणून ठेवलेलें आहे. परंतु इंग्लंडमधील **भट**शाहीचें तसें नाहीं. त्यांना ठराविक पगार आहेत व ते त्यांना सरकारी तिजोरींतून मिळत असतात. ह्यामुळें लोकांची धर्मश्रद्धा उडाली तरी भटांच्या पगाराला धोका नसतो. एवढेंच काय, पण इंग्लंडचा धर्म ख्रिस्ती असल्यामुळें जे ख्रिस्ती पाद्री हिंदुस्थानांत येतात, त्यांचा पगार हिंदुस्थानच्या तिजोरींतून बेधडक देण्यांत येतो. बापाच्या श्राद्धासाठीं भटाला बोलावलें ह्मणजे त्याला विनाकारण जेवण व दक्षिणा द्यावी लागते असें आपण अनेक वेळां ह्मणतों, पण निदान तो बापतरी आपला असतो. पण इंग्रज लोकांच्या बापासाठीं जीं श्राद्धें हिंदुस्थानांत करण्यांत

येतात त्यांची दक्षिणा ते हिंदुस्थानच्या तिजोरींतून ह्मणजे आपल्याकडून घेतात. ह्मणजे बाप त्यांचा व दक्षिणा आमची! किती हा विचित्र प्रकार!

हें सर्व सांगण्याचें कारण इतकेंच कीं **भट**शाही फक्त हिंदुस्थानांतच असल्याची जी आपली कल्पना आहे ती अगदीं मिथ्या आहे. सर्व जगांतील राष्ट्रांतून **भट**शाही आहे व चोहोंकडे ती सारखीच अज्ञानी, सारखीच जुलमी व सारखीच दुराग्रही आहे. ती जर कोठें कमी जाचक असेल तर ती हिंदुस्थानांतच आहे, कारण तिला राजाश्रय नाहीं. पण जेव्हां तिला राजाश्रय होता त्यावेळींहि जे राक्षसी प्रकार तिनें युरोपांत केले ते इकडे केले नाहींत. ह्याचें कारण अर्थातूच हिंदु धर्माचें परम उच्च तत्त्वज्ञान! ह्या तत्त्वज्ञानामुळें मनुष्य कितीहि दुष्ट झाला तरी त्याच्या आंगचें शील अजीबात नष्ट होत नाहीं. युरोपखंडांत तसें नाहीं! युरोपखंडांत तत्त्वज्ञानाचा जन्म अगदीं अर्वाचीन आहे आणि तोहि धर्माच्या संगतीनें झालेला नसून धर्माच्या छातीवर पाय देऊन झालेला आहे आणि त्यामुळें युरोपांत शीलाचा अंश साहजिकच कमी असतो. तेथें दुष्ट ह्मटला ह्मणजे अगदीं निखालस दुष्ट! त्यांत माणुसकीचा ओलावाहि दिसायचा नाहीं! आज देखील ख्रिस्ती मनुष्याला फार निर्बंध आहेत. खऱ्या ख्रिस्ती मनुष्याला रविवारीं सर्व गोष्टी करायची छाती नाहीं आणि त्याचप्रमाणें खऱ्या मुसलमानाला चित्रकलेला हात लावतां येत नाहीं! **बायबल** न शिकविणारी शाळा काढली ह्मणून अगदीं अलिकडे ह्मणजे १९०८ सालीं **स्पेन**मध्यें एका थोर पुरुषास फांशी देण्यांत आलें. दोन वर्षांपूर्वीं काडीमोड करण्याच्या कायद्याची इंग्लंडमध्यें दुरुस्ती करायचें ठरलें त्या वेळीं जागोजागीं पाद्र्यांकडून ह्मणजे **भट**शाहीकडून विरोध झाला! अजूनहि तिकडे काडी मोडणें ह्मणजे मोठा उपद्व्याप आहे! इकडे तें फार सोपें. **विजयी मराठा** किंवा **भाला** ह्यांत नोटीस दिली कीं झाली काडीमोड!

अलीकडे रजिष्टर पद्धतीनें लग्न करण्याची चाल पडत चाललेली आहे, पण रजिष्टर पद्धति ह्मणजे काय? तर भटशाहीच! इतके दिवस इंग्रज

सरकार लग्नें लावून दक्षिणा घेत नसे, पण तें आतां घेऊं लागलें हाच त्याचा खरा अर्थ आहे. हा जर त्याचा हेतु नसता तर त्यासाठीं इंग्रज सरकारनें फी ठेवली नसती. ही फी भटाच्या दक्षिणेपेक्षां कोणत्याहि दृष्टीनें कमी नाहीं. पूर्ण विचार केला तर भटाची दक्षिणाच ह्यापेक्षां स्वस्त पडते. रजिष्टर पद्धतीनें लग्न लावलें ह्मणजे पैसे कमी लागतात असा पुष्कळांचा समज आहे. पण ही त्यांची चूक आहे. साधारण लग्नांत आपण जेवणाखाणाचा खर्च धरतों ह्मणून तीं आपणांस महाग वाटूं लागतात, पण हा खर्च किंवा मानपान एके बाजूला ठेवला ह्मणजे भटाचा खर्च अगदीं थोडा असतो. रजिष्टरच्या फीपेक्षां तो खात्रीनें कमी असतो. रजिष्टरी लग्नांत भटशाही असूं नये अशी जर इंग्रज सरकारची इच्छा असती तर इंग्रज सरकारनें त्यास फी ठेवली नसती ! वधूवरांनीं एकमेकांशीं लग्न लावून त्यावर दोन प्रतिष्ठित माणसांच्या किंवा जे. पीं. च्या सह्या घेतल्या ह्मणजे पुरे असें सरकारनें ठरविलें असतें. पण भट दक्षिणेसाठीं अडवितो व इंग्रज सरकारचा रजिष्ट्रार फीशिवाय अडवितो !

भटशाही आडमुठी व अज्ञानी कां असते व तिचा जुलूम कां असह्य होतो ह्याचें कारण तें अंमलबजावणीचें खातें असतें, विचारप्रसाराचें खातें नसतें. **भट**शाही हें Executive Department आहे, Legislative Department नव्हे. लग्न लावणाऱ्या रजिष्ट्रारपुढें जाऊन जर त्यास आपण असा उपदेश करायला लागतो कीं "गड्या, ही फी कशाला मागतोस ? आमचें लग्न तसेंच लाव पाहूं "! तर तो आपणांशीं वादविवाद करायचे ऐवजीं रजिष्टर कचेरींतून उठायला सांगेल. त्याला एवढेंच माहित आहे कीं अमुक एक फी आली ह्मणजे अमुक अमुक शपथा घ्याव्या व अमुक अमुक नोन्दणी करावी. भटाचेहि तसेंच असतें. अमुक एक कार्य असलें ह्मणजे अमुक एक मंत्र ह्मणावा व त्याबद्दल अमुक एक दक्षिणा घ्यावी ! त्याला ह्यापेक्षां कांहीं ज्यास्ती माहित नसतें ! समाज ह्मणजे काय, लग्न ह्मणजे काय, त्यास भट कशाला लागतो, मंत्र कां

ह्मटले पाहिजेत, मंत्रांचा अर्थ काय हें त्यास काय माहीत ? व माहीत असण्याचें कारण तरी काय ? रजिष्ट्राशीं तुह्मीं वादविवाद घातला तर तो तुह्मांला रजिष्टर कचेरींतून काढून लावील, भटाशीं वादविवाद घालायला लागलां तर तो तुह्मांस **नास्तिक** ह्मणून निघून जाईल.

आतां **भट**शाहीस मीं **अज्ञानी, आडमुठी, जुलमी** व **दुराग्रही** ह्मटलें त्याचा आतां अर्थ काय आहे तो पाहूं. ह्यावरून तीं माणसें दुष्ट आहेत, राक्षस आहेत, वळणावर येण्याजोगीं नाहींत किंवा माणुसकीच्या पलीकडचीं आहेत असा जर कोणी अर्थ करील तर तो खरा नाहीं. तींहि माणसेंच आहेत, पण त्यांचा पेशा अंमलबजावणीचा असल्यामुळें त्यांचा नाइलाज आहे. रेल्वेवर युरोपियनांसाठीं थर्ड क्लासचा डबा रिझर्व्ह करून ठेवणें हें अन्यायाचें आहे हें आतां जगजाहीर आहे. पण हा जुलूम नाहींसा करण्याचें काम सरकारचें असून रेल्वे नोकरांचें नसल्यामुळें एखादा हिंदु मनुष्य रिझर्व्ह डब्यांत जाऊन बसल्यास रेल्वेचा नोकर लगेच त्यास खालीं उतरविण्याकरितां येईल. हा अन्याय आहे हें त्यास माहीत असेल, त्यासाठीं मनांतून तो स्वतःहि संतापेल, पण त्यामुळें तो आपल्या कामांत चुकणार नाहीं ! रस्त्यांतून उजव्या हातानें गाडी हांकणें किंवा डाव्या हातानें हांकणें, **नीति**दृष्ट्या सारखेंच आहे, पण उजव्या हातानें गाडी हांकल्यास पोलीस आपणांस ताबडतोब पकडील ! इतकेंच काय, हायकोर्टाचे जज्ज् किंवा प्रिव्ही कौन्सिलचे सभासद हेहि अंमलबजावणीचेच अधिकारी आहेत. एखाद्याचें कर्ज तीन वर्षांच्या पुढें गेलें ह्मणजे ते फिर्याद काढून टाकतील, त्यावेळीं हें कृत्य अन्यायाचें आहे ह्याचा ते विचार करणार नाहींत ! ह्यांत नीतिशास्त्राचें त्यांचें दिसून येणारें अज्ञान, दुसऱ्याचें बोलणें न ऐकून घेण्याचा त्यांचा आडमुठेपणा, लोकांचे पैसे बुडविणाऱ्यास मदत करण्यांत त्यांचा दिसून येणारा दुराग्रह व प्रामाणिक आणि परोपकारी मनुष्यावर होत असणारा त्यांचा पराकाष्ठेचा जुलूम ह्यामुळें त्यांना तुह्मी खुशाल **अज्ञानी, आडमुठे, जुलमी** व **दुराग्रही** ह्मणा–पण

विचार करणें हें त्यांचें कामच नव्हे, अंमलबजावणी करणें हें त्यांचें काम आहे !

हें जें मीं हायकोर्टाच्या जज्जचें उदाहरण घेतलेलें आहे तें मुद्दाम घेतलेलें आहे, कारण हायकोर्टाच्या जज्जाचा पेशा कितीहि श्रेष्ठ, किंवा वन्दनीय असला तरी त्यांत विचाराचा भाग नाहीं. तो अंमलबजावणीचा भाग आहे. हायकोर्टाचा एखादा जज्ज् **स्पेन्सर** पेक्षांहि विचारी असेल किंवा **सॉक्रेटीस**-पेक्षांहि ज्ञानी असेल, पण तो पेशाच असा आहे कीं त्यांत ठरलेल्या कायद्यांच्या पलीकडे ज्ञानाचा कांहीं एक उपयोग नाहीं. भटजीचेंहि तसेंच ! प्रचलित धर्मनियमांची अंमलबजावणी करणें एवढें त्याचें काम ! ह्यामुळें ज्ञान किंवा विचार हे शब्द ज्या अर्थानें आपण वापरतों त्या अर्थानें त्याचें ज्ञान किंवा विचारीपणा असणें शक्य नाहीं. तो स्वतः अतिशय पढलेला असेल—व अजूनहि आपल्यांतून दशग्रंथी विद्वान् नाहींसे झालेले नाहींत. इंग्लण्डमध्येंहि कांहीं पाद्री अतिशय विद्वान् ह्मणून वाखाणले गेलेले आहेत. **स्पेन**मधील ज्या पाद्यांनीं शाळेंत **बायबल** न शिकविल्यामुळें एका थोर पुरुषास फांशी देवविल्याचें मी वर सांगितलें त्यातहि विद्वान् लोक नसतील असें नाहीं ! पण बदलत्या व वाढत्या समाजांत ह्या विद्वत्तेचा कांहींएक उपयोग नाहीं. ज्या धर्मविचाराच्या वातावरणांत हे अंमलबजावणीदार प्रथम निर्माण झाले त्या वेळीं त्यांचें ज्ञान त्या काळाशीं मिळतें असेल व त्यामुळें त्याचा जुलुमहि भासत नसेल, पण काळ नवा व अंमलबजावणीचें खातें जुनें—अशा वेळीं त्यांचा जुलूम कसा वाटणार नाहीं? व त्यांचे विचार अपुरे आणि हास्यास्पद कसे भासणार नाहींत ? पूर्वीच्या काळांत ते त्या काळाशीं मिळते असल्यामुळें त्यांचा पगार किंवा दक्षिणा त्यावेळीं लोकांचे डोळ्यांवर येत नसेल, पण सध्यां त्यांचा पगार अनवश्यकच वाटणार, त्यांची दक्षिणा लुटारू-पणाच दिसणार व त्यांचीं जेवणें ऐतखाऊपणाचींच समजलीं जाणार !

तेव्हां आजचें युद्ध हें सर्व जगभरच एका स्वरूपाचें झालेलें आहे, ह्मणजे आज सर्व जगाचीच भटशाहीशीं (Clergyशीं) लढाई आहे. इंग्लंडमध्यें

Conflict between science and religion ( ज्ञान आणि धर्म यांतील युद्ध) हें ज्या वेळीं ऐकूं येतें त्या वेळीं तें युद्ध **येशू खिस्ता**शीं असतें काय ? नाहीं, तें पाद्र्यांशीं ऊर्फ भटशाहीशीं असतें. नवीन **रशिया**मध्यें **लेनिन्**नें जर कांहीं केलें असेल तर तें हें कीं त्यानें रशियन् लोकांस **भट**शाहीच्या अमलांतून सोडविलें. **तुर्कस्थान**मध्येंहि **कमाल**पाशानें हेंच केलें. **खिलाफती**चा विध्वंस करून त्यानें तुर्कस्थानांतील भटशाहीच्या जुलमाचा नायनाट केला. आजहि एशियांतील मुसलमान जर भलत्या मार्गाला प्रवृत्त होत असतील तर **मुल्ला** आणि **मौलाना** ह्यांच्या अविचारीपणाच्या उपदेशामुळेंच होय ! ' **श्रद्धानंदां**चा खून करा ' असें मुसलमान समाजास **जिना** किंवा **अनसारी** हे खास शिकवीत नाहींत. वेडेविद्रे फतवे काढणारे **मौलवी**च शिकवितात व त्यामुळें गरीब बिचाऱ्या अज्ञानी मुसलमानांचीं डोकीं फुटतात !

**हिंदु** समाजांत हीच तक्रार आहे आणि तिच्याखालीं ब्राह्मण आणि ब्राह्मणेतर सारखेच चिरडले जात आहेत. त्यांत **सत्यशोधक** समाजानें भेद करण्याचें कांहींएक कारण नाहीं, पण ह्या बाबतींत ब्राह्मण समाजानेंहि एक सुधारणा अवश्य करायला पाहिजे आणि ती सुधारणा ह्मणजे ब्राह्मणेतरांचा उच्च व समान दर्जा मानणें ही होय ! खरा विचार केला, तर **ब्राह्मण ब्राह्मणेतर** ह्यांच्यामधील झगडा भटशाहीबद्दलचाहि नाहीं व धर्माबद्दलचाहि नाहीं. कारण हिंदुधर्म हा सर्वांनाच प्यारा आहे. हा झगडा दर्जाबद्दलचा आहे. पूर्वकालीं ब्राह्मणब्राह्मणेतरांचा दर्जा भिन्न नव्हता. हा भेद पुढें आला. ब्राह्मण समाजानें ब्राह्मणेतरांचा समान दर्जा जर ह्याचे अगोदरच कबूल केला असता तर ब्राह्मणब्राह्मणेतर वाद इतका माजलाहि नसता ! ब्राह्मणेतर मनुष्य आपल्यापेक्षां कमी दर्जाचा आहे असें मानणें, त्याच्या हिताविषयीं बेफिकीर असणें, त्यास सहज ' अरे जारे ' किंवा ' तूं ' ' तो ' असें बोलणें, त्यास हलक्या जागीं बसविणें किंवा त्याच्या अन्नपाण्याचा विटाळ मानणें ही गोष्ट अत्यंत चीड

आणणारी आहे. ही गोष्ट एक क्षणभरदेखील सहन होण्याजोगी नाहीं. ब्राह्मणेतर समाजानें ही गोष्ट खरोखर मर्यादेपेक्षां ज्यास्त काळ सहन केलेली आहे आणि ब्राह्मणब्राह्मणेतर वाद जर नको असेल तर ब्राह्मणसमाजानें ही गोष्ट पहिल्या प्रथम बंद केली पाहिजे.

आयुष्यात अत्यंत आवडती जर कोणती गोष्ट असेल तर ती **दर्जा** ही होय ! मनुष्य आपलें सर्वस्व जर एखाद्या गोष्टीबद्दल वेंचायला तयार असेल तर ती **दर्जा** ही होय ! मनुष्य आपल्या जन्मांत जर एखादी गोष्ट टाकून द्यायला तयार होणार नसेल तर ती **दर्जा** ही होय ! मनुष्याचा दर्जा कमी करणें ह्मणजे त्याचें नाक कापणें होय ! हें नाक कापून मग जगायचें कशाला ? कुणाला तोंड दाखवायचें ? कुणापुढें मिरवायचें ? कुणासमोर प्रौढि गायची ? आपला दर्जा संभाळण्यासाठीं मनुष्य घरादारावर पाणी सोडील—आपल्या संपत्तीवर पाणी सोडील—आपल्या सुखावरती लाथ मारील—आपलें राज्य लाथाडून देईल ! शूर मनुष्य आपले प्राण देतो, पण आपली तरवार देत नाहीं ! त्या तरवारींत त्याचा दर्जा असतो ! त्याला **शूर** ह्मणवून जगायचें असतें आणि तोंपर्यंतच तो जगायला तयार असतो. मरणांत काय आहे ? नरकांत काय आहे ? दर्जा गमावणें हेंच खरें मरण—दर्जा गमावणें हाच खरा नरक !

पण ह्या मरणांत—ह्या नरकांत—आजपर्यंत ब्राह्मणेतर वर्ग ठेवला गेलेला आहे. आतां तें त्यांना नको आहे. हा नरक आतां पुरे झाला. आतां ह्यापुढें समान दर्जाचे ह्मणूनच त्यांना जगायचें आहे ! तसा त्यांचा निश्चय झालेला आहे ! ब्राह्मण—ब्राह्मणेतरांत आज सख्य नाहीं ह्याचें कारण ब्राह्मणांकडून त्याचें हृदय येथें दुखावलें जात आहे. तो दर्जा त्यांना द्या ह्मणजे ब्राह्मणब्राह्मणेतरांत उद्यां सख्य होईल ! हिंदभूमींतलीं आपण लेंकरें—त्यांत श्रेष्ठ कोण आणि कनिष्ठ कोण ? आपण श्रेष्ठ असलों तर सर्वच श्रेष्ठ आहोंत. आपण कनिष्ठ असलों तर सर्वच कनिष्ठ आहोंत. आपण श्रेष्ठ असलों तर एकमेकांस मिठ्या मारून आपण त्या श्रेष्ठतेचा

परिणाम गाजवूं या. आपण कनिष्ठ असलों तर एकमेकांस मिठ्या मारून कनिष्ठतेच्या नरकास स्वर्ग बनवूं या! पण आपण एक होऊं या! श्रेष्ठ–कनिष्ठ ही भाषा इतउत्तर नको! ब्राह्मणवर्गावरचा रोख ज्याप्रमाणें **सत्यशोधक** समाजानें टाकून दिला पाहिजे, त्याप्रमाणें ब्राह्मणेतरांचा समान दर्जा ब्राह्मणांनीं तावडतोब कबूल केला पाहिजे. सध्यांचा असंतोष हा दर्जाच्या महत्त्वाकांक्षेमधून निर्माण झालेला आहे. हा असाच भडकूं दिला तर भयंकर वणवा निर्माण होईल. हा शांत केला तर त्यांतून कल्पनेच्या बाहेरचें भाग्य जन्म पावेल.

खरोखर पाहतां ज्याला आपल्या देशाचें हित करावयाचें असेल त्यानें स्वाभिमानाची ज्योत आपण होऊन पेटवायला पाहिजे. ब्राह्मणेतर समाजानें आपला समान दर्जाचा हक्क मागितला आणि ब्राह्मण समाजानें तो नंतर कबूल केला म्हणजे त्यांत कांहीं मोठेपणा नाहीं. तर ब्राह्मण समाजानें आपण होऊन हाललें पाहिजे व प्रत्येक समाजाला जागें करून तुमचा दर्जा श्रेष्ठ, तुमचा दर्जा श्रेष्ठ, असें सर्वांस समजावलें पाहिजे. नापित हे ब्राह्मणांपेक्षां श्रेष्ठ आहेत असें पर्वा एक पुस्तक प्रसिद्ध झालें आहे. पण मी म्हणतों कीं **हिंदु** तितके एक–**हिंदु** एकमेकांचे धर्मबंधु–**हिंदु** हे एकमेकांचे पाठीराखे–ही भावना सर्वत्र पसरली म्हणजे आपल्यांत दुही पेरायची कोणाची छाती आहे? आपणांत दुही आहे तोंपर्यंतच आपणांस दुःखें! ही दुही नाहींशी झाली म्हणजे दुःखेंहि नाहींशी होतील आणि आपलें गेलेलें स्वातंत्र्यहि आपणांस मिळेल!

ज्यांना अशी कल्पना असेल कीं ही हिंदभूमि कनिष्ठ अपत्यें प्रसवेल त्यांनीं ह्या हिंदभूमीची योग्यता ओळखली नाहीं असेंच म्हटलें पाहिजे. ज्या हिंदभूमीमध्यें परमेश्वरानें दहा वेळां अवतार घेतला, ज्या हिंदभूमीमध्यें अर्जुनासारखे रणधुरंधर निर्माण झाले, ज्या हिंदभूमींत श्रीतुकारामासारख्या संतांची दिव्यवाणी घुमली, ज्या हिंदभूमींत राणी लक्ष्मीबाई निर्माण झाली, ज्या हिंदभूमींत महाराचें रूप घेऊन खुद्द विठोबा सजून आला, ज्या हिंद-

भूमीनें आपल्या यमुनानदीच्या वाळवंटांत श्रीकृष्ण खेळवला आणि ज्या हिंदभूमीच्या पोटीं श्रीशिवाजीमहाराजांनीं जन्म घेतला त्या ह्या रत्नाच्या खाणींत गारगोट्या निघतील काय ? अशक्य ! अशक्य ! ह्या हिंदभूमीचा कुसवा एवढा भाग्यवंत आहे कीं तेथें कनिष्ठ अपत्यांना स्थानच नाहीं. त्यांतील प्रत्येक मनुष्य परमेश्वराचा लाडका ! त्यांतील प्रत्येक मनुष्य श्रेष्ठ दर्जाचा ! त्यांतील प्रत्येक मनुष्य सर्वोत्कृष्ट वैभवाचा अधिकारी !

परन्तु हें सर्वांस समजलें पाहिजे आणि सर्वांत स्वाभिमान संचरला पाहिजे. " मी इंग्लिश्मन् आहें " म्हणून ज्याप्रमाणें प्रत्येक मनुष्यांत कुर्रा उत्पन्न होतो त्याचप्रमाणें **मी हिंदु आहें** हें वाटण्यांत प्रत्येकाची वर मान झाली पाहिजे. सध्यांची स्थिति उलट आहे आणि ती कृत्रिम आहे. ती पांच मिनिटें देखील टिकण्याजोगी नाहीं. पण त्यासाठीं ब्राह्मणवर्गानेंच मुख्यतः प्रयत्न करायला पाहिजेत. परिस्थितीनें ती पवित्र जबाबदारी त्यांच्यावर टाकलेली आहे. राष्ट्रीय कर्तव्याचें हें पुण्यप्रद ओझें त्यांनीं उचलायला पाहिजे व त्यांनीं सर्वांच्या अगोदर जाहीर करायला पाहिजे कीं ह्या हिंदभूमींत सर्व माणसें श्रेष्ठ आहेत–ह्या हिंदभूमींत सर्वांस समाजाचे श्रेष्ठ हक्क आहेत–ह्या हिंदभूमींत सर्वांस धर्माचे सारखे अधिकार आहेत !

ब्राह्मणवर्गाचें हें मुख्य कर्तव्य असण्याचें कारण असें कीं श्रेष्ठ दर्जा हा त्यांना जन्मप्राप्त असल्यामुळें इतरांचें दुःख काय आहे हें त्यांस समजण्याचा संभव कमी असतो. ब्राम्हणवर्ग **भट**वर्गापासून निराळा असेल व ब्राह्मण लोक संपत्तीनेंहि इतर वर्गांच्या बरोबरीनें नसतील. परन्तु प्रचलित धर्मसमजुतीप्रमाणें त्यांस एकदम जो श्रेष्ठ दर्जा ( status ) प्राप्त होत असतो तो संपत्तीपेक्षां देखील ज्यास्ती वैभवाचा आहे. दर्जापुढें संपत्तीची पर्वा नाहीं–प्राणांचीहि पर्वा नाहीं. तो दर्जा त्यांस सहज ह्मणजे जन्माबरोबर प्राप्त होत असल्यामुळें दर्जा ( status ) साठीं हळहळणाऱ्या इतर वर्गांच्या दुःखविमोचनाकडे लक्ष्य पुरविणें हें त्यांचें पहिलें काम आहे. जगांत संपत्ति ही एक शक्ति असेल, पण दर्जा हें जें भूषण आहे त्याची

## जेधे मॅन्शन पुणें.



ब्राह्मणेतर चळवळीचा वाले किल्ला.

[ लक्ष्मी वैभव प्रेस, मुंबई नं. ४.]

सर संपत्तीला कधींहि यायची नाहीं. जेवणाच्या वेळेस ब्राह्मणांचीं पानें माजघरांत व इतरांचीं पानें ओटींवर मांडलीं ह्मणजे त्यांत विशेष काय आहे असें कदाचित् त्यांस वाटेल, पण मानहानीचें दुःख एवढें आहे कीं मानहानीच्या भोजनांत पक्वानांतील सर्व गोडी नाहींशी होते–किंबहुना मानहानीचें जेवण देण्यापेक्षां पोटांत खंजीर खुपसला असता तरी बरा असें मनुष्यास वाटत असतें. पण असले खंजीर ब्राह्मणेतर वर्गाच्या पोटांत रोज खुपसले जात आहेत. जेवणाच्या पंक्तींत, देवळाचे दारांत, पाणवठ्याच्या जागेवर, एवढेंच काय, मसणवटींत देखील ब्राह्मणेतरांचीं मनें रोज रक्तबंबाळ केलीं जात आहेत. हीं मनें पुन्हां सांधलीं पाहिजेत–माजघर, देवघर, पाणीघर किंवा न्हाणीघर–ह्या सर्व ठिकाणीं ब्राह्मणब्राह्मणेतर एक असा प्रयत्न खुद्द ब्राह्मणांनीं केला पाहिजे. आपल्या देशबांधवांच्या हृदयाची ही जखम भरण्याचा प्रत्यक्ष प्रयत्न जर ब्राह्मणवर्गाकडून होणार नाहीं तर ब्राह्मणवर्गानें आपलें कर्तव्य केलें नाहीं असें ह्मणावें लागेल–एवढेंच काय, पुनर्जन्माचा सिद्धांत जर खरा असेल तर दर्जा ( status ) च्या प्राप्तीसाठीं तळमळणाऱ्या ब्राह्मणेतरांच्या दुःखाकडे कानाडोळा करणाऱ्या आपणांस पुन्हां परमेश्वर उच्च जन्महि देणार नाहीं.

ब्राह्मणेतर वर्गास दर्जा ( status ) प्राप्त करून देण्यासाठीं चाललेली जी चळवळ तीच **ब्राह्मणेतर** चळवळ होय व त्यांत जे **ब्राह्मणेतर वीर** प्रस्तुत काळीं चमकत आहेत त्यांत **जेधे–जवळकर** हे अग्रगण्य होत. **जेधे–जवळकर** हे शब्द उच्चारले कीं साऱ्या ब्राह्मणेतर समाजाला आनंदाचें भरतें येतें. कारण उच्च दर्जा [status] हा हिंदुस्थानांत जन्मलेल्या प्रत्येक मनुष्याचा जो जन्मसिद्ध हक्क आहे तो देण्यासाठीं झटणारे ते हे, ही ब्राह्मणेतर वर्गास जाणीव आहे. **महात्मा गांधी** दक्षिण आफ्रिकेंत हिंदुस्थानांतील लोकांना दर्जा ( status ) आणण्यासाठीं झटले ह्मणून ते हिंदुस्थानच्या लोकांचे गळ्यांतील ताईत बनले. पण दक्षिण आफ्रिकेच्या अगोदर हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत लोकांस दर्जा ( status ) मिळणें

अवश्य आहे व हें महत्त्वाचें कार्य **जेधे-जवळकर** करीत आहेत. **जेधे-जवळकर** ब्राह्मणेतर वर्गांत आज जे अत्यंत प्रिय आहेत ह्याचें कारण हें आहे. ब्राह्मणेतरांची कोणतीहि सभा असो त्यांत **जेधे-जवळकरां**-च्या नांवाचा आदरानें उच्चार केला जातो. गेल्या दोन तीन वर्षांत तर ब्राह्मणेतर चळवळ **जेधे-जवळकर** ह्या नांवामध्यें पूर्ण एकवटली आहे—सर्व सत्यशोधक जलशांतून जेधे-जवळकरांच्या धैर्याचें गुणगान होत आहे. **जेध्यांनीं** पुणें म्युनिसिपालिटींत महात्मा **ज्योतिबा फुले** ह्यांच्या पुतळ्याचा प्रश्न पुढें आणला व श्री. **जवळकरांनीं देशाचे दुश्मन्** हें पुस्तक लिहिलें इथपासूनच जेधे-जवळकरांच्या हालचालींची सुरवात झाली असें अनेक लोक समजतात, पण हें खरें नाहीं. ह्याहीपूर्वी त्यांच्या चळवळीची सुरवात झालेली आहे. ती चळवळ ना. **पटेल** ह्यांच्या मिश्रविवाह बिलापासूनची आहे. हें बिल कौन्सिलमध्यें आलें त्या वेळेपासून पुण्यास **सत्यशोधक** चळवळ जोरानें सुरू झाली. ह्या वेळीं मुख्य अडचण ह्मणजे सत्यशोधक लोकांच्या सभेस जागा मिळण्याची असे, कारण **सत्यशोधक** हें नांव देखील नावडतें असल्या-मुळें पुण्यांतील सभांच्या मुख्यमुख्य ठिकाणें त्यांना मिळणें अशक्य होतें. पण ह्याच वेळीं श्री. **जेधे** ह्यांची स्वतःची मोठी भव्य इमारत पुरी झाली आणि तेथें सत्यशोधकांच्या सभा भरूं लागल्या. **जेधे मॅन्शन्स्** ते हेच होत. ह्यांचा फोटो ह्या पुस्तकांत येथेंच दिलेला आहे व आज **सत्यशोधक** चळवळीचा तो बालेकिल्ला होऊन बसलेला आहे.

**जेधे** ह्मटले ह्मणजे एकच व्यक्ति आपल्या डोळ्यांपुढें उभी रहाते, पण तसें नाहीं. ते चार बंधु आहेत व ब्राह्मणेतर वर्गांच्या उन्नतीसाठीं हे चारी बंधु तन मन धन अर्पण करून झटत आहेत. **जेधे** शकावलीचे कर्ते सुप्रसिद्ध **कान्होजी जेधे** ह्यांचे हे वंशज होत. राष्ट्रकार्यासाठीं आपल्या वतनावरच नव्हे तर तरवारीच्या पहिल्या मानावरहि आपल्यां पांची मुलांसह श्रीशिवाजी महाराजांसमोर उदक सोडण्याचा कान्होजी जेध्यांचा कुळधर्म आज हे त्यांचे वंशज तितक्याच निष्ठेनें पाळीत आहेत. त्यांच्या

इमारती ह्मणजे राष्ट्रकार्याकरितां बांधलेलीं सार्वजनिक मंदिरेंच. कोणीहि माणसानें जावें–जेध्यांची तिजोरी त्याला सताड मोकळीच ! हे चारी बंधु धनाढ्य असूनहि अजून **अविभक्त** आहेत. ह्यांपैकीं सर्वांत वडील श्री. **सखारामराव जेधे** असून ते व त्यांचे कनिष्ठ बंधु **बळवंतराव जेधे** हे कारखाना व जमीनजुमला सांभाळतात आणि त्यांच्यापेक्षां लहान श्री. **बाबूराव** व श्री. **केशवराव** हे सार्वजनिक कामाला वाहिलेले असतात.

ह्यांनीं ज्यावेळीं सार्वजनिक कार्यास सुरवात केली त्या वेळीं सभेला माणसें यायचीं तीं देखील मुश्किलीनें येत असत. पुष्कळवेळां लग्नाच्या आमंत्रणा-प्रमाणें त्यांना आमंत्रणें द्यायला श्री. **बाबूराव जेध्यांना** जावें लागे. पण पुढें मोठमोठ्या सभा भरूं लागल्या व जुन्या मताच्या सभा मोडल्या जाऊं लागल्या. श्री. जवळकरांच्या लेखनव्यवसायालाहि पटेल बिलापासूनच पालवी फुटली. पुण्यास त्या वेळीं पटेल बिलावर खूपच खळबळ उडालेली होती–रणधुमाळी माजलेली होती–वातावरणांत तुफानें धडाडत होतीं. ह्या वेळीं श्री. **जवळकर** ह्यांनीं पटेल बिलाला अनुकूल असें **प्रणयप्रभाव** नांवाचें नाटक लिहिलें व श्रीशिवाजी हायस्कूलचे हेडमास्तर श्री. **बाबूराव जगताप** ह्यांच्या प्रमुखत्वाखालीं चाललेल्या **महाराष्ट्र हितचिंतक भ्रातृमंडळ** ह्या संस्थेनें तें बसविलें. नाटकाचीं हँडबिलें वांटलीं गेलीं, भिंतीवर जाहिराती लागल्या, एवढेंच नव्हे तर जुन्या मताच्या ब्राह्मणाचें काम आपणांस करायला सांपडावें ह्मणून श्री. **बाबूराव जगताप** श्मश्रू करवून **ब्राह्मणी घेरा** ठेवून बसले. आतां नाटक लागणार–इतक्यांत कांहीं विशिष्ट कारणें घडलीं आणि **नाटक बंद ठेवावें लागलें.** नाट्य-संस्थेस पैशाचा चट्टा बसला आणि जवळकरांची पहिलीच कृति वाद-ळांत सांपडली !

पण ह्यामुळें चळवळमात्र थांबली नाहीं. ती वाढत होती. त्यांत भर देण्यास कै. **राजर्षि श्रीशाहु छत्रपति** पुढें आले व त्यांनीं चळवळीची सूत्रें आपले हातीं घेतलीं. चळवळीसाठीं लायक माणसें निवडून काढीत

असतां त्यांस श्री. **जवळकर** सांपडले व कोल्हापुर येथें **तरुण मराठा** पत्र काढण्याकरितां त्यांनीं जवळकरांना कोल्हापुरास नेलें. ह्या वेळीं चळवळीस रंग भरलेला होता व **विजयी मराठा, राष्ट्रवीर** वगैरे ब्राह्मणेतर पत्रें सपाटून खपूं लागलेलीं होतीं. ह्या चळवळींत फक्त स्वार्थसाधुच माणसें शिरतात हा आरोपहि श्रीशाहूछत्रपतींनीं ही चळवळ हातीं घेतल्यामुळें नाहींसा झालेला होता. **जेधे** हे तर धनाढ्यच होते. **जवळकर**हि चोराची आळंदी ह्या गांवचे पाटील आहेत.

जवळकर ह्यांच्या आयुष्यावर राजर्षि शाहुमहाराज ह्यांच्या अमोलिक संगतीचे अत्यन्त महत्त्वाचे परिणाम झालेले आहेत. त्यांची संगति ह्मणजे एक अपूर्व लाभ होता–एक अपूर्व भाग्य होतें. पण शाहु महाराजांचे देहावसान झालें त्यावेळीं जवळकर त्यांचे जवळ नव्हते. मिरजेच्या हॉस्पिटलमध्यें ते अत्यवस्थ होते. ते त्या वेळीं जगतील अशीहि विशेष आशा नव्हती. पण ईश्वरकृपेनें ते काळाच्या दाढेंतून वांचले व कोल्हापुरास कांहीं दिवस राहून पुण्यास आले. **जेधे**मंडळीचा आणि त्यांचा इतके दिवस फारसा निकट संबंध नव्हता, तो आतां आला. ह्यावेळीं श्री. **केशवराव जेधे** ह्यांनीं **छत्रपती मेळा** काढून ब्राह्मणेतर चळवळीचा दरारा बसविलेला होता व **शिवस्मारक** ह्या नांवाचें एक वर्तमानपत्रहि काढलेलें होतें. ह्या साधनांच्या योगानें सत्यशोधक चळवळीस भयंकर पाठिंबा मिळाला व १९२५ सालीं गणपतीच्या दहा दिवसांत पुण्यावर सत्यशोधकांचेंच राज्य आहे कीं काय असें वाटूं लागलें. १९२५ सालीं मेळ्यांच्या चळवळीचा अगदीं कळस झाला म्हटलें तरी चालेल. फुले प्रकरणापासून तर जेधेजवळकर ह्यांच्या एकसूत्री विचारानें ब्राह्मणेतर चळवळीस जें सामर्थ्य आलें तें आश्चर्यकारक होय. जवळकरांची मति आणि धृति व जेध्यांची उदार बुद्धि आणि संपत्ति ह्यांचा अपूर्व संगम झाल्यामुळें **सत्यशोधक** नांवांत जादु आली व ह्या जादूस तरुण मंडळी दिपत आहेत, भाळत आहेत, वश होत आहेत. ह्याचप्रसंगीं **मजूर** पत्र

निघून त्यानें ह्या चळवळीचें लोण घरोघर पोंचविलें आणि ह्याचवेळीं ब्राह्मणब्राह्मणेतर ह्या वादाविषयीं श्री. **जवळकर** ह्यांचेवर खटला होऊन ते तुरुंगांत गेले. ह्या खटल्याची हकीकत **संदेश** पत्रासाठीं मुलाखतीचे रूपानें घेतलेली होती; तीच आज मी पुस्तक रूपानें महाराष्ट्रीय वाचकांस सादर करीत आहे. कोणत्याहि चळवळीवरील श्रद्धा शाबीत करण्याचें मुख्य साधन ह्मणजे त्या चळवळीसाठीं तुरुंगांत जाण्याचा प्रसंग आला तरी मागें न हटणें हा होय. जवळकरांनीं हाच मार्ग चोखाळलेला आहे. किंबहुना दृढ निश्चयाची तरवार हातांत घेऊन हा शूर मराठा सर्व संकटांस **मग** आणि **हटा** असें आव्हान देत आहे.

आजकाल देशाला तरुणांची गरज आहे. आजकाल देशाला तडफदार तरुणांची गरज आहे. किंबहुना देशाकरितां आजकाल प्रत्येक वयोवृद्ध मनुष्य तरुण व्हायला पाहिजे आहे. **दर्जा, दर्जा** (Status) ही आजकाल हिंदुस्थानांतल्या लोकांची अवश्यकता आहे. तो दर्जा प्राप्त करून घ्यायला एकीकडून ब्राह्मण, एकीकडून ब्राह्मणेतर, एकीकडून सनातनीय, एकीकडून सत्यशोधक, एकीकडून आर्यसमाजी, एकीकडून प्रार्थनासमाजी ह्या सर्वांनीं धांवलें पाहिजे. एवढेंच काय, ज्यांना **भट**शाही, **भट**शाही असें म्हणतात त्या श्रद्धावान् व निश्चयी पण 'कालव्यत्ययामुळें अत्यंत दुराग्रही व जुलमी भासणाऱ्या पुरोहितवर्गानें **अग्निमीळे पुरोहितं** ह्या अग्नितत्त्वाची जयाची आरोळी ठोकीत नवविचारांनीं उद्युक्त होऊन नवविचाराचे, नवीन तेजाचे, व नवीन तत्त्वांचे प्रचारक व्हायला पुढें आलें पाहिजे. भटशाहीचा 'जुलूम' ह्मणजे कांहीं वज्रलेप नव्हे. जुन्या युगाची अंमलदारी सोडून दिली व श्रद्धानन्दांच्या खुनापासून आणि त्रिशतसांवत्सरिक महोत्सवापासून सुरू झालेल्या नवीन युगाचे ते अंमलदार बनले ह्मणजे चोहोंकडून उसळणाऱ्या स्वातंत्र्यप्रवाहांचे कालवे देशभर पोंचविण्याचें अप्रतिम कार्य त्यांना सहज करतां येईल. माझ्या ह्या मातृभूमीच्या अंकावर बसण्याचा अधिकार हिंदुस्थानांतील प्रत्येक मनुष्याला आहे. जो तिच्या अंकावर बसेल त्याला तिच्या मातृहृदयी चुंबनाचा लाभ घडेलच घडेल.

आणि म्हणून ह्या मातेभोंवतीं—ह्या हिंदमातेभोंवतीं—सर्वांनीं एकत्र होऊन **वन्दे मातरम्** ह्या मंत्रानें एकमेकांस कवटाळणें हें आज प्रत्येकाचें कर्तव्य आहे. म्हणून सर्वांचीं मुखें एकमेकांना सन्मुख करा, सर्वांच्या हातांची झुलती माळ बनवा, ती सर्वांच्या कंठाभोंवतीं पडूं द्या आणि मध्यें सर्वांच्या हृदयाचें धगधगणारें यज्ञकुंड ठेवून तें भावनांच्या वाऱ्यानें भडकूं द्या म्हणजे त्यांत सर्व गैरसमजुतींची आहुति पडेल, सर्व अन्याय जळून जातील आणि हिंदुस्थानच्या पारतंत्र्याची त्यांत राखरांगोळी होऊन ही हिंदभूमि पूर्व-वैभवानें विराजित होईल. असें व्हावें अशी कोण इच्छा करणार नाहीं ?

खेतवाडी, मार्कर बिल्डिंग,
मुंबई नं. ४.
ता. २७ ऑगस्ट १९२७.

**अच्युत बळवंत कोल्हटकर.**

श्री. दिनकरराव जवळकर.



“सरकारी लोखंडी कड्याच्या तुरुंगाची मला भीति वाटली नाहीं”.

( पृष्ठ ५२ )

[ लक्ष्मी वैभव प्रेस, मुंबई नं. ४.]

# जेधे-जवळकर.

## ( श्री. जवळकरांची कैफियत. )

न्यायाधिशापुढें आरोपी या नात्यानें उभें राहून निकाल ऐकण्याचा मजवर पहिला प्रसंग ता. २६ एप्रील १९२६ रोजीं आला. पहिल्या खटल्याच्या पहिल्या तारखेला कोर्टांत हजर राहतांना विकारविचारांची एक प्रकारची झुंज लागत असते. संवयीनें कोणत्याहि गोष्टीचें उग्र किंवा मधुर स्वरूप नाहींसें झालेलें दिसतें. फौजदारी कोर्ट मी मुळींच पाहिलेलें नव्हतें व जेव्हां पाहण्याचा प्रसंग आला तेव्हां आरोपी म्हणूनच पाहावें लागलें. त्यामुळें प्रत्येक गोष्ट मला नवीनच होती. कै. टिळकांच्या चिरंजीवांनीं आम्हांवर केलेल्या फिर्यादीचा निकाल एप्रील १९२६ सालांत लागून त्यांत पुण्याचे सिटी मॅजिस्ट्रेट मि. फ्लेमिंग यांनीं मला व रा. लाड यांना प्रत्येकीं ५०० रुपये दंड केला. या फिर्यादीमुळें कोर्टापुढें आरोपी म्हणून उभें राहून निकाल ऐकण्यांतलें नाविन्य मात्र निघून गेलें. आपण कोर्टापुढें उभे आहोंत, निकाल जाहीर करण्याची वेळ एक दोन सेकंदावर आली आहे, अशा वेळीं आपल्या मनामध्यें एक सेकंदभर काय वाटतें हें सांगणें कठीण आहे. आपलें आपण कर्तव्य बजावीत आहों या विचारानें कर्तव्यनिष्ठ आरोपी गोंधळून जात नाहीं हें खरें आहे पण समजा, एखाद्या रेल्वेंतून प्रवास करतांना पुलावरून गाडी ढासळते आहे हें समजून ती गाडी ढासळेपर्यंतच्या मधल्या काळांत त्या दुर्दैवी प्राण्याच्या मनांत जो गोंधळ उडत असावा, कांहींशी तशा प्रकारची, अस्पष्ट, धुंद अशी मनाची गोंधळलेली स्थिति होत असते. निर्धार जितका प्रबळ असेल तितका निकाल नरम वाटत असतो. मॅजिस्ट्रेट साहेबांनी निकाल जाहीर केल्यावर मग तो कसाही असो, पण जणुं काय

**डोक्यावरलें एक ओझें उतरलें**

असें वाटूं लागतें. माझ्यावर टिळक चिपळूणकर यांचे दोन खटले एकदम

चालल्यामुळें तर एका खटल्याच्या निकालामुळें माझ्यावरचें निम्में ओझें उतरल्यासारखेंच मला वाटूं लागलें. ५०० रुपयांचा दंड आम्हांला अति जबर वाटला. दंड भरण्यास दहा दिवसांची मुदत दिली होती व तो वेळेवर भरलाहि गेला. पुढें अपीलांत पांचशेचा पन्नास झाला. आम्हांवर दुसरी "देशाचे दुष्मन" पुस्तकावरील रा. चिपळुणकरांनीं लावलेली फिर्याद चालू होती. "फिर्याद" या सदराखालीं येणाऱ्या सर्व विधींतून पार पडल्यामुळें त्या फिर्यादीच्या निकालाविषयीं संवयीनें किंवा नऊ दहा महिने फिर्याद चालल्यामुळें, आमच्यांत थोडीशी बेफिकीरी उत्पन्न झाली. "देशाचे दुष्मन्" खटल्यांत मित्रवर्य जेधे व बागडे अशीं मोठमोठीं माणसें असल्यामुळें मला काळजी वाटण्याचें तादृश असें कांहींच कारण नव्हतें. हा दुसरा खटला चालला असतांनाच मी पुन्हां आणखी तीन पुस्तकें काढलीं. त्यावरही आणखी एकादा खटला होईल अशी मला मुळींच कल्पना नव्हती व लिहितांना माझ्या समजुतीप्रमाणें मी खटला होऊं नये अशा तऱ्हेची खबरदारीही घेतली होती. पुस्तकांचा प्रसार न करण्याची डिस्ट्रीक्ट मॅजिस्ट्रेटकडून थोड्याच दिवसांत मजवर नोटीस बजावण्यांत आली आणि ब्राह्मण–ब्राह्मणेतर यांच्यांत वित्तुष्ट वाढेल अशा तऱ्हेचीं पुस्तकें किंवा वर्तमानपत्रें न छापण्याची एक वर्ष मुदतीची नोटीस मजवर बजावण्यांत आली. पुण्यांत आणखी दोघातिघांवर पुस्तकांकरतां व वर्तमानपत्राकरतां अशाच नोटीसा बजावण्यांत आल्या, पण त्यांची मुदतहि माझ्या इतकी नव्हती, व त्यांतहि प्रथम

## आम्हांलाच पहिला मान

मिळाला. फिर्यादीपेक्षां माझा धंदाच लेखकाचा असल्यामुळें त्या नोटीशीचा मजवर थोडासा परिणाम झाल्यावांचून राहिला नाहीं. माझी पुस्तकेंहि बरीच खपत असत व त्यापासून पैशाच्या दृष्टीनें फायदाहि चांगला होत असे. या नोटीशीच्या मागोमाग आणखी एक खटलाही वाट चालतो आहे अशी शहरांत वदंता होती पण मला त्याची मुळींच खात्री वाटत नव्हती. हें नवीन प्रकरण नोटीशीवरच मिटलें असेल असें मला वाटलें. शहरांत त्यावेळीं ब्राह्मणांच्या अनेक सभा भरत होत्या आणि ब्राह्मणेतर पक्षांतल्या विवक्षित "कंपू"

वर म्हणजे आमच्यावर ब्राह्मणांच्या सभेंतून निरनिराळे निराधार आरोप लादले जात होते. "धनवडे प्रकरण" उपस्थित झाल्यामुळें ब्राह्मण व ब्राह्मणेतर दोन्हीं समाजांत एकदम चलबिचल उत्पन्न झाली होती. वर्तमानपत्रांतून—अर्थात् आमच्या विरुद्ध असलेल्या—आमचा संबंध त्या घाणेरड्या प्रकरणाशी जोडण्याचें महापुण्य आमचे प्रतिस्पर्धी बांधीत होते. वर्तमानपत्रांतून मला अनेक वेळां शिव्या खाव्या लागल्या आहेत. अत्यंत दुष्ट व निष्ठूर प्रवृत्तीनें प्रवृत्त झालेल्या बऱ्याच लेखकांनी मजवर व माझ्यामुळें श्री. जेधे व बागडे यांच्यावर शिव्यांचा वर्षाव केलेला आहे. पण ते आम्ही मुळींच मनावर घेत नव्हतों. जेधे यांच्या व माझ्या पत्त्यावर फुले प्रकरणापासून शिवीगाळीनें भरलेलीं, धमक्यांनी थबथबलेलीं, आमच्या आयामायांचा, आमच्या कुळी डहाळीचा उद्धार केलेलीं अनेक पत्रें येत असत. पण पोष्टामार्फत आलेल्या व नांव चोरून शौर्य गाजविणाऱ्या पराक्रमी वीरांचे निर्वाणीचे खलीते वाचून कचऱ्याच्या टोपलींत फेंकण्यापलिकडे आम्ही त्याचा विचारहि करीत नव्हतों. प्रथम प्रथम अशा पत्रांनीं थोडा संताप चढत असें पण पुढें तेंहि संवयीचेंच होऊन गेलें. पुण्याच्या कांहीं ब्राह्मणांनीं जेव्हां "धनवडे प्रकरणाचा" संबंध ब्राह्मणेतर चळवळीशीं जोडण्याचा प्रयत्न चालविला तेव्हां मात्र त्यांनीं चालवलेला हा प्रयत्न कानाडोळा करण्याइतका निरुपद्रवी नाहीं असें वाटूं लागलें. ब्राह्मणेतरांच्या उन्नतिकरतां चाललेल्या चळवळीवर हा अत्यंत मोठा आघात होता; त्याच वेळेला "अश्लील वाङ्मय" हा नवा खेळ पुण्याच्या राजकीय रंगभूमीवर उड्या ठोकीत आला. राजकीय दंगल उर्फ धार्मिक गणपति उत्सवाचा मोसमहि जवळ येत चालला होताच. गायकवाड वाड्यांतील नरसोपंतांपासून तों कुठल्याहि एकाद्या सामान्य लेखकापर्यंत या बाबतींत एक सूर निघत होता. 'अश्लील वाङ्मय' हा काय प्रकार आहे आणि हें नवतर लचांड तरी कसलें आहे याचा कांहीं थांग लागेना. मुंबई पुण्याला निघणारी कांहीं साप्ताहिकें किंवा "आनंद" "विनोद" "करमणूक" "सुदर्शन" इत्यादि नाटकें ज्या पुण्याच्या

रंगभूमीवर रंगून गेली त्या पुणेंकर सभ्यांच्या सदभिरुचीचा स्फोट एकाएकीं या वेळींच कां व्हावा हें कोडें अजूनपर्यंत मला नीटसें उलगडलें नाहीं. कोठून तरी ब्राह्मण व ब्राह्मणेतर या दोन्ही समाजाकडून माझ्या पुस्तकांचा निषेध करण्याचा सुप्रसंग आमच्या प्रतिस्पर्ध्यांना मिळावा एवढाच त्यांत हेतु असावा असें मला वाटतें. याच सुमारास तिसरा १५३ (अ) कलमान्वयें आमच्यावर खटला भरला गेला व त्याची तारीखही लागली गेली. ब्राह्मणेतरांनीं भोळे-पणानें फसणें हा ब्राह्मणेतरांचा शृंगारच असल्यामुळें बोटावर मोजण्यासारखे कांहीं ब्राह्मणेतरहि हें "अश्लीलवाङ्मया"चें नवें आपत्य अंगाखांद्यावर खेळवण्यास तयार झाले होते. कलेक्टर साहेबांनीं याच सुमारास ब्राह्मण ब्राह्मणेतरांचे रीकन्सीलीयेशन बोर्ड नेमलें होतें. या बोर्डांत ब्राह्मणेतर पक्षाची जी जबाबदार माणसें होतीं व त्यांनीं त्या वेळेस जें जबाबदारीनें वर्तन केलें तें त्यांनीं तसें केलें नसतें तर हा "अश्लीलवाङ्मया"चा भाला स्वपक्षाच्या छातीवर आदळला असता. ह्या वेळेस जें खरेंखरें 'अश्लीलवाङ्मय' कांहीं ब्राह्मण लेखकांचे लेखणींतून उतरलेलें, व पसरलेलें होतें तें गोळा करण्याचा माझा प्रयत्न चालला होता. ब्राह्मण ब्राह्मणेतरांच्या दोन्ही बाजूच्या अश्लील "वाङ्मयाचा" निषेध दोन्ही समाजानें करावा अशी एक टूम निघाली. हा बूट जेव्हां निघाला तेव्हां मला जरासें 'हायसें' वाटलें; कारण यांत न्याय होता, जबरदस्ती किंवा व्यक्तिद्वेष नव्हता. आणि ब्राह्मणेतर पक्षाच्या पुढा-ऱ्यांच्या सह्यांनीं बोलवलेली एखादी मोठी जबाबदार सभा भरवली गेली असती तर ब्राह्मणेतरांचा ब्राह्मणाबरोबर निषेध करण्यासारखें ब्राह्मणांचें वाङ्मय इतकें होतें कीं नाहीं ! व तें मी तयार करुनहि टेविलें होतें. इंग्रजांच्या हातून स्वराज्य हिसकवून घेण्यास निघालेल्या जहाल बंधुंच्या राष्ट्रीय पद्यावल्यांपासून ते हरिमंदिरांत पुराणिकांच्या मुखांतून आजदिन तागायत निघणाऱ्या पुराणां-पर्यंत अनेक वस्तु त्यांत सांपडल्या असत्या. त्यांचे पोहे व आमचा कोंडा एके ठिकाणीं करून फुंकून खाण्याचा हा सौदा आमच्या पथ्यावर होता. तितक्यांत १५३ (अ)चा खटला धडाक्यानें सुरू झाला. या वेळपासून आपल्याला तुरुंगांत जावें लागणार असें मला वाटूं लागलें. मजूर पत्रावरहि

१५३ चा खटला भरला गेला होताच. या सभा किंवा हा " वाङ्मया " चा महायज्ञ माझ्या समोरून निघून गेला. कोणताहि खटला एकदम होऊन त्यांत जर तडकाफडकी शिक्षा झाली तर आरोपीवर बराच परिणाम होत असला पाहिजे असें मला वाटतें. खटला लांबला ह्मणजे आपल्या मनाचीहि तयारी उत्तम होत असतें. कल्पना कितीहि उग्र, भयानक असली तरी पण त्या कल्पनेचा खुराक मनाला रोज नित्यनियमानें आपण पुरवित गेलों तर त्यांतला उग्रपणा आपोआप नाहींसा होतो. ही वेळ माझ्या कसोटीची होती. या वेळेस माझ्या हातून थोडी जरी एकादी चूक झाली असती किंवा माझे पाठीराखे व स्वपक्षीय स्नेही यांनीं थोडें जरी मजकडे दुर्लक्ष केलें असतें तरी त्याचा परिणाम काय झाला असता हें आज सांगतां येत नाहीं. माझे प्रति-स्पर्धी जितके जोरावर होते त्यापेक्षां जास्त उमेदीनें माझे सहायकर्ते पहाडा-सारखे पाठी उभे होते. या सहायकर्त्यांचा पहाड पाहून समोरील संकटें मला अगदीं क्षुल्लक वाटणें सहाजिक होतें. महाराष्ट्रांतून निरनिराळ्या ठिकाणांहून अनेक सुहृदांचीं उत्साहपर पत्रें येत होतीं. त्यामुळें किती तरी विसावा वाटत असें. १५३ (अ) च्या खटल्यामुळें त्या सभा तें वाङ्मय किंवा ते निषेध याकडे दुर्लक्ष करून खटल्यांत डिफेन्स देण्याच्या तयारीकडे मला लक्ष घालावें लागलें आणि निषेधाकरतां जें वाङ्मय जमा करून ठेवलें होतें त्यांतून खटल्याला उपयोगीं अशीं अनेक चोपडी सांपडलीं. कांहीं ब्राह्मण लेखकांच्या लेखणींतून पैदा झालेला हा अश्लील लेखसंग्रह त्या वेळेस समाजा-पुढें जाहीर रीतीनें मांडण्याची मला संधी मिळाली असती तर माझी खात्री आहे कीं—जनता जनार्दन इतका अन्यायी नाहीं. जातिमत्सर किंवा अब्रु नुकसानी या विशिष्ट मुद्यामुळें कायद्याच्या कोर्टांत माझीं पुस्तकें दोषी ठरलीं असलीं तरी त्यावरला " अश्लीलते " चा छाप मारण्याचा होत असलेला वर्तमानपत्रांचा प्रयत्न मी थांबवूं शकलों असतों. या साऱ्या गडबडीमुळें मला विश्रांति मुळींच मिळत नव्हती आणि त्यामुळें एकदां तुरुंगांत गेल्यावर तरी विश्रांति मिळेल अशी आशा वाटूं लागली. त्यामुळें हा त्रास माझ्या इतका पथ्यावर पडला कीं, लहान मुलें जशी मे महिन्याच्या सुटीची वाट

पहात बसतात तसा मी १५३ च्या खटल्याच्या निकालाची वाट पहात बसलों.

हा खटला जेव्हां सुरू झाला तेव्हां त्यांचे रोज काम चालू लागलें. लागलीच ता. १० सप्टेंबर रोजीं रा. लाड यांना ९ महिने सक्त मजुरीची शिक्षा झाली. या निकालानें पूर्वी जें मला महिना सहा महिने तुरुंगांत जावें लागेल असें वाटत होतें तें आतां लाड यांना जर नऊ महिने तर आपले नऊ दुणें अठरा महिने सहज असले पाहिजेत असें मनानें घेतलें. देशाचे दुष्मन केसचा निकाल ता. १५ सप्टेंबरला जवळ आला होता. ता. १३ सप्टेंबरला माझे मुंबईचे वयोवृद्ध मित्र डॉ. चव्हाण सकाळींच भेटण्याकरितां आले. श्री. जेधे व मी बसलों होतों. आमचे मित्र म्हणाले "पर्वाच तुरुंगांत जाल म्हणून मुंबईहून मुद्दाम भेटण्यास आलों आहे." पण देशाचे—दुष्मन खटल्यांत तुरुंगांत जावें लागणार नाहीं असें मला वाटत असें. मी त्यांना लागलेंच सांगितलें कीं, तुम्ही कांहीं कांळजी करूं नका! १ महिना आणखी जात नाहीं. ता. १४ सप्टेंबर मुंबईस सरदारगृहामध्यें ब्राह्मणेतर पक्षाची मुंबईचे उमेदवार ठरविण्याची सभा होती. त्या सभेकरितां आणि १५३ (अ) केससंबंधीं बॅरिस्टर करण्यासाठीं आम्ही मुंबईस आलों. ता. १४ सप्टेंबर रोजीं चळवळींतील सर्व ब्राह्मणेतर पुढारी तेथें भेटावयास मिळाले. खटल्याचा निकाल उद्यांच असल्यामुळें आज सरदारगृहांत तर उद्यां कारागृहांत अशा आमच्या होणाऱ्या नव्या प्रवासाविषयीं मी सहज बोलत असें. याचें कारण दुश्मन् केसमध्यें आपल्या वाट्यास तुरुंग येणार नाहीं अशी खात्री होती. ता. १५ रात्रौ मी, श्री. बाबुराव जेधे व श्री. गुते वकील शेवटच्या गाडीनें मुंबईहून पुण्यास आलों. गाडींत गर्दीमुळें मला मुळींच झोंप मिळाली नव्हती. सबंध रात्र जागरण झालेलें, वादविवादानें व त्रासानें थक्का आलेला अशा त्या ता. १५ सप्टेंबर रोजीं ११ वाजतां मी व रा. जेधे कोर्टांत दाखल झालों. बागडेहि आले. बागडे तर जेऊन सुद्धां आले नव्हते, खिशामध्यें पांचसातशें रुपये घेऊन बागडे वेळींप्रसंगीं तयारीनेंच आले होते. या खटल्याच्या निकालासंबंधीं आम्हाला फारशी काळजीच नव्हती. बरोबर साडेअकरा वाजतां

## १२ महिने साधी कैद २५० रुपये दंड

ही शिक्षा आम्हांला सांगण्यांत आली. श्री. जेधे व बागडे यांना प्रत्येकीं सहा सहा महिने व शंभर रुपये दंड सांगण्यांत आला. रा. लाड यांनाहि माझ्याइतकीच शिक्षा फर्मावण्यांत आली. निकाल ऐकण्याचा हा दुसरा प्रसंग होता. गुरुवर्य वि. रा. शिंदे व सर्व प्रमुख माणसें भराभर कोर्टांत जमा होऊं लागलीं. शिवाजी हायस्कूलच्या विद्यार्थ्यांनीं कोर्टाचें पटांगण भरून गेलें. शहरांतील ब्राह्मणेतर पक्षीय लोकांची गर्दी होत चालली. आम्हांला कोर्टातच बसविल्यामुळें पटांगणांत उभी असलेलीं सर्व माणसें आम्हांकडे सारखी पहात होतीं. मॅजिस्ट्रेट साहेबांनीं आमची घरची मोटार असल्यास घरच्या मोटारीनें येरवड्यास जाण्याची परवानगी दिली. लागलीच खासेसाहेब महाराजांची मोटार बाहेर जमलेल्या समुदायापैकीं कोणी आणली; परन्तु जामीनावर येथेंच मोकळें होतां येईल तर पहावें असें बागडे यांनीं ठरविल्या-मुळें त्याच घटकेला येरवड्यास गेलों नाहीं. तासाचे घंटे बरोबर साठ मिनिटानेंच पडत होते. पण पांच पांच मिनिटाला तास होऊन गेला असें वाटत असें. सेशन कोर्टांत अपील गुदरून जामीनावर मोकळे करण्याकरतां खासे साहेबांच्या मोटारींत श्री. बाबुराव जेधे, गुते व मोरे वकील रवाना झाले. समोरील गर्दी वाढतच होती. अखेर जामीनावर सोडविण्याकरतां गेलेली मोटार परत आली नाहीं पण येरवड्यास पोंचविण्याकरतां जाणारी ती भली मोठी कैद्यांची मोटार " घर घर " असा भयानक नाद करीत येऊन दाखल झाली. त्या वेळेस मॅजिस्ट्रेट साहेबांनीं आम्हाला निरोप दिला. कोर्टांत जिन्यांतून चोहोंकडे खूप गर्दी होती. मोटार दारापासून पाच सात पाऊलावर उभी केली होती, पण त्याच पाच सात पाऊलांची वाट गर्दी बाजूस सारून काढलेली होती. हीं पाच सात पाऊलें टाकीत असतां हार येऊं लागले. कैदी पोंचविणारे अधिकारी हार घालूं नका असें सांगत होते. आम्ही आमच्या गळ्यांतील हार काढीत होतों, तरी पुन्हां लोक हार घातल्याशिवाय राहात नसत. प्रथम मी, नंतर जेधे व बागडे मोटारींत जाऊन बसले. लोकांनी आतां मोटारमध्यें हार टाकले आणि एकदम दार बंद झाल्याबरोबर

बाहेर श्री शिवाजी महाराजकी जय व महात्मा फुले की जय ही गर्जना ऐकूं येऊं लागली.

कोर्टाचे बाहेर करुण रस भरलेला होता. मोटारीचा "धुमधुम" असा आवाज होऊं लागला–बाहेर लोक ओरडतच होते. आमची मोटार एकदम सुरू झाली. आंतमध्यें एक दोन कैदी होते ते बिचारे आम्हां तिघांचे कपडे व हा सारा प्रकार पाहून स्वस्थ बसले होते. मोटार सुरू झाल्याबरोबर श्री. बागडे हंसत म्हणाले, "आतां बसूं या कीं चांगले मांड्या ठोकून !"

या मोटारींतून जात असतां आपण कोणत्या रस्त्यानें चाललों आहे हें मुळींच समजत नाहीं. जी सापट असते त्यांतून रस्ता दिसतो पण तो ओळखतां येणें अशक्य असतें. थोड्याच वेळांत एका ठिकाणीं वळण घेऊन मोटार उभी राहिली. मोटारचे दार उघडलें तों येरवडा सेंट्रल प्रिझनचा दरवाजा दिसला. मोटारींतून आम्ही तिघे उतरलों तेव्हां पोलीस वॉर्डर वगैरे आंतून पाहात होते. बाहेर कामाला जाऊन "संकल" वेड्यांचा आवाज देणारे कैद्यांचे ताफे आम्हांकडे सारखे पाहात होते. मोटारींत जीं फुलें पडलीं होतीं तीं बाहेर काढण्यांत आलीं. तुरुंगाच्या "दिंडी" तून आम्ही आंत शिरलों. आंत शिरतांना डाव्या हाताला एक लहानसें टेबल व स्टूल ठेवून एक जमादार बसलेले असतात. तेथें आम्ही व आम्हांबरोबर आलेले कैदी दोघे दोघे असे ओळीनें बसविण्यांत आले. आमची नांवें तेथें लिहून घेतलीं. आमच्या खिशांतले पैसे व घड्याळें तेथें स्वाधीन करावीं लागलीं. आंत शिरतांच ती इमारत कशी निराळीच दिसूं लागली. प्रत्येक वस्तु नवलाची वाटूं लागली. भव्य दरवाजा, त्यांचे ते भक्कम गज व त्यावरला पोलिसांचा जिवंत पहारा नवीनपणामुळें पहाण्यासारखा वाटला. वॉर्डरांच्या त्या पिंवळ्या विजारी पाहून तेहि कैदी असतील अशी मला प्रथम कल्पनाच आली नाहीं. आम्हांला नंतर ऑफीसमध्यें नेण्यांत आलें. एका कारकुनापुढें आमचीं नांवें व आह्मांला झालेल्या शिक्षा आमच्या तोंडून वदविण्यांत आल्यानंतर खुद्द जेलर साहेबांच्याहि पुढें उभें करण्यांत आलें.

जेलरसाहेबांचें एकंदर वर्तनांत "युरोपियन जंटलमनशिप" पूर्णपणें दिसून आली. आमची साधी कैद असल्यामुळें आमचे कपडे बदलावयाचे नव्हते. झडती वगैरे होऊन नंतर खऱ्या तुरुंगाच्या आंत आमचा प्रवेश झाला. नंतर "स्टोअर" मध्यें नेऊन तेथें आह्मांला एक काथ्याचें भक्कम व नवें असें तरट व दोन नव्या करकरीत घोंगड्या प्रत्येकाला दिल्या. त्याबरोबर

## थालीपाट

देण्यांत आलें. "थाली" व "पाट" (Pot) हीं दोन जस्ताचीं भांडीं असावींत असें मला वाटतें ! प्रथम त्यांचा रंग मला टिनसारखाच दिसला. एका हातांत "थालीपाट" व एका हातांत "बिस्तरा" घेऊन एक वॉर्डर आह्मांला इस्पितीळांतल्या बराकींत नेत होता. नव्या पाहुण्यांचा मुक्काम प्रथम इस्पिताळांतील बराकींत होत असतो. तेथें त्यांचें क्लासिफिकेशन, काम देणें, देवी काढणें वगैरे झाल्यावर त्यांना पुढें जेथें पाठवितील तेथें जावें लागतें. आह्मी दहापांच पावलें गेलों नसूं तोंच दुसरा "वॉर्डर" आला व त्यानें "पिच्छे लाव" असा दुसऱ्या वॉर्डरला हुकूम फर्माविला. आह्मांला वाटलें आमचा जामीन पटला व आतां आम्हीं सुटूं. एकच क्षण पण तिघांच्याहि चेहऱ्यावर आनंद झळकल्याशिवाय राहिला नाहीं. पण दुसऱ्याच निमिषांत "अंधरीमें रखनेका है" आणि तेवढ्याकरतां परत बोलावलें आहे असें समजलें. लागलीच ठरलेल्या जागीं ह्मणजे ८ खोल्या असलेल्या चाळींत आह्मांला नेऊन प्रत्येकाला निरनिराळ्या खोलींत जाण्यास सांगितलें. जेल बंद होण्याची वेळ होती, त्यामुळें आंत "सेल" मध्यें शिरतांच दारबंद करून "टाळा" लावण्यांत आला. एक वॉर्डर पुन्हा खात्री करून घेण्याकरतां "टाळा" तपासून गेला. थोड्याच वेळांत तुरुंगांतली जमादारांची पहिली "अलबिल" ऐकावयाला मिळाली. सर्व कैदी बंद झाल्यावर व रात्रपाळीच्या वॉर्डरच्या ताब्यांत तो हिशेब दिल्यावर पुढील मजेदार संभाषण ऐकूं येतें:—

जमादार—अमुक कैदी, टाळा खिडकी बोल्ट गज बराबर है ?

वॉर्डर—बराबर है !

जमादार—कारकून बंद है ?

वॉर्डर—बंद है !

जमा०—हं बोल.

वॉर्डर—( कैद्यांची संख्या उच्चारून ) अमुक कैदी बराबर बंद है जमादारसाब ! असें म्हणून सॅल्यूट करीत असे. आमच्या बराकीपुढेंच हा प्रकार रोज पहाण्यास मिळे ! तुरुंगामध्यें आमच्या राहण्याच्या ठिकाण्याला अंधारी हें मराठी नांव होतें व सॉलीटरी ( Solitary ) हें इंग्रजी नांव होतें. येरवड्याच्या तुरुंगांत, "युरोपीन" फाशी गॅट, अंधेरी, "सप्रेट" ( Separate ) "इस्पिताळ" सर्कल नं. १ नं. २ व नं. ३ अशीं निरनिराळ्या भागांची नांवें असून "इस्टोर" ( Store ) व "बत्तिखाना" अशी दुसऱ्या दोन भागांना नांवें आहेत. अंधेरीपैकीं आम्ही जुन्या अंधेरींत होतों. नांव अंधेरी पण तितका उजेड, तितकी स्वच्छता बाहेर पाहावयास मिळणार नाहीं. श्री. केशवराव तर त्याला क्वार्टरस म्हणत. पहिल्या दिवशीं आम्ही बंद झाल्यावर कोणाशीं कांहीं बोललों नाहीं. आधल्या रात्रीं मुंबईच्या त्रासानें व गाडींत जागरण झाल्यामुळें दमलों होतों. पोटांत जरी कांहीं नव्हतें तरी अतिश्रमामुळें मला ६ च्या सुमारास झोंप लागली. प्रातर्विधी करतां "सेल" मध्यें दोन कुंडे मांडलेले असतात. ऑफीसच्या बाजूला प्रत्येक तासाला वाजणारा 'तास' प्रथम एक दोन दिवस भेसुर नाद काढीत आहे असें वाटत असे. पहिल्या दिवशीं ऑफिसहि उंच आहे असें वाटलें. सकाळीं सुमारें साडेसातच्या सुमारास जेल "खोलण्याची घंटा" वाजली. "चावीवाला" येऊन आमच्या सेल्स खोलून गेला. एक चावीवाला, एक जमादार असे दोन अंमलदार व चार वॉर्डर इतके अधिकारी आमच्या तुरुंगांतल्या मुलखावर असत. सकाळीं उठल्याबरोबर जवळच असलेल्या नळावर तोंड धुवून सेल जवळ येऊन बसलों ! आम्ही बुधवारीं संध्याकाळीं मुक्कामाला तेथें गेलों होतों त्यामुळें दुसऱ्या दिवशीं आम्ही कोठें आहोंत याची पर्वा न करतां नेमका बुधवारपुढें गुरुवारच आला. तिकडून एक कैदी जस्ताचाच

एक भला मोठा पोहरा घेऊन व हातांत एक माप घेऊन

**कंजी घेऊन आला.**

कंजी हा पदार्थ काय आहे हें समजून घ्यायला तुरुंगांतच गेलें पाहिजे. हें पक्वान्न केव्हांपासून पैदा झालें व कोणी केलें असावें हें समजत नाहीं. अश्वत्थाम्यानें दूध मागितलें असतां त्याच्या आईनें त्याला पीठ व पाणी कालवून पिण्यास दिलें होतें. अशी एक पौराणिक कथा आपल्यांत आहे, पण त्यांत त्याच्या आईनें मीठही घातलें होतें कां नाहीं हें सांगायला आज अश्वत्थामा जिवंत नाहीं. पण आमचें अश्वत्थामा छापाचें "कंडेन्सड् मिल्क" अगदीं गरम गरम आम्हांपुढें आलें. आमच्या मराठ्यांत खेडें गांवला उरसाच्या वेळीं जत्रा असली म्हणजे एकादें बकरें मारण्याचा प्रसंग असला म्हणजे त्यांत "कण्या" हें एक पक्वान्न करीत असतात बाजरी न दळतां भातासारखी उकडून भाताच्या ऐवजीं

**'बरबटा' बरोबर**

ह्या "कण्या" खातं असतात आणि त्या मी खाललेल्या आहेत. पण या कंजीत सबंध धान्य न घालतां त्या धान्याचें पीठ करून अश्वत्थामाचें दूध उर्फ कंजी तयार केलेली असते. आह्मी तिघांनीं जेव्हां आमच्या वाट्यांची वाफा निघणारी गरमागरम कंजी थाळींत घेतली तेव्हां तिघेंही एकमेकांच्या तोंडा-कडे पाहूं लागलों. जेधे यांच्यासारखे धनाढय, श्रीमंतीचे व सर्वस्वी सुखांत वाढलेले तरुण व श्री. बागडे यांच्यासारखे सुखवस्तु व विद्वान वकील यांच्या पुढें जेव्हां ती कंजी पाहिली तेव्हां मला वाईट वाटलें. बागडे यांच्या नेहमींच्या स्वभावानुसार त्यांनीं त्या कंजीकडे पाहून विनोदाला सुरवात केली. आम्ही तोंडाला ती कंजी लावली. जेधे यांच्या घशाखालीं ती कंजी उतरेना. मी डोळे झांकले आणि एकाच सपाट्याला "थाळी" खाली करून टाकली. मला चहाचें व्यसन जबरदस्त व सुप्रसिद्ध असल्यामुळें कोणीकडून तरी घसा भाजून घेण्याची संवय पडली होती. मी सबंध कंजी प्यालेला पाहून "जवळकर ? हशीचें शेण काढीत आहां असें तुमचं एका पत्रानें कॅरिकेचर काढलें होतें तें बरोबर आहे," अशी जेधे यांनीं कोटी केली. माझ्या आईच्या वडलांचा

गवळ्याचा धंदा होता त्या धंद्यांत हैस दूध देत नसली किंवा व्याली तर तिला " कंजी " शिजवून घालतात या प्रकारावर जेध्यांची कोटी होती. आणि ही कंजी पुढें एक दोन दिवसांत मला आणखी मिळावी असें मला वाटूं लागलें.

चहाची तहान भागावयाला कंजीच जास्त चांगली. मी कंजीची जन्मभर शिफारस करीत राहीन. कारण या कंजीनें माझ्या जिभेवर चहानें पाडलेला पगडा कायमचा काढून टाकला आणि चहाशिवाय मला नुसतें जगतां येणेंच नव्हे तर सशक्त होतां येईल असें प्रत्ययास आणून दिलें. येरवड्यासारख्या स्वच्छ ठिकाणीं कंजी मिळत गेल्यामुळें माझें वजन वाढत गेलें. चहानें भूक लागत नाहीं पण कंजी म्हणजे पहिलवानाची " खुराक " आहे. उत्तम भूक लागायला कंजीसारखें दुसरें औषध नाहीं असें पुढें माझ्या प्रत्ययास आलें. हा " कंजी पान " विधी आटोपल्यावर वॉर्डरनें आज

**" फालीम " आहे**

म्हणून सांगितलें. आमच्या भागांत दर गुरुवारीं जेलर सुपरिंटेंडंट ह्यांची इन्स्पेक्शन असतें—" फालीम " या शब्दाचा अर्थतर नाहींच कळला, पण कशाला " फालीम " म्हणतात हेंही समजेना. प्रत्येकानें आपआपल्या सेलच्या दारांत " बिस्तारा " ठेवून थालीपाट नीट ठेवून उभें राहावयाचें असतें व इन्स्पेक्शनला फालीम म्हणतात. हें नंतर ध्यानांत आलें. सुपरेंटेन्डंटसाहेब जेलरसह प्रत्येक कैद्याची सहानुभूतिपूर्वक चौकशी करीत आम्हासमोरून गेले. सेलच्या बाहेर उभे राहिलेले असे आम्ही तिघे व आणखी एक पठाण कैदी असे साध्या ( Simple ) कैदेचेच कैदी उभे होतों. बाकी सगळे खोलीबंद होते. आमच्या बराकीसमोर एक जेलमधला मोठा रस्ताच होता. युरोपीयन वॉर्डकडे जाणारे लोक ( कैदी व वॉर्डर ) आमच्या समोरून जात. पोलीस अंमलदारांच्या टोपीवर एक लहानसें बक्कल असतें व त्या बक्कलांवर दोन किल्यांचा क्रॉस काढलेला असतो अशा तऱ्हेचे किल्लीछाप पोलीस; त्यांतून ' चावीवाल्याच्या हातांत तर किल्यांचा भला मोठा जुडगा—एक दंडा व पट्टयाला एक ' हातबेडी ' कायमची लटकलेली दिसावयाचीच. ' फालीम ' होऊन गेल्यावर बरोबर ९ वाजतां आमचा सकाळचा ' कंजीवाला ' व दुसरा एक

कैदी एकाच्या डोक्यावर भाकरीची परात व दुसऱ्याच्या हातांत भाजीचा पोहरा अशा रीतीनें भाकरी वाटीत ते आले. लागलीच वॉर्डरनें

**आपला भत्ता ले लेव**

म्हणून सुचविलें. तो ' भत्ता ' जवळ येईपर्यंत आम्हांला कसलीच कल्पना नव्हती. भाजीच्या पोहऱ्यांतून एक माप भाजी व तीन नंबरच्या दोन रोट्या आम्हाला देण्यांत आल्या. ' रोट्या ' जोंधळ्याच्या होत्या. भाजीमध्यें निरनिराळ्या जिनसांच्या मिश्रणामुळें मूळ ही भाजी कशाची केलेली आहे हें ओळखणें दुरापास्त होतें आणि मोठा वनस्पति शास्त्रज्ञ जरी गेला तरी पहिल्या दिवशीं त्याला त्या भाजीचें स्वरूप ठरविणें कठीण जाईल. बागडे व जेधे आम्ही तिघेही ' रोट्या ' फरशीवर ठेवून भाजी ' थाळींत ' ठेवून खाण्यास सुरवात केली; ' पाट ' मध्यें पिण्याकरतां पाणी भरून ठेवलेलें होतें. बागडे यांच्या विनोदानें पुनः येथें उचल खाल्लीच, आणि आमचा तें अन्न खाण्याचा पहिलाच प्रसंग असल्यामुळें अर्ध्या भाकरीवर आमच्या जिभेनें सत्याग्रह पुकारला. बागडे आदल्या दिवसाचे सबंध उपाशी होते. जेधे व मीसुद्धां दडपून जेवलों होतों तरी त्याला मोजून २४ तास लोटले होते. आणि त्या वेळेस पोटांत असें भुकेचें बंड माजलेलें नसतें तर ती अर्धी भाकरसुद्धां खाणें शक्य झालें नसतें. ' भत्ता ' खाल्ल्यावर नंतर आमच्या गप्पांना सुरवात झाली. वॉर्डर किंवा पोलीस अंमलदार आमच्याशीं आदबीनें वागताहेत असें आम्हांला पहिल्या दिवशीं दिसून आलें. दहा वाजल्यानंतर अकरा कांहीं लवकर वाजेनात. तिघेहि एके ठिकाणींच असल्यामुळें बोलण्यास सवड होती. आमच्या खोल्यांच्या दारांत बसलें म्हणजे गाड्या वगैरे ओढीत गेलेले कैदी दिसत. तेवढ्यांत " जवळकर, पुढल्या खटल्यांत तुम्हांला समजा सक्त मजुरी झाली तर असें काम करावें लागेल " हा जेधे यांचा विनोद चालायचाच. सकाळीं " कुंडेवाला "—हा महार किंवा भिल्ल या जातीचा बहुतेक असतो—सकाळीं येऊन त्यानें प्रत्येक खोलींतले कुंडे काढून नेले होते. आमची थट्टा येथपर्यंत चालत असें कीं, आपण कुठें आहोंत याचा सुद्धां आम्हाला विसर पडत असे. स्वामी रामतीर्थ यांनीं एकदां भंग्याचे संडास कां झाडलें व नम्रता येण्यास त्यालाहि

आपली तयारी कशी असावी वगैरे गोष्टी बागडे सांगत. बारा, एक, दोन लवकर वाजेनात. झालें चारचे ठोके पडले आणि लागलीच एका मिनिटानें शाळा सुटण्याच्या वेळेला वाजण्यासारखी घंटा वाजली आणि आमचा "भिसीवाला" ( चढण्या ) "भत्ता" घेऊन आला. बागडे यांच्या सेलचा नंबर ६, जेधे यांचा ५ व माझा ४ होता. त्यामुळें बागड्यांनीं पहिल्या सपाइयाला "भत्ता" नको म्हणून सांगितलें. त्यांच्या पाठोपाठ आम्ही दोघांनीं सांगितलें. आम्ही भत्ता घेतला नाहीं हें पहातांच जमादारानें आपण "इनकार" करीत आहांत कां म्हणून विचारिलें, कारण कोणत्याहि कैद्यानें रोटीचा इन्कार केला कीं, त्याचा "रपोट" ( Report ) करावा लागतो. बागडे म्हणाले अजून आम्हीं खावयाला शिकतों आहों, आम्हीं "इन्कार" करीत नाहीं. कारण आमच्या जिभेचे चोचले पुरविण्याकरतां आम्हीं कांहीं तुरुंगांत गेलों नव्हतों. आमचा जामीन अजून पटेल व आम्ही आज सुटूं अशीहि आम्हाला आशा होती. पांचचे ठोके पडले आणि चावीवाला येऊन नियमाप्रमाणें बंद करून गेला. आमच्या "जामीना" विषयीं आमचे निरनिराळे तर्क चालत. गुरुवार गेला शुक्रवार आला, शुक्रवारीं पुन्हां रोजचीच कंजी व रोटी बाजरीची आली. दर मंगळवार व शुक्रवारीं बाजरीच्या प्रत्येक वेळेला दोन रोट्या मिळतात. मंगळवारीं सकाळीं व शुक्रवारीं सायंकाळीं "डाळ" मिळते. हे दोन वार खेरीजकरून डाळ घातलेली भाजी मिळतें आणि या दोन दिवशीं एकवेळ निर्भेळ डाळ व निर्भेळ भाजी मिळतें. शुक्रवारीं आम्हीं "भत्ता खाण्यास शिकलों किंवा आम्हांला भुकेनें शिकवलें, शुक्रवारीं संध्याकाळीं जी ".डाळ" मिळाली ती तर संबंध खाल्ली आणि तिघांनीं पोटभर "भत्ता" खाल्ला. इतक्यांत एक वॉर्डर चार कैदी पाठवा अशी चिठ्ठी घेऊन आला. आम्हांला वाटलें, जमानत झाली, थोडेंसें बरेंहि वाटलें. आम्ही तिघे आणि मागल्या बराकींतून लाडांना बोलावून आणलें गेलें. लाडांच्या अंगावर कारागृहाचीं पावणें दोन वस्त्रें चढलेलीं, एक बंडी, लांडी चड्डी व टोपी. आम्ही तिघे आमच्या नेहमींच्याच पोषाखांत होतों. चौघांना मुलाखतीच्या ऑफिसांत नेण्यांत आलें

आणि तेथें आमची मुलाखत झाली. जामीनाचें अजून जमलें नाहीं, उद्यां समजेल अशी बातमी समजली. टूथपावडर, साबण, धोतरें, चादरी, टुवाल हीं उद्यां येतांना घेऊन या असें सांगावें लागलें. दुसऱ्या दिवशींच सदर सामान मिळालें. शनिवारीं कारकुनानें (तोहि कैदीच असतो) येऊन विचारलें, "मटण तुमकू चलता?" बागडे मटण खात नाहींत, पण आम्ही दोघांनीं होय म्हणून सांगितलें. रविवारीं सायंकाळीं मटण मिळत असतें हा आणखी नवा शोध आम्हांला लागला. या दिवसापासून तुरुंग बराच ओळखीचा झाल्यासारखा वाटूं लागला. रविवारीं तराजूनें मोजून मटण व मापानें मटणाचें पाणी किंवा कालवण किंवा रसा त्याला वाटेल तें नांव दिलें तरी एक एका अर्थानें लागूं पडेल. आम्हाला त्या दिवशी "मटण" अगदीं घरच्या सारखें जेवण लागलें. मटण खात नाहींत त्यांना "डाळ" मिळत असते. कांहीं वाचावयास नसल्यामुळें दिवस जात नाहीं. जेलमध्यें एक मोठी लायब्ररी आहे. एक दोन दिवसांत त्यांतून तीन पुस्तकें वाचावयास मिळालीं. एक विष्णुशास्त्री चिपळुणकरांचें चरित्र, टिळकांचें गीतारहस्य व रामतीर्थांची व्याख्यानें. या पुस्तकांपैकीं चिपळुणकरांचें चरित्र न उघडतांच शेवटपर्यंत पडलें होतें. कारण खटल्यांत पुराव्याकरतां उलट तपासणीकरतां उलटें सुलटें अनेकवेळां तें आम्ही वाचून काढलेलें होतें. गीतारहस्य प्रसिद्ध झालें त्याचवेळीं मी वाचलेलें होतें आणि वेळ काढण्याकरतां पुन्हां वाचण्यास सुरवात केली. हळुहळु शेजारच्या कैद्यांची थोडी-थोडी ओळख होऊं लागली. ज्यांनीं जेलमध्यें गुन्हे केले असतील त्यांना ठेवण्यांचा आमचा वॉर्ड असल्यामुळें आमचा तो एक

## जेलमधला जेल होता.

आम्हाला नांवानें हांक मारणें उपमर्दकारक होईल म्हणूनच कीं काय तिथेंच असलेल्या एका मोंगल कैद्यानें आम्हांला नांवें दिलीं होतीं. बागडे यांना 'वकीलसाब', जेधे यांना 'शेटसाब' व आम्हाला 'मास्टरसाब' अशा पदव्या मिळाल्या आणि बहुतेक आम्हाला याच नांवानें संबोधित! कैदी नवीन आल्यावर त्याच्या कपड्यांचें वगैरे चेकिंग व्हावें लागतें, म्हणजे

आंत येतांना जे जे कपडे आणले त्यावर पुन्हां ऑफिसरपुढें जाऊन चेकिंग व्हावें लागतें. यावेळेस ' भत्ता ' आमच्या तोंडवळणी पडूं लागला होता. जामीनाची वाट पहातच होतों; बाहेर छत्रपती मेळा निघाला असेल काय वगैरे विषयीं आमचे निरनिराळे तर्क चालत असत. एक दिवस आमच्या बराकींत डॉक्टर येऊन त्यांनीं प्रत्येकाला कोयनेल पिण्यास दिलें. जेधे यांना त्यामुळें दोन सडकून ओकाऱ्या झाल्या. लागलीच डॉक्टरांनीं त्यांना पुन्हां अ‍ॅन्टी डोज दिला. रात्रौ नऊ वाजतां पुन्हां डॉक्टर एकदां येऊन जेध्यांच्या तब्बेतीची चौकशी करून गेले. एक दिवस आम्ही सेलमध्यें सायंकाळीं बंद झाल्यावर मी एक पुस्तक वाचीत बसलों होतों आणि जेधे

**" शिवाजी आमचा राणा, मराठी आमचा बाणा "**

हें काव्य म्हणत होते. मी हें पद्य त्यांच्या तोंडून बाहेर अनेक वेळां ऐकलें होतें. पण तुरुंगांतल्या स्थल व काल महात्म्यामुळें आणि त्यांच्या खड्या सुरेल आवाजामुळें मी जणुं काय तें अगदीं पहिल्यानेंच ऐकतों आहे असें वाटूं लागलें. मी मी म्हणणारे मारुते पीर तुरुंग म्हणतांच नांगी टाकतात आणि आमचें जेधे तुरुंगामध्यें " शिवाजी आमचा राणा " आळवताहेत—माझ्या डोक्यांतून सिनेमांतल्या चित्राप्रमाणें अनेक कल्पना येऊन गेल्या. जेध्यांच्या आवाजांत एकप्रकारची चैतन्य उत्पन्न करण्याची शक्ति आहे. प्रत्येक शब्द हृदयांत जाऊन भिडतो. आपला बहुमोलाचा मोटेपणा विसरून " छत्रपति मेळ्यां "त जेधे स्वतः पदें म्हणत असल्यामुळें मेळ्याचा श्रोतृसमुदाय समुद्रासारखा मेळ्याभोंवती पसरलेला असे. या त्यांच्या तुरुंगातहि गाणें म्हणण्यापर्यंत प्रफुल्लित होणाऱ्या आनंदी वृत्तीला पाहून कौतुकासह आश्चर्यहि वाटल्यावांचून राहिलें नाहीं. आज ज्यांना परमेश्वराच्या कृपेनें कसलीहि ददात् नाहीं, संतति, संपत्ति, कीर्ती, लोकप्रीति आणि गोकुळासारखें गजबजलेलें घर सोडून ते सहा महिनें तुरुंगवास पत्करण्यास तयार झाले तर माझ्यासारख्या गरीब माणसाला एक वर्ष म्हणजे सहज आहे; या कल्पनेनें मला अवसान चढत असें; आणि एक वर्ष हां हां म्हणतां निघून जाईल असें वाटत असे. जेध्यांची पुण्याई हें ब्राह्मणेतर पक्षाचें भांडवल आहे. हें भांडवल, ही पुण्याई जर

# श्री. केशवराव जेधे.



शिवाजी आमुचा राणा । मराठी आमचा बाणा ॥

( पृष्ठ १६ )

[ लक्ष्मी वैभव प्रेस, मुंबई न. ४. ]

ब्राह्मणेतर पक्षाच्या पाठीवर परमेश्वराप्रमाणें उभी नसती तर राजर्षि शाहु-महाराजांच्या पाठीमागें ब्राह्मणेतर पक्षाची स्थिति केवीलवाणी झाली असती. म. फुले, भालेकर, लोखंडे वगैरे पहिल्या पिढीनंतर सत्यशोधक समाज ऐकूं-सुद्धां येत नव्हता. त्याप्रमाणें शाहुमहाराजांच्या नंतरहि तसें झालें असतें, परन्तु ब्राह्मणेतर समाजाचें सुदैव म्हणूनच असें अनेक पुढारी उत्पन्न झाले.

कोणतीहि चळवळ यशस्वी व्हावयाला त्या चळवळीच्या नेत्यांमध्यें पहिल्या प्रतीचा प्रामाणिकपणा असावा लागतो. कोणत्याहि पक्षाच्या स्थानिक अनुयायांमध्यें कांहींतरी धुसफूस असावयाचीच. हें सार्वजनिक चळवळीचा बारकाईनें अभ्यास करणाऱ्या माणसाला चटकन समजून येतें. पण पुण्यांत ब्राह्मणेतर पक्षाची एवढी जूट कां याचें इंगित जेधे बंधूंच्या प्रामाणिक, प्रेमळ व परोपकारी वृत्तींत सांपडणार आहे.

**सत्यशोधक**

समाजाच्या नांवानें दांतओंठ खाणारे बडेबडे आदमीहि जेधे यांच्या वैयक्तिक मोठेंपणामुळें व परोपकारबुद्धीमुळें कट्टे सत्यशोधक बनलेले आहेत. ज्यांची वर्तमानपत्रांतून सारखी स्तुति येत असतें पण ज्यांना आपण प्रत्यक्ष भेटलों असतां निराळाच अनुभव येईल असें अनेक पुढारी विद्यमान राजकीय पक्षांत सांपडतील, पण विरुद्ध पक्षानें ज्यांच्याविषयीं गैरसमज पसरविण्याचा कमाल प्रयत्न केला आहे त्या जेधेबंधूंना जर कोणी प्रत्यक्ष जाऊन भेटला तर तो गारीगार झालाच पाहिजे. महाराष्ट्र व वऱ्हाड येथील ब्राह्मणेतर पक्षाचें पुढारपण एकमुखी व निर्विवाद अशा रीतीनें " जेधे मॅन्शन " मध्यें एकवटण्याचें कारण जेध्यांच्या प्रामाणिकपणांतच सांपडेल. ब्राह्मणेतर पक्षाचा कोणीहि मनुष्य असो मग तो कौन्सिलचा उमेदवार असो नाहींतर मेजसारखा कोर्टापुढें उभा राहिलेला आरोपी असो, पाठीमागें कोणीहि वळून पाहिल्यास मनापासून मदत करण्यास धांवून आलेल्यामध्यें अगदीं पहिल्या प्रथम जेधे-बंधूच सांपडतील. इत्यादि विचार तुरुंगांत जितक्या प्रखरतेनें माझ्या डोक्यांत येत तितके बाहेर कधींच येत नव्हते. बाहेर अशाप्रकारचे विचार येण्यास सवडहि मिळत नसे. चळवळीला मोठेंपण यायला चळवळींत मोठीं माणसें

असावीं लागतात आणि माणसें मोठीं व्हायला त्यांनीं तत्त्वनिष्ठ व प्रामाणिक असावें लागतें.

चळवळीच्या पाठीवर पुढाऱ्यांचें "गुड विल" नसेल तर ती चळवळ कशीहि असो, यशस्वी होणें कठीण असतें. तत्त्व कितीहि उन्नतिप्रद असो पण तें ध्येय व तत्त्व जर ध्येयनिष्ठ सच्च्या पुढाऱ्यांकडून प्रतिपादिलें जात नसेल तर त्याला यश येणार नाहीं. ब्राह्मण–ब्राह्मणेतर पुढाऱ्यांची जर कोणी तुलना करूं लागला तर आज ब्राह्मणेतर पक्ष ब्राह्मण समाजाला सारखा चौफेर रेटीत कां नेत आहे याचें इंगीत तत्त्वनिष्ठ ब्राह्मणेतर पुढाऱ्यांच्या प्रामाणिकपणांत सांपडेल. आज खादी वापरा, उद्यां होळ्या करा, परवां कॉलेजें सोडा, पुन्हां मतें द्या, खादी फाडा, चरखा फोडा आणि नोकऱ्या जोडा असा विसंगत उपदेश करण्याचें पातक आजपर्यंत ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं कधींच केलें नाहीं.

## अनुयायांचा विश्वास हेंच पुढाऱ्याचें पुढारपण

असल्यामुळें व कांहीं पुढाऱ्यांनीं वाहत्या वाऱ्यावर वाहात जाण्याची प्रवृत्ति ठेवल्यामुळें ते जनतेच्या व अनुयायांच्या विश्वासाला मुकले आहेत. ब्राह्मणेतर पक्षांत असा प्रसंग कधींच आला नाहीं. आजूबाजूची परिस्थिति गढूळ झाल्यामुळें घाबरून जाऊन त्या परिस्थितींत वहात जाण्याचा घाबरटपणा ब्राह्मणांनीं केला आणि परिस्थितीला न डरतां आपल्या सोयीप्रमाणेंच परिस्थिति उत्पन्न करण्याचें धैर्य ब्राह्मणेतर कार्यकर्त्यांनीं दाखविलें. तारुण्य आणि विद्यार्थी दशा असल्यावर रक्त सळसळत असतें. तरुण भावनाप्रधान असतो आणि भावनावश तरुण त्यामुळें अंधश्रद्धाळु बनतो; असा तरुणांच्या कोंवळ्या मनाचा फायदा घेऊन त्यांना आपल्या देशभक्तीच्या बेगडी डामडौलाकरतां बळी देण्याचें महापातक ब्राह्मणेतर पुढाऱ्यांनीं केलें नाहीं. तरुण ब्राह्मणेतर महाराष्ट्र भलतीकडे भडकूं न देतां सत्कार्यावरच त्याला खडा रोखण्याचें भीमकर्म राजर्षि शाहुमहाराजांनीं केलें आणि आज तें जेधेबंधु पुढें चालवीत आहेत— माझ्या स्वतःविषयीं विचाराल तर मला मातापित्यानें जन्म दिला, शाहुमहाराजांनीं तत्त्व दिलें आणि जेधेबंधूंनीं चारित्र्य [ Life ] दिलेलें आहे.

ता. १५ सप्टेंबरला देशाचे दुष्मन केसमध्यें आम्हांला येरवडा जेलमध्यें जावें लागलें. ह्यावेळीं माझा १५३ ( अ ) चा खटला चालू होताच. त्या खटल्याची तारीख २२ लागली होती. खटले लढविण्यांत पुरावे गोळा करून वकीलासंबंधीं तयारी करून देण्याची भूमिका मी व केशवराव जेधे यांच्याकडे असे आणि आम्हीं दोघेहि आमच्या 'थालीपाट'मध्यें 'भिसी' वाल्याचा 'भत्ता' खात 'जुन्या' अंधारींत पडलेले ! तेव्हां १५३ [अ] च्या खटल्याची हेळसांड होते कीं काय अशी एक धास्ती वाटूं लागली. खटल्याचा निकाल कसाही लागो पण निकाल लागल्यावर आपण असें केलें असतें तर बरें झालें असतें, तसें केलें असतें तर बरें झालें असतें " अशी मनाला पुढें खुरखुर राहूं नये म्हणून आटोकाट व अहर्निश झटून सगळ्या गोष्टीचा खटल्यांत फायदा मिळवण्याचा आम्हीं प्रयत्न करीत होतों ! पण या वेळेस आम्हीं " कैदी " होतों. खटला अर्धवटच संपत आला होता. श्री. गुप्ते वकील यांनीं जेल ॲथॉरिटीजबरोबर पत्रव्यवहार करून तिथें जेलमध्यैंहि या १५३ च्या खटल्याचा पुरावा तयार करून देण्याची आम्हांला परवानगी मिळवून दिली. आम्हांला पाहिजे तीं पुस्तकें जेलमध्यें पाठविण्यांत आलीं आणि सकाळीं ऑफिसांत बोलावून तास दोन तास तीं वाचण्याची सवलत मिळाली.

तुरुंगामध्यें ही वेळ मौजेंत जात असें. २२ तारखेला मला कैद्याच्या मोटारींतून १५३ ( अ ) च्या खटल्याकरतां सिटी सबडिव्हीजनल मॅजिस्ट्रेट मि. स्लेडन यांचें कोर्टांत आणलें. त्यादिवशीं कांहींच काम चाललें नाहीं. पुन्हां दुसऱ्या दिवशींहि आणण्यांत आलें यामुळें ती कैद्यांची मोटार जरा संवयीची वाटूं लागली. अण्डर ट्रायलस या मोटारींतून कोर्टांत पोंचविण्यांत येतात. ही मोटार चोंहोंकडून झांकलेली असून आंत बसतांच आंतील लोक बहुतेक विड्या ओढायला सुरवात करतात, त्यामुळें गुदमरल्यासारखें होऊं लागतें; पण दहा पंधरा मिनीटांपेक्षां जास्त तुरुंगाचा प्रवास नसल्यामुळें तेवढें सहन करतां येत असें. तुरुंगांत

**तंबाखु विडी किंवा सिगारेट**

पाहण्याससुद्धां मिळत नाहीं. पूर्वीं विड्याचें व सिगारेटचें व्यसन मला

जबरदस्त जडलेलें होतें. तुरुंगामध्यें मात्र काय असेल तें असो पण चहा सिगारेटची आठवणसुद्धां होत नसे; वॉर्डर लोकांना त्यांच्या घरच्या पैशानें रोज सायंकाळीं तीन विड्या मिळण्याची परवानगी आहे असें वॉर्डर सांगत असत, पण आपण सर्वस्वाला सोडण्याची तयारी केल्यावर चैनीच्या वस्तु सोडणें मुळींच अवघड नसतें. वॉर्डरांना रोज जोंधळे किंवा बाजरी न मिळतां गव्हाच्या रोट्या दर वेळेस दोन मिळत असतात. तुरुंगांत पोंचल्यापासून सुमारें आठ दहा दिवसांत कैद्यांचे क्लासिफिकेशन होत असतें. आम्हां तिघानांहि हॉस्पिटलमध्यें नेण्यांत आलें, तेथें डॉक्टरांनीं आमच्या शरीराची कसून तपासणी केली, आमची उंची व वजन मोजण्यांत आलें. माझी उंची

**५ फूट ५ इंच**

आहे हें तेव्हांपासून समजलें व वजन ८७ पौंड भरलें. याच वेळीं शरीरावरील मुख्य खुणा चेहेरेपट्टी लिहून घेत असतात. माझ्या तळहातावरला तीळ पहिल्या प्रथम लिहिला गेला. याच वेळेला व्हॅक्सीनेशन करावयाचें असतें, तुरुंगांत गेल्यावर प्रत्येकाला देवी काढाव्याच लागतात. डॉक्टरांनीं तपासल्यानंतर सुपरिंटेंडंटसाहेबांच्या पुढें आम्हांला उघडें उभें करण्यांत आलें. ह्या वेळेस बडेसाहेब (सुपरिंटेंडंट) क्लास ठरवित असतात. आमची साधी कैद असल्यामुळें आमच्या बाबतींत क्लासाचें विशेष महत्त्व आम्हांला वाटलें नाहीं. कारण साध्या कैद्यांना कांहीं कामच नसतें. या वेळेस बड्यासाहेबांनीं माझ्या पुस्तकावर 'पूअर फिजिक्स' हा शेरा मारला होता. आज जामीन न पटला तर आम्हीं उद्यां देवी काढवूं असें बागडे यांनीं सांगितल्यामुळें त्या दिवशीं आमचें व्हॅक्सीनेशन झालें नाहीं. प्रत्येक कैद्याकरतां

**"प्रिझनर्स हिस्टरी टिकेट"**

असें वर लिहीलेलें पण लॉंगमनच्या कॉपीबुकासारखें एक बुक असतें. ६ महिन्यांपेक्षां कमी शिक्षा असलेल्या लोकांचें बुक चारच पानांचें असतें पण ६ महिने किंवा जास्त शिक्षावाल्यांचें मोठें असतें, पान उघडतांच पुठ्याच्या पाठीवर वेटचार्ट व पहिल्या पानावर संपूर्ण नांव, पहिला धंदा, कोणत्या कोर्टाची शिक्षा झाली, कोणत्या कलमानें झाली, हॅबिच्युएल कीं नॉनहॅबिच्युएल, पहिल्या गुन्ह्यांचा

आंकडा, तुरुंगांत दाखल झाल्याची तारीख, सुटण्याची तारीख, जेलमध्यें उत्तम रीतीनें वागल्यास जेलमॅन्युएलप्रमाणें मिळणारी माफी धरून सुटण्याची तारीख, क्लास व नंबर हें त्यावर लिहिलेलें असतें. या बुकांत कैद्यास जेलमध्यें झालेल्या शिक्षा नोंदविलेल्या असतात. त्याचें काम लिहिलेलें असतें. त्याची माफीहि त्यांतच नोंदतात, म्हणजे हें हिस्टरी टिकेट एकदां उघडून पाहिलें कीं, कैद्याविषयीं सर्व माहिती मिळूं शकतें. हें त्याचें तेथलें चरित्रच म्हणानांत ?

ता. २८ ला रा. बागडे व जेधे यांना सेशन कोर्टानें जामीनावर सोडलें. या दिवशीं मला न सोडण्याचें काय कारण असावें याचा खरा अदमास न लागल्यामुळें माझ्या मनावर त्या दिवशीं फार परिणाम झाला. आणि मला एकट्यालाच तुरुंगांत राहावें लागलें. जेधे, बागडे असतांना एक दिवशीं दुपारीं माझ्या सेलची लोखंडाची पट्टी तुटलेली होती ती आम्हीं पाहिली व लागलीच जमादाराला कळविलें. त्या दिवशीं आपल्याला निराळ्या ठिकाणीं—पट्टी लागलीच बसविली गेली नाहीं तर—जावें लागेल ही कल्पनासुद्धां मला दुःसह वाटली. पण मग लागलीच लोहार ( कैदीच ) आणून ती पट्टी बसविली गेली आणि मला खोली किंवा बराक बदलावी लागली नाहीं. पण आतां तर

## मी एकटाच होतो.

शेजारचे कैदी " मास्टर घबराव मत् " असें म्हणत होते. दुसऱ्या दिवसापासून पुन्हां कांहीं वाटेनासें झालें. तुरुंग ही जागा अशी आहे कीं, तेथें मनुष्य कोणत्याही स्थितींत सुखासमाधानानें रहावयास शिकतो. आतां मला तेथें गप्पा गोष्टी करावयाला कोणींच नव्हतें. दुसरे कैदी तेथेंच बंद केलेले असत पण त्यांच्याशीं बोलण्याची मला इच्छा होत नसे. माझ्या चाळींत जो मोंगल कैदी होता ती व्यक्ति मात्र कांहीं विशेष होती. आमच्या चाळी पाठीमागच्या बाजूसच दुसरी एक सात खोल्यांची चाळ आहे. जेलमध्येंहि ज्यांनीं भयंकर गुन्हे केलेले असतात अशा लोकांना ह्या खोल्यांतून बंद करून ठेवीत असतात. आमच्या इकडला मोंगल अति बंडखोर होता. धिप्पाड, मिशा पिकलेल्या, कपाळाची लहान पट्टी आणि त्यांत चकाकणारे

बारीक पण दिसण्यांत क्रूर असे डोळे ! ह्या मोंगल कैद्याचें तोंड सुरू झालें म्हणजे आटोपतां आटपत नसे. मागच्या बराकींतील कैद्यांचा आणि याचा कांहीं तरी तंटा होता. संध्याकाळीं बंदी होऊन टोंटलाची घंटा पडली कीं, यांचें नाटक सुरू झालेंच. पाठीमागून दोघे चौघे आणि इकडून हा एकटा पठ्या ! तरी चौघांच्या एक शिवीला याच्या चार शिव्या असें प्रमाण असें. या शिवीगाळी प्रथम

## धूऽऽऽत् तेऽऽरी

असा " धूत्कार " असे. हें एकदां " धूत् " सुरू झालें कीं आवरत नसे. रात्रपाळीवाले वॉर्डर, मुकादम,, अंमलदार सर्व त्यांना दटावीत पण त्या दटावण्याचा फार थोडा उपयोग होत असे. रात्रींचें त्यांचें वीररसप्रधान शिव्यासत्र ऐकलें म्हणजे असें वाटे कीं, सकाळीं हे एकमेकांच्या नरडीचा घोंट घेतील, पण सकाळीं पहावें तों चूपचाप !

आमची चाळ ऑफिसच्या अगदीं नजीक असे. दिवसां—बडेसाहेबांच्या—ऑफिसांतून आम्ही लोक काय करतों हें सहज दिसण्यासारखें असे. त्यामुळें जराही आरडाओरड झाली कीं कोणी तरी येत असे. हे कैदी बहुतेक जेल फिरून आलेले होते. त्यांच्या शिवीगाळींत

## तुम विसापूर जेलमें

तमाखू चुराया " " रोटी चुराया " वगैरे गंमती असत. तासांचे घंटे पडूं लागले तरी हे कैदी " बजाव तेरी " " धूत् तेरी " " और बजाव " असें ओरडत. तर्जनी व आंगठा एकावर एक ठेवून तोंडानें हे लोक एक प्रकारचा आवाज काढीत त्याला त्यांच्या भाषेंत " पपेरी " हें नांव आहे. ही एकदां " पपेरी " वाजूं लागली कीं, दुसरा चिडलाच आणि दुसऱ्याला चिडवण्याकरतांच ती वाजवतात. सकाळीं इकडला एखादा कैदी उन्हांत बिस्तारा टाकायला गेला कीं, पाठीमागचे हळुच " पपेरी " वाजवीत कीं, त्यानेंहि एक दोन शिव्या हासडल्याच. पाठीमागच्या बराकींत सुप्रसिद्ध बावला केसमधला

होता. सकाळ संध्याकाळ तो माझ्या खोलीसमोरून जात असतां दिसत असें. तो बिचारा शेजारच्या कैद्यांना भाईमिया, बडेमिया वगैरे म्हणून गप्प बसविण्याचा कधीं कधीं प्रयत्न करी, पण त्याला कोणी जुमानीत नसे. मी एकटा असल्यामुळें मला मुळींच करमत नसे. मध्येंच ३० सप्टेंबरला खटल्याकरतां मला कोर्टांत यावें लागलें त्या वेळेस विजयी मराठाकर्ते श्रीपतराव शिंदे यांची साक्ष होती. पुढें चार आक्टोबर तारीख लागली.

याच सुमारास कोमागाटामारू प्रकरणाच्या वेळीं जन्मठेप शिक्षा झालेले एक शीख वॉर्डर आंत कांहीं मारामारी केल्याच्या गुन्ह्यावरून आमच्या बराकींत आणून बंद केले. त्यांची "वॉर्डरी" काढून घेण्यांत आली व खोलींत बंदीहि पुढें दोन चार दिवसांत काढण्यांत आली. हा शीख गृहस्थ अत्यंत सभ्य, प्रसन्न आणि उमदा दिसून आला. त्याचें तें धिप्पाड, बांधेसूद, पिळदार शरीर आणि हंसत मुद्रा पाहून मला मोठें नवल वाटे. सकाळीं प्रथम मला खोलींतून बाहेर सोडीत असत—मी नळावर चाललों असतां ज्या खोलींत तो शिख कैदी होता त्यांतून

"वंदे मातरम्"

या शब्दानें त्यानें मला अभिवंदन केलें. या कैद्याचें नांव **हरनामसिंग** होतें. याचा आजबाजुच्या सर्व कैद्यावर दरारा होता. सगळे "भाईजी" "सरदारजी" या नांवानें त्याच्याशीं नरम होऊन बोलत असत. एरव्हीं बडया बडया बाता झोकणारे आमचे शेजारी बहाद्दर या हरनामसिंगापुढें रात्रौचा "धूत्कार" सुद्धां फार जोरानें करीत नसत. चोर दरवडेखोरां-विषयीं हरनामसिंग कसलीही सहानुभूति दाखवित नसे. हा कैदी आमच्या बराकींत आल्यामुळें मी थोडा तरी माणसांच्या वसाहतींत आलों असें मला वाटूं लागलें. हे कैदी कसे भयंकर असतात व त्यांच्याशीं कसें वागावें हें मला हरनामसिंगांनी समजून सांगितलें. रोज सकाळीं उठतांच माझ्या कानीं व मुखांतूनहि या शीखांमुळें "वंदेमातरम्" हा शब्द पडत व निघत असे. शिख कैदी अत्यंत शिस्तीनें वागत असल्यामुळें ऑफीसरांच्या त्यांच्या विषयीं

वर्तनांत विशेष आदर दिसून येत असे. शिखांना " पंजाबचे रॅशन " मिळतें. त्यांचा स्वयंपाकहि स्वतंत्र होत असतो व तो शीखच करीत असतात. त्यांच्या डोक्यांवर केस असल्यामुळें त्याना टोपी घालण्यास न देतां " फेटा " देत असतात. केश, किशोरी, कंकण, कंगवा व कुकरी यापैकीं कुकरी खेरीज तुरुंगांतहि त्यांचे चार " ककार " राखले जातात. त्यांचा " भिशीवाला " आला कीं त्याला मुसलमान कैदीदेखील " सासरी काल " (सत् श्री अकाल) " भाईजी " या शब्दानें सलाम करीत असत ! " सत् श्री अकाल " हा त्यांचा अभिवंदनाचा शब्द आहे. पण त्याचा अडाणीपणामुळें "सासरी काल" असा कांहीं उच्चार करतात. जन्मठेपीचे कांहीं कैदी सुमारें बारा चौदा वर्षे तुरुंगांत काढलेले होते पण त्यांना बाहेरच्या राजकारणाविषयीं अगदीं " अपटुडेट " माहिती असलेली दिसून आली. शीखांची भाषा मला प्रथम मुळींच समजत नसे. पण एकादा शब्द न समजला तर " इसका मतलब क्या है " हें मी विचारून त्यांच्या अतिप्रचारांतले शब्द माहितीचें करून घेतले. आपल्याशीं कोणी शीख अस्सल पंजाबी भाषेंत बोलूं लागला कीं, " जडी नाळे " अशाप्रकारचा एक ध्वनी मधून मधून पण सारखा ऐकूं येत असतो. हा शीख कैदी तुरुंगांतच उर्दू वाचण्यास शिकला होता. आपणहि याकडून उर्दू वाचण्यास शिकावें असा मी विचार केला पण " कायदा " (उर्दू प्रायमर) जवळ नसल्यामुळें मला लवकर शिकतां येईना. हा "कायदा" मागितल्यावर जेलमध्यें मिळतो व पाटीपेन्सिलहि मिळूं शकते पण ही सर्व सामुग्री मिळण्याच्या आंतच आमची सुटका झाली. या वेळेपासून तुरुंगांत

## माझें वजन वाढूं लागलें.

१५३ (अ) च्या खटल्याकरतां आलों म्हणजे प्रकृति पाहून स्नेही मंडळी खुष होत असत. थोड्याच दिवसांत माझ्या डाव्या दंडावर चार ठिकाणीं देवी काढण्यांत आल्या. मला इनॉक्युलेशननें सुद्धां फिट येतें असें मी डॉक्टरांना सांगितल्यामुळें इतर कैद्याप्रमाणें उभें न करतां खुर्चीवर बसवून शक्य ती काळजी घेऊन अगदीं हलक्या हातानें देवी टोंचल्या आणि त्यामुळें मला बिलकूल त्रास झाला नाहीं. थोडासा ताप येतो असें म्हणतात पण

मला बिलकुल ताप आला नाहीं. देवी काढल्यानंतर प्रकृतीवर कांहीं परिणाम झाला कीं काय हें पहाण्याकरितांहि डॉक्टर दोनतीनदां येऊन गेले. शीख कैद्यांना " काथ्या काम " दिलें होतें. ह्यांत काथ्याची दोरी वळावी लागते किंवा दोरीचा काथ्या करावा लागतो. पुन्हा दुसरा एक कैदी आला. त्याला चक्की होती. ह्यांत ३५ पौंड बाजरी किंवा ज्वारी दळावी लागते. मी चक्की अजूनपर्यंत पाहिली नव्हती. कंबरे इतक्या उंचीच्या भक्कम घडवंचीवर चांगलें कुरुंदाचें जातें असतें आणि त्यावर उभ्यानें दळावें लागतें. त्याला " चक्की पिसणें " हें तुरुंगाच्या भाषेंत नांव आहे. एका खोलींत चक्की व एका खोलींत त्याला रात्रीं बंद करीत असत. हा कैदी मुंबईचा मवाली होता. त्याचें मूळचें ठिकाण " सियालकोट जिल्हा " असल्यामुळें त्याला आमच्या शेजारच्या कैद्यांनीं " सियालकोटी हें नांव दिलें होतें. या " सियालकोटीला " ३५ पौंड चक्की म्हणजे कांहीं वाटत नसें. आपण पुन्हां सुटल्यावर आपण पूर्वींचाच धंदा करणार असें तो सहज म्हणत असें. त्याचें पूर्वींचें कांहीं ' दाखले ' [ Previous Convions ] होते. तुरुंगामध्यें निदान माझ्या आजूबाजूला असे " दाखलेवाले "च बहुतेक होते. एकाच खटल्यांत ज्यांना शिक्षा झाली असेल त्यांना कैद्यांच्या भाषेंत " नंबरकरी " म्हणतात. प्रत्येक कैदी आपली बढाई मारून आपल्या " नंबरकऱ्यानें " घोंटाळा केला म्हणून सांपडलों असें सांगत असतो. चोरीचा धंदा करणाऱ्या लोकांचे कांहीं ठराविक शब्दहि आहेत. ते शिपायाला

**" नोसिया म्हणतात, "**

रुपायाला " दमडी " म्हणतात, दोन आण्याला " तुकडा " म्हणतात, कोकेनला " भडक " म्हणतात. चोरीच्या धंद्यांत सुद्धां क्लास आहेत. त्यांची आपआपसांत भाषा चालली म्हणजे सहज ऐकत बसावें म्हणजे त्यांचे पराक्रम कसले भयंकर असतात हें समजतें आणि असें वाटूं लागतें कीं, मला जर यावेळीं अधिकार असता तर यांना मी जन्मभर तुरुंगांत जखडून ठेवलें असतें. या चोरीच्या धंद्यांपैकीं " डांकेबाज " हे आपणाला सर्वांत श्रेष्ठ समजतात.

त्यांच्या खालोखाल " बामदाज " म्हणजे रात्रीं भिंत पाडून दार फोडून किंवा नळाला धरून मजलेच्या मजले चढून चोऱ्या करणारे. यांच्या खालचा नंबर म्हणजे " तोडबाज ! " म्हणजे एखाद्या दुकानांत दिवसाढवळ्या दोघा-चौघांनीं शिरून, एकादोघांनीं माल खरेदी करण्याच्या मिषानें मालकाला गोंधळून दुसऱ्यानें " तोड " करावयाची. याच्याहि खालचा वर्ग म्हणजे

**" पडीबाज "**

या " पडीबाज " शब्दाचा अर्थ उन्हाळ्यामुळें किंवा जागेच्या गैरसोयीमुळें जे बिचारे दिवसभर श्रम करून थकूनभागून मुंबईत रस्त्याला फळीवर किंवा उघड्या जागेंत झोंपतात त्यांची मालमत्ता झोंपेंत त्यांनीं नकळत उठवायची. तुरुंगांत ज्यानें हर उपायानें पैसे आणले असतील त्याला ते " दस्तीवाला " म्हणतात. ही "दस्ती" ते जेव्हां पकडले जातात तेव्हांच त्यांच्या जवळ असतें.

जे बिलंदर व अट्टल चोर असतात त्यांनीं आपल्या घशामध्यें " खोबडे " पाडलेले असतात. म्हणजे गिनी किंवा सोन्याची आंगठी गिळायची म्हणजे ती घशामध्यें नेमक्या " खोबडा " पाडलेल्या ठिकाणीं जाऊन बसते. त्या-मुळें झडतीमध्यें हा माल मुळींच सांपडत नाहीं. त्यांच्या आपसांतल्या बोलण्यावरून हा " खोबडा " पाडण्याचें सत्कार्य डॉक्टर लोकांच्या सहाय्या-वांचून होत नसावें असें मला आढळून आलें. जर आमच्या शेजारी " चोर भाई " चें हें म्हणणें खरें असेल तर सुशिक्षित समजल्या जाणाऱ्या व डॉक्टरीसारख्या पवित्र धंद्यांत असणाऱ्या माणसांनीं अशा " चोर भाई " ना हा " खोबडा " पाडण्यांत आपल्या ज्ञानाचा उपयोग होऊं द्यावा हें मोठें लज्जास्पद आहे. मी त्यांच्यापैकीं कोणाशीं बोलत नसे. पण त्यांचें आपआपसांत चाललेलें बोलणें माझ्या कानांवरून जात असें. घशामध्यें योग्य जागा कोणती हें तपासून घेऊन एक लहानशी शिशाची गोळी तिला पाठीमागें दोरा बांधून तो दोरा दातांत धरायचा. ज्या जागेवर " खोबडा " पाडायचा असेल त्या जागेपर्यंत ती गोळी पोंचेल इतका नेमका लांब दोरा असावयाचा. जेवणाच्या वेळेस ती गोळी काढावयाची. अशा रीतीनें शिशाच्या

वजनानें आंतलें मांस झिजून तेथें नेमका कांहीं दिवसांनीं खड्डा पडतो व या लोकांना पोलीसांच्या डोळ्यांत चटकन धूळ फेंकता येतें. ही त्यांच्या बोलण्यांतून ऐकूं आलेली हकीकत जर खरी असेल तर हा प्रकार फार भयंकर आहे असें म्हणावें लागतें. कारण प्रत्यक्ष

## गर्दन कापल्याशिवाय

त्यांतला मालच सांपडायचा नाहीं. परंतु माझ्या समक्ष कोणत्याहि "चोर भाई" नें "खोबड्यां"तून कांहींहि काढलेलें मला दिसलें नाहीं, त्यामुळें त्या प्रकारावर माझा विश्वास बसला नाहीं. त्यांच्या अनेक बातांपैकीं हीही एक बात असावी असें मला वाटतें. डॉक्टरसारखा सुशिक्षित गृहस्थ अशा चौर्यकर्मांत आपल्या ज्ञानाचा उपयोगहि करून देणार नाहीं अशी मला खात्री वाटतें. हा "खोबडा" डॉक्टरी ज्ञानाशिवाय पाडतांहि येणार नाहीं. आमचे ते बहाद्दर शेजारी जेव्हां आपल्या पराक्रमाचें पोवाडे गात तेव्हां मला 'नाथमाधवाच्या' राय क्लब अथवा सोनेरी टोळी या कादंबरींतले हिरोज अगदीं भुरटे असल्यासारखें वाटत. श्री. नाथमाधव ह्यांच्यासारख्या खंद्या लेखकांना जर या आमच्या शेजारीं असणाऱ्या कॅरेक्टर्स स्टडी करावयाला मिळाल्या असत्या तर मराठी भाषेस भूषणभूत होऊन राहणारी कादंबरी महाराष्ट्राला लाभली असती. ती कादंबरी नसलेली पुरवली, पण या लोकांचे शेजारीं राहण्याचें दुर्दैव कोणावरहि ओढवूं नये असा माझा अनुभव आहे.

तुरुंगांतलें हेही चोर जीवंत आणि जातिवंत असतात. त्यांच्या माऱ्यामाऱ्या, त्यांचे गुन्हे, त्यांच्या बुकावर नोंदलेलें असतात. त्यांच्या मुखांतून निघणारी मुक्ताफळें तापलेल्या सळईसारखीं कानांत घुसत असतात; मनुष्यप्राण्यांत आणि जनावरांत किती अंतर आहे हें मोजण्याकरतां जर ह्या असल्या कॅरेक्टर्स हिशोबी धरल्या तर जनावरें वरचा नंबर पटकावतील. कारण जनावरांकडूनहि जो गुन्हा होणार नाहीं असले अर्वाच्य गुन्हे जेलमध्यें या लोकांकडून कधीं कधीं घडतात आणि त्याबद्दल त्यांना तेथें शिक्षाहि मिळत असते. आपण रंगभूमीवर व्हिलन पहात असतों. पण बिचारा नाटक-

कार सुशिक्षित समुहांत वाढलेला असतो. नाटककार हा प्राणीच गोगलगाई-सारखा निरुपद्रवी असण्याचा बहुतेक संभव असतो, त्यामुळें या खऱ्या जगद्रंगभूमीवर धुमाकूळ घालणारे खरे व्हिलनस् त्याच्या दृष्टीच्या टापूत येत नाहींत. माझ्या शेजारीं येरवडा जेलमधल्या गाळीव आणि अस्सल कॅरेक्टर्स होत्या; मुंबईचे हे "चोर भाई" आपसांत एकमेकाला "मजूर" म्हणत असतात. त्यांच्या जेव्हां जेव्हां मुंबईच्या गप्पा चालावयाच्या तेव्हां दोन टाकीजवळील

## नार्थ ब्रुक गार्डन जागेवर

बसल्याच्या गप्पा असत. मी शीख कैद्याशिवाय कोणाशींहि बोलत नसल्या-मुळें मला ते बरेंच वचकत. माझे दोन खटले मिळून मला

## १०८ दिवस

काढावे लागलें. या एकशें आठ दिवसांच्या अनुभवावरून असें वाटूं लागलें कीं, राजकीय केसीस वगळल्या तर ज्यांच्या करतां जेल बांधला आहे त्या लोकांचा विचार केला म्हणजे असें वाटतें तुरुंगांत अजून जास्त कडकपणा आला पाहिजे.

"चोऱ्या करणें" हें व्यसन आहे. हें व्यसन एकदां लागलें कीं, जात नाहीं. तो पुढें हॅबिच्युअल बनतो याचें कारण त्याला तुरुंगांत त्याचें तें व्यसन सुटण्याइतका त्रास होत नाहीं. जेलर व सुपरिंटेंडण्ट शक्य तोंपर्यंत सहानुभूतीनें व प्रेमळपणानें वागतात. ह्या कैद्यांना सुधारण्याचा शक्य तो प्रयत्न करतात. त्यांच्या तब्येतींत थोडासा बिघाड झाल्यास त्याच्या औषध-पाण्याची चोख व्यवस्था होते. कैद्याला दोन वेळां पोट भरेल एवढें जेवण मिळतें. इंग्लिश लोकांमध्यें टापटीप हा जो एक अमोलिक गुण आहे तो जेलमध्यें पूर्णत्वास पोंचलेला आढळतो. सर्व काम अगदीं यंत्रा-प्रमाणें चाललेलें असतें. जगण्याकरतां जेवढ्या वस्तु अवश्यक आहेत तेवढ्या मिळतात. तुरुंगांत जगण्याकरतां खावें लागते आणि बाहेर खाण्याकरतां जगावें लागतें. एवढा फरक असल्यामुळें तुरुंगांत पोंचतांच

आपण मोटें आहोंत, अर्थात आपली मोठी टापटीप राखलीच पाहिजे असें कांहीं लोकांना वाटत असतें. मग ते तुरुंगांत निरनिराळ्या जिनसा मागूं लागतात आणि अर्थात नियमाविरुद्ध त्या वस्तु मिळाल्या नाहींत म्हणजे तुरुंगाच्या अधिकाऱ्यांच्या नांवानें ते ओरड करतात. ज्याला खाण्याकरतांच त्रास होतो त्यानें जेलचे ऐवजीं वेलाशक " ताज महाल हॉटेल " मध्यें जावें.

ज्वारी व बाजरी हें जेलमध्यें मुख्य अन्न आहे; भाजी कधीं कधीं वाईटहि होते. शंभर माणसांचें प्रयोजन असून पैसे देऊन आणलेल्या आचाऱ्याच्या हातूनसुद्धां जर स्वयंपाक बिघडलेला असतो तर कैद्यांनीच केलेला आणि तोहि जवळजवळ दीड हजार माणसांचा स्वयंपाक थोडासा एकादेवेळीं बिघडायचाच. तुरुंगांतली जबर शिक्षा म्हणजे " चक्की " पण तेच " चक्की " वाले असले भयंकर असतात कीं, " चक्की " शिवाय आणखी एकादी भयंकर शिक्षा शोधून काढल्याशिवाय ह्या " चोर भाई " चा क्लास वठणीवर येणार नाहीं. बाहेर अत्यंत काबाडकष्ट करूनहि पोटभर अन्न न मिळणारे कोट्यावधि लोक आहेत. तुरुंगांत शक्तीबाहेर कधींच कष्ट देत नाहींत. तुरुंगांत जर कांहीं कशाची उणीव भासत असेल तर ती व्यक्ति स्वातंत्र्याची. आपलें स्वातंत्र्य कायद्यानें जप्त झाल्यामुळें मनुष्य अगदीं गोरामोरा होत असतो. पण हा त्रास आहे, असें म्हणायला मी तयार नाहीं, कारण यामुळें स्वातंत्र्य ही काय चीज आहे याची पक्की जाणीव माणसाला होते. ह्यामुळें तुरुंग हें स्वातंत्र्याचे धडे देणारें परिणामकारक व फलदायी विद्यालय आहे असें माझें मत आहे.

जेलसारखें विद्यालय प्राप्त झाले असता अशा विद्यालयांतून परत येऊनहि जे लोक धार्मिक, सामाजिक किंवा राजकीय स्वातंत्र्याच्या आड येतात त्यांचा डिप्लोमा वाया गेला असें म्हटलें पाहिजे. देशाचे दुश्मन केसमध्यें अपीलांत सुटल्यामुळें साध्या कैदेचा मला ३३ दिवस अनुभव मिळाला, पण १५३ (अ) या खटल्याचा निकाल नोव्हेंबर १२ ला लागून पुन्हां तीन आठवड्यांतच

## ६ महिने सक्त मजूरी व ५०० रुपये दंड

हीं दुसरी शिक्षा घेऊन मला येरवड्यासच यावें लागलें. या वेळेस सक्त मजुरी असल्यामुळें माझ्या प्रेमळ व सुहृद स्नेह्यांना चिंता पडली होती. तुरुंगाविषयीं बाहेर निरनिराळ्या अफवा पसरलेल्या असतात. जेलरिटर्न्ड 'लोक' त्या अफवा नाहींशा करण्याऐवजीं प्रसंगी त्यांत भरच घालीत असतात. एका अत्यंत प्रेमळ वृद्धानें तर "जवळकर, तुम्ही जेलमधल्या जाचांतून परत याल कीं नाहीं" असें उद्गार काढलें होतें. १२ तारखेला मि. स्लेडन यांचे पुढें हजर राहण्याकरतां जेव्हां मी निघालों तेव्हां गुरुवर्य वि. रा. शिंदे हे कडकडून मला भेटले. अशा वेळीं मात्र मनुष्य गंभीर होतो आणि पुढें येऊन भिडलेल्या निकालाविषयीं मनुष्याला एकच क्षण पण निरनिराळें विचार-सुचूं लागतात. या वेळीं खटला आणि त्याचा निकाल हें मला सहज वाटूं लागलें होतें. परंतु या वेळेला आणि या कलमाला सक्त मजूरी असल्यामुळें माझ्या अशक्त प्रकृतीमुळें सर्वांना चिंता वाटत होती. "सती जायला निघायचें आणि मग शालुला जपायचें" या शब्दांनीं मी समजूत घालीत असें. या वेळीं मी घरची पुस्तकें घेऊन जय्यत तयारीनें निघालों होतों. या वेळेस मला फिकीर बिलकुल वाटत नव्हती. याचें अजूनहि मला आश्चर्य वाटतें. आदल्या रात्रौ उद्यां जरी खटल्याचा निकाल आहे तरी गाढ झोंप लागली होती. माझ्यावर कसलाच परिणाम झाला नव्हता. १२ वाजल्यानंतर आम्हांला शिक्षा फर्मावण्यांत आली. लागलीच आम्हांला तिथेंच असलेल्या "चौकींत" बंदोबस्तांत नेऊन ठेवलें. हा दिवसच कांहीं विशेष होता. जेव्हां मोटार येईपर्यंत कोर्टांतल्याच गेटांत आम्ही गेलों तेव्हां माझ्या पाठीमागें कांहीं लोक मजविषयींच बोलत येत होते. माझ्याजवळ चार पुस्तकें मी घेतलींच होतीं या दिवशीं चार वाजतां कैदी पोंचविणारे अधिकारी मिस्टर जोन्स यांनीं आपल्या खासगी टू सीटर मोटारमध्यें मला येरवड्यास पोंचविलें. म. गांधींनाहि माझ्या या खासगी मोटारींतून नेलें होतें, असें मि. जोन्स त्या वेळेस म्हणाले. आम्ही अगदीं फिरावयास चालल्याप्रमाणें मोटार उडवीत येरवडा गांठला; जेलच्या महाद्वारापुढें आम्ही

गेल्यावर मी फिरून आलों असेन अशी कोणाला कल्पनाहि होणें शक्य नव्हतें. या वेळेस कोणतीच गोष्ट मला नवी नव्हती. आणि ६ महिनें शिक्षा मला बिलकुल मामुली वाटत होती; मी आंत शिरतांच पहिली ओळख झाल्यामुळें जो तो मजकडे पहात होता. जेलरसाहेबांच्या पुढें गेल्यावर "जवळकर, तुम्हीं पुन्हां आलांत. अपील करणार ना ? जामीन वगैरेची व्यवस्था करणार ना ?" अशी सहानुभूतिपूर्वक चौकशी केली. या वेळेस सक्तमजूरी असल्यामुळें कपडे बदलायचे होते. तरी त्यांतल्या त्यांत चांगलें असलेलें कपडे मला आणून दिलें तो स्वातंत्र्य विद्यालयाचा युनिफार्म आम्ही चढवला; तें कपडे घातल्यावर मला जरा मोकळें मोकळें वाटल्यासारखें झालें आणि आमच्या पहिल्याच बराकींत आम्हाला नेण्यांत आलें. आमच्या बराकींतील कैदी "अरेरे मास्टरभाई फेर लौट आये" असें ओरडू लागले, हरनामसींगांनीं आमचे हंसत स्वागत केलें. आजबाजुचे कैदी व वार्डर "असें कसें झालें" म्हणून म्हणूं लागलें. पुन्हां आमच्या पूर्वस्थळीं आम्हांला ठेवले. मला कैद्याच्या पोशाखांत पाहून सर्वांनांच नवल वाटलें कारण पूर्वीं माझा घरचा पोशाख होता. आमचा पुन्हां तो थालीपाट, कंजी, भत्ता या अभिनव सृष्टींत आम्ही उतरलों. या वेळेस मला जेलचें नियम माहीत असल्यामुळें मी "भत्ता" मागितला. लागलीच वॉर्डरनें धावाधाव करून "भत्ता" आणून दिला. यथासांग भत्ता खाल्ल्यावर आमची स्वारी आमच्या सेलमध्यें बंद झाली. पुन्हां तो 'आलबिल' पुन्हां ते तासाला ठणावणारे घंटे आणि पुन्हां ते "धुत्तेरेऽऽ" आम्हांला ऐकूं येऊं लागले. या वेळेस व्हॅक्सीनेशन् वगैरे आमचे पूर्वींच झाल्यामुळें नुसतें क्लासिफिकेशन् व्हावयाचें होतें. पहिल्या २३ दिवसांत ८७ पौंडाचें ९२ पौंड वजन झालें होतें. शुक्रवारीं संध्याकाळीं आम्ही आमच्या महाविद्यालयांत मुक्कामाला गेलों होतों. हरनामसिंगांनीं तर आमच्या बराकीला 'सिमला' हें नांव दिलें होतें. हवा मोकळी, जागा स्वच्छ, सर्व कांहीं ठीक होतें. शुक्रवारीं गेल्यामुळें पुढल्या गुरुवारपर्यंत म्हणजे

## ‘ फालीम ’ पर्यंत

आम्हाला काम मुळींच नव्हतें. सक्तमजूरीच्या कैद्याला पोंचल्या दिवसापासून थोडें बहुत काम करावें लागतें. पण आमच्या पहिल्या आठवड्यांत आम्हांला कोणी कामहि देईना किंवा सांगेना. आमचे पहिले न्यायाधीश मि. फ्लेमींग जेल व्हिजिटला आले होते. मला पाहिल्याबरोबर ते मजकडे आले आणि केव्हां आलांत, काम काय दिलें वगैरे चौकशी करून प्रेमळपणानें दोन शब्द बोलून गेले. याचा परिणाम असा होत असे कीं, शेजारचे कैदी त्यामुळें मला वचकत असत. या दिवशीं ‘ फालीम ’ असल्यामुळें बडेसाहेब येऊन गेले व आम्हाला काथ्या काम दिलें. एक अर्धा पौंड काथ्या माझ्या सेलच्या पुढें येऊन पडूं लागला. दोरी वळण्याचा मजवर जन्मांत प्रसंगहि आला नाहीं. मला वळताहि येत नसें. भाईजी ( शीखकैदी ) कडून मी दोरी वळण्यास शिकलों. कैद्याचें बुक तयार होईपर्यंत कांहींतरी काम नांवाला देत असतात. एकदां ‘ बुक ’ तयार झाले, त्याचा क्लास ठरला, म्हणजे जेलरसाहेब खरें काम देत असतात. सक्त मजुरीतला क्लास टोपीवरून ओळखतात. पहिल्या क्लासच्या कैद्यांना पांढरी टोपी घालावी लागते, दुसऱ्या क्लासचे काळे टोपीवाले, तिसरे पिवळे टोपीवाले आणि म्हातारे कोतारे अगदीं शेवटचे. त्यांना अर्धी पिवळी व अर्धी काळी टोपी मिळते. आम्हांला काळी टोपी मिळाली. ‘ बुकां ’ त

G. M.

आणि पूअर फिजीकस् हा शेरा होता. पहिल्या क्लासाला G. H. हा शेरा असतो. बंडीला डाव्या बाजुला एक गुंडी असते. त्या गुंडीला एक जस्ती ‘ बिल्ला ’ ( Body Ticket ) लावावें लागतें. त्यावर एका बाजूला प्रिझनर नंबर असतो. या वेळेस माझा कैदी नंबर ९४९८ होता. मध्यें नांव, त्याखालीं १५३ १ इं. पि. को. आणि आल्याची तारीख व सुटण्याची तारीख असतें. आम्हाला डबल युनिफॉर्म व एक उत्तम अशी गरम बंडी मिळाली होती. पुढें आमच्या घरच्या कपड्यांचें गाठोडें बांधून त्याला शिऊन टाकले ! आमचें नवें बुक, नवा बिल्ला, नवा ड्रेस वगैरेसह आम्हांला सुमारें गेल्यापासून १५ दिवसांनीं “ काथ्याकाम ” मिळालें. या वेळेस ‘ रसी ’

करायला मी शिकलों होतों आणि जेवढें माझ्यापुढें आणून टाकीत तेवढें तेव्हांच उरकून मोकळा होत असें. या वेळीं आल्यापासून मी सारखा फिरत असें. वॉर्डरहि फिरूं नका असें सांगण्यास दचकत. वरें. कोठून कोठपर्यंत व कोणत्या टाईमाला फिरावयाचें हेंहि मला माहित नव्हतें. कैद्यांपैकीं वॉर्डरच्या खालचा वॉचमन असतो. या 'वाचमिन' ( watch ) कडे फाटक असतें. तो सकाळपासून सायंकाळपर्यंत फाटकांत पहारा करीत असतो. असा सात आठ दिवस मी खूप आमच्या कंपाऊण्डमध्यें फिरावयाचा. ऑफिसमधून आम्ही काय करतों हें सर्व दिसावयाचें. एकदां वडे साहेबांनीं "फार फिरूं नका" असें सांगितलें. तेव्हांपासून सकाळीं ९ ते १० व सायंकाळीं ४ ते ५ या दोनच तासांत फिरत असे. मधल्या वेळीं माझी 'सेल' मी मुळींच सोडीत नसे. कांहीं वाचावयास नसल्यामुळें दिवस फार कंटाळवाणा जाऊं लागला. जें काम म्हणून दिलें होतें त्याला पुरा एक तासहि लागत नसें. तेव्हां आंतल्या लायब्ररींतून एकादें पुस्तक मागवून तें वाचायचें! आपल्याला पाहिजे तें पुस्तक वाचावयाला न मिळतां मिळेल तें वाचावें लागतें. जें पाहिजे तें पुस्तक कोणी कैद्यानें वाचण्यास नेलेलें असावयाचें. या वेळेस आमच्या शेजारीं एकदोन कैदी आलेले होते. पहिला जो मुंबईचा "चक्की" वाला मवाली होता तो सुटला होता, पण दुसरा एक मवाल्यांचा मुगुटमणी माझ्या वराकींत बंदीला होता. या नवीन कैद्यामुळें जितका त्रास होत असें तितकीच करमणुकहि होत असें. प्रथम एक वर्ष होऊन पुढें तुरुंगांतून पळून जाणें वगैरे अनेक गुन्ह्यांमुळें त्यांची शिक्षा तेराचौदा वर्षेपर्यंत वाढली असें तो म्हणत असें. हा मूळचा हिंदू असून नंतर मुसलमान झालेला होता, पण त्याची वागणूक

**न हिंदुर्न यवनः**

अशाच तऱ्हेची असें. तुरुंगामध्यें मुसलमानांना लांब चड्डी व मोठा दुवाल देण्यांत येत असतो. येवढ्या खुणेवरून हा हिंदु कीं मुसलमान तें ओळखतां येतें. नमाज पढण्याकरतां म्हणून हें महावस्त्र देण्यांत येतें असें ऐकण्यांत आलें. या कैद्याला गाण्याचा अत्यंत शोक असें आणि तो उत्तम गातहि असें.

" थाली " वर तबला वाजवीत किंवा नुसताच " भमपक " असा तोंडानें तो असा सुंदर तबला वाजवीत असे कीं, मला तर पोट धरधरून हसूं येत असें.

माझ्या शेजारीं जो मोंगल कैदी होता त्यानें चुगली केली असें मागल्या कांहीं कैद्यांना वाटलें; त्या दिवशीं रात्रौ दिवसा " धुत् तेरे चुगलखोरकी " असा मारूतीच्या सैन्यासारखा सारखा भुःभुःकार चालविला होता. अखेर मोंगल कैद्याला आमच्या वॉर्डमधून काढून " सप्रेट (Separate) मध्यें नेलें. पुढें कांहीं दिवसांनीं तिकडूनहि त्याला आमच्या वॉर्डमध्यें आणण्यांत आलें. पुन्हां मागच्या " भाई "नीं " धूत् " सुरू केलें. हा मोंगल कैदीहि बडा वस्ताद होता. जेव्हां मागले कैदी शिवीगाळी थांबविनात तेव्हां त्यानें " फांस " लावून घेण्याचा फार्स केला, लंगोटी व टुवाल, एके ठिकाणीं बांधून तो गळयाला लावला, लागलीच माझ्या शेजारचे कैदी वॉर्डरला हांका मारूं लागले. वॉर्डर धांवत आला. रात्रपाळीवाल्या वॉर्डरवर एक मुकादम ( कैदीच ) असतो तोहि धांवत आला. जमादार आला, त्याला फांस सोड म्हणून सांगूं लागले पण त्याला नाटकच करावयाचें असल्यामुळें तो कशाला फांस सोडतो, त्याला खात्रीहि होती कीं, आपला प्राण जात नाहीं. झालें लागलीच जमादाराला तत्क्षणींच जेलरसाहेबांना रिपोर्ट करावा लागला. रात्रौ ९ च्या पुढें याची सेल खोलून त्याचे सर्व कपडे बाहेर काढण्यांत आले आणि दिगंबर स्थितींत त्याला पुन्हां बंद केलें. पुन्हां नंतर कांहीं वेळानें त्याला कपडे मिळाले पण सकाळींच त्याला आमच्या वॉर्डमधून काढून लावला.

पुढें एक दोन दिवसांनीं जेलमध्यें सुप्रसिद्ध असलेला एक पठाण कैदी आला. तो इंग्रजी उत्तम बोलत असे. इंग्लंडवरून त्याला डीपोर्ट केलें असें तो म्हणत असे. इंग्लीश लोकांच्या राहणीविषयीं व देशाविषयीं मात्र त्याला खुप माहिती असलेली दिसली. पहिल्या गवई कैद्याला हा जोडीदार मिळाला तेव्हां आमचा मोहला नुसता दणाणत असे; हा पठाण कैदी आपल्या कोंवळ्या (?) आवाजांत एकदां गाऊं लागला कीं, त्याच्या गाण्याकरतां हरणें जमा होण्याऐवजीं वाघसुद्धां घाबरून पळतील असा त्याचा आवाज होता. अंडर ट्रायलसूची

बराक आमच्या उजव्या हाताला असल्यामुळें रोज येणारे जाणारे अंडर ट्रायलस् आमच्या समोरूनच जात. त्या अंडर ट्रायलस् विषयीं यांच्या ज्या आपसांत चेष्टा चालावयाच्या त्या ऐकवत नसत. त्यांत आणखी एका कैद्याची भर पडली. हा नवीन कैदी सिंधी होता. हा सिंधी कैदी जेलखान्यांतला गुंड म्हणून त्याची प्रख्याती होती. भयंकर कैद्यांना वॉर्डरसुद्धां वचकतात. या वेळेस रात्रौ बाराबारा वाजेपर्यंत मला झोंप येत नसे. त्यांचीं तीं गाणीं, ते तबले, शेवटीं "किसा" (गोष्टी) सारख्या चालावयाच्याच. "एक बादशहा होता आणि एक वजीर होता." हे प्रत्येक गोष्टींत असावयाचेंच. कधीं कधीं

"इन्शहाल्ला कब छुडावे"

म्हणून अगदीं काकुळतीहि आलेले दिसत. "अल्ला मालिक है" ऐसा बी एक दिन आयेंगा की हम बोलेंगे भाई! मै तो कल छुटनेवाला है" हा पश्चात्ताप किंवा ही तळमळ त्यांना मनापासून होत असलेली दिसे. "क्या करे मास्टर भाई! जब जेलमें बाहेरका ख्याल आतां है तब इनसान की तबियत परेशान् होती है" असें त्याच्या तोंडून करुण स्वरानें शब्द निघत. पण हा पश्चात्ताप त्यांना अगदीं थोडा वेळ होत असे. लागलीच त्यांना सर आली कीं पुन्हां त्यांची "बोम्बशोर" सुखांत व्हावयाची. 'अंधारीं' तून 'सर्कल' मध्यें जाण्याविषयीं विनंती करण्याकरतां ते मोठी तयारी करीत असत. कोणी म्हणें आतां जेलरसाहेब आले कीं, त्यांना धमकी देऊन 'सर्कल' मध्यें पाठविण्यास भाग पाडीन, पण यांची सारी बडबड पाठीमागें. प्रत्यक्ष जेलरसाहेब समोर येऊन उभे राहिले कीं, हे एकदम नरम पडत; याचें कारण हे लोक भेकड होते हें नसून जेलरसाहेबांच्या वागण्यांतच अशी कांहीं पद्धत असें कीं, हे सारे नरव्याघ्र गायीसारखे होत. जेलरसाहेब गेल्यावर मग म्हणत जेलरसाहेबांशी जोरांत बोलावें असें वाटतच नाहीं. अंडर ट्रायल्स् शिक्षा भोगून आले म्हणजे हे आपल्या शिक्षेचा हिशेब करून हा सुटेल तेव्हां "हमारी इतनी सजा बाकी होयेगी" असें म्हणत, एखादा नवा कैदी त्यांचा दोस्त असला कीं "घबरोमत" "खुप रहो" "आबाद रहो" "मस्त

रहो " " ये सजा नहीं है मजा है " असें ह्मणत. एक दिवस डाळ लवकर न शिजल्यामुळें बरोबर ९ वाजतां ' भत्ता ' आला नाहीं दहा वाजले, अकरां वाजले, बारा वाजले यावेळेस " दोनप्रहर " याची खरी कल्पना मला झाली. मग बारा वाजतां

## चटणीकांदाभाकर

आम्हांला मिळाली, यावेळीं चटणीभाकर अमृतापेक्षांहि गोड लागली. त्या दिवसापासून न शिजणारी डाळ एकदम रद्द करण्यांत येऊन " भत्त्या " चा इतका उत्तम बंदोबस्त झाला कीं, साधारण मध्यम वर्गाच्या लोकांच्या घरांतील अन्नाप्रमाणें " भत्ता " येऊं लागला. नाताळापासून " काथ्या " सुद्धां बरोबर वजन करून तीन पौंड येऊं लागला. त्याला भिजवून सोडवायचा व कामठीनें सडकला कीं, त्याचा अगदीं मोकळा काथ्या होत असतो. सकाळीं थंडी फार पडत असें त्यांत भिजवलेला काथ्या खोलावा लागल्यामुळें माझ्या हातांपायांचे ' सांधे ' दुखूं लागले. पुढें जेवढें काम पडलें असेल तेवढें सगळें करावयाचें असें मी ठरविलें होतें व त्याप्रमाणें करीत असे. नाताळापूर्वी कामाची ' वर्दी ' नव्हती. पण आतां काम मोजून घेत असत. चार सहा दिवस असें भर काम केलें नाहीं तोंच आमचे सांधे दुखूं लागले. रात्रौ ९ वाजतां वॉर्डरला सांगतांच डॉक्टर एकदम आले, ताप आहे कीं काय हेंहि पाहण्यांत आलें, त्या वेळेस वड्यासाहेबांची " रौंड " होती. बडेसाहेबहि आले आणि प्रकृतिविषयी विचारपूस करून गेले. सकाळीं आम्हांला लागलीच " इस्पितळांत " नेण्यांत आलें. हॉस्पिटलमध्यें डीटेन करून आजाऱ्यांच्या बराकींत मला ठेवण्यांत आलें. या वेळेस मी घरच्या पुस्तकांची परवानगी मिळवल्यामुळें मजजवळ माझी घरची दोन पुस्तकें होतीं. हीं पुस्तकें कोणाला द्यावयाचीं नाहीं असें जेलरसाहेबांनीं मला बजाविलें होतें. पण ह्या बराकी म्हणजे पंढरपूर स्टेशनच्या थर्ड क्लासच्या वेटींगरूमसारख्या असतात. वेटींगरूम पक्का नसतो आणि या खूप भक्कम फरसबंदी असतात. माझ्याजवळ सॅम्युएलचें ' Self Help ' हें पुस्तक होतें त्यांतलीं चित्रें ( फोटो ) पाहण्याकरतां जो तो मागूं लागला

तेव्हां त्यांना " मला पुस्तक दुसऱ्याला देण्याचा हुकूम नाहीं " असें मोठ्या जुलमानें सांगावें लागत असें. तेथें आजाऱ्याची शुश्रुषा करण्याला कांहीं कैदी असतात त्यांना

**बडदासी म्हणतात.**

हे " बडदासी " जर एखाद्या कोवळ्या मनाच्या रोग्यानें पाहिले तर तो जास्त आजारी पडावयाचा, इतके विद्रूप दिसतात. पण जेलमध्यें कसलेंहि कोवळें मन दगड फोडण्यासारखें टणक बनत असतें. स्वतंत्र खोली नसल्यामुळें त्या जत्रेंत मला बिलकुल बरें वाटेना. सुमारें तीस चाळीस कैदी —त्यांपैकीं कांहीं आजारी खाटेवर पडलेले—होते. " इस्पिस्टालमे " आजारी होऊन येण्याची या कैद्यांना मोठी हौस असते, कारण काम करावें लागत नाहीं. दुध भात वगैरे चांगलें अन्न मिळतें. आजारी पडण्याकरतां हे लोक निरनिराळी सोंगें करतात. जेलमधल्या दोस्ताची गांठ घ्यायची असल्यास त्यालाहि आजारी पडावयाला सांगतात व आपणहि आजारी पडतात. आजार उत्पन्न करण्याच्या युक्त्यांपैकीं त्यांची एक युक्ति तेथें मला ऐकावयाला मिळाली. गुंज पैदा करून तिची पावडर करावयाची. ती पावडर दोऱ्याला घासून सुईनें चामडींत टोंचून न्यावयाची. त्यामुळें तो भाग एकदम सुजतो आणि आजारी पडून " दूध " " चावल " वगैरे मजा मारावयास मिळतें. त्या बराकींत रात्र मी मोठ्या कष्टानें काढली. मला त्या " चोरभाई "च्या बढाया ऐकवेनात. सकाळीं उठल्याबरोबर मी डॉक्टरांना विनंती केली कीं, मला माझ्या स्वतंत्र ' सेल '—मध्यें पाठवाल तर मला बरें वाटण्याचा संभव आहे. लागलीच आमचें बिऱ्हाड पूर्वस्थळीं आलें. इस्पितळाकडे चोवीस तास मला खरी शिक्षा वाटली. माझ्याशीं सर्व अदबीनें वागत पण त्यांच्यांत मिसळून गप्पा मारीत बसावें असें मला वाटेना. माझ्या स्वतंत्र " सेल " मध्यें आणल्यावर तेथें बाटलीनें मला औषध पोंचविण्यांत येत होतें. माझे सांधेहि राहिले. या वेळीं इस्पितळांत वजन केलें तेव्हां ९८ पौंड वजन भरलें होतें. राजकीय कैदी हंगर स्ट्राइक करतात म्हणून

## एका मवाली कैद्यानेंहि

माझ्या वॉर्डमध्यें असतां हंगर स्ट्राईक केला होता. याची शिक्षाहि बरीच म्हणजे सात वर्षांची होती. यानें कोणत्याहि मोठ्या तत्त्वाकरतां अन्नत्याग केला नसून गव्हाची रोटी हवी म्हणून अन्नत्याग केला होता. ज्वारी बाजरी खाऊन याचें पूर्वीं वजनहि वाढलें होतें व शिवाय हे बहाद्दर हॅबिच्युएल होते. टोटलची घंटा पडून दिवस मावळल्यावर कोणी तरी त्याला सहज विचारी "भाईमिया, किनारी (रोटी) भेजूं?" पण तो मी मध्यें असल्यामुळें घेत नसें व त्यास विचारणाराहि बोलण्यापलिकडे कांहीं करीत नसें. एक दोन दिवसांतच तो "भत्ता" खाऊं लागला. जितके दिवस उपवास काढण्याची मर्यादा आहे

## तितके दिवससुद्धां

त्याच्यानें दम निघाला नाहीं.

आमची स्वारी त्या "सिमल्या"ला असतां आणखी एक मोठा विलक्षण प्रकार घडला. माझ्या शेजारच्या दोन सेलमधले दोन मुसलमान कैदी धर्माविषयीं कांहीं बोलत होते. बाहेर पहाऱ्यावर हिंदु वॉर्डर होता. आठ ठोके पडल्यावर वॉर्डरनें "बात मत करो" असा हुकूम फर्मावला. तरी त्यांची "बात" चाललीच होती. तिकडून वॉर्डरहि जोरांत आला. झालें! आमच्या शेजारच्या कैद्याच्या तोंडांतून छरा उडतांच जशी झाडावरचीं पाखरें उडतात तशा शिव्या उसळल्या. "पागलका बच्चा" "कुतेका बच्चा" येथपर्यंत जोंवर शिव्या होत्या, तोंपर्यंत ठीक होतें. पण जेव्हां "काफिरका बच्चा" ही शिवी ह्या हिंदु वॉर्डरनें ऐकली तेव्हां त्यानें झारी भरून पाणी आणून त्या कैद्याच्या सेलमध्यें "धबधब्यानें" टाकण्यास सुरवात केली. याचा आंतून शिव्याचा प्रवाह, त्याचा बाहेरून पाण्याचा धबधबा, अशी घनचक्कर उडून राहिली होती. त्यांच्या कसल्याहि भानगडींत आपण पडूं नये हें मला "भाईजी"नें समजावून सांगितलेलें असल्यामुळें माझ्या 'सेल' शेजारीं चाललेला धांगडधिंगा निमुटपणें पाहण्या-

खेरीज मला गत्यंतर नव्हतें. तितक्यांत आंतला एक मुसलमान कैदी म्हणाला ‘ याद राख

**हमारे कुरान शरीफके उप्पर**

पानी आता है ’ बाहेरचा हिंदुहि कांहीं कमी नव्हता. त्यानें कुराणाविषयीं कांहीं अपशब्द वापरलें ! झालें, या वेळीं सगळे मुसलमान बिघडले. या वेळेस मात्र आपण आतां मध्यें पडलें पाहिजे असें मला वाटूं लागलें. तिकडून “ भाईजी ”हि तंटा मिटविण्याचा प्रयत्न करीत होता. हिंदु वॉर्डरला मी पाणी थांबविण्यास सांगितलें. तुम्ही ह्याचा साहेबाला रिपोर्ट करा असें मी सांगत होतो. यांच्या कसल्याहि भानगडींत मी साक्ष देण्यास तयार नसल्यामुळें तें म्हणत “ हमारे मजबकू ( धर्माला ) इसने गाली दिया है , तुम साबकु बोलेंगे तो हम चूपे बैठेंगे. ” ह्यांवर मी त्यांना बजावलें कीं, मी होऊन साहेबांना कांहीं एक सांगणार नाहीं, तुम्हीं वाटेल तें सांगा. आणि साहेबांनीं जर मला विचारलें तर मी सारें खरें सांगेन. या आमच्या अटीवर शेजारचें सर्व मुसलमान गप्प बसले. पुढें त्यांनीं साहेबांकडे रपोट केला. आम्हांला ऑफिसमध्यें बोलावण्यांत आलें. हिंदु वॉर्डर “ मी कांहींच बोललों नाहीं ” असें म्हणत होता. बडे साहेबांनी त्या वॉर्डरला काय शिक्षा दिली हें मला कळणें शक्य नव्हतें पण त्या वेळच्या एकंदर प्रकारावरून त्याचें कांहीं माफीचें दिवस तरी काटले गेले असतील असें मला वाटतें. मी बड्या साहेबांपुढें असा “ खटल्या ”करतां आल्यामुळें पोलीस, वॉर्डर, कारकून वगैरे माझ्या हांतूनच कांहीं गुन्हा घडला कीं काय अशा समजुतीनें आश्चर्यानें पाहात होते. जेलमध्यें कोणाच्याहि भानगडींत पडावयाचें नाहीं; कसलीहि साक्ष द्यावयाची नाहीं हें जरी मी ठरवून ठेवलें होतें तरी अशा थोड्याशा चमत्कारिक प्रसंगीं माझा तो निश्चय मला मोडावा लागला. आंतल्या गुन्ह्याबद्दल जे जे असे खटले होतात त्यांत जेलर किंवा सुपरिंटेंडेंट अत्यंत सावधपणानें न्याय करतात. कांहीं दिवसांनीं “ भाईजी ” “ वाचमन् ” बनून दुसऱ्या बराकींत लागले. आमच्या बहाद्दर शेजाऱ्यांच्या दिवसभर मौजा चालावयाच्याच. कोणी “ गोरा वॉर्डर ” गेला कीं “ साब

बिस्कुट देव " असें हें म्हणायचेंच. त्या बिचाऱ्याला हिन्दी समजत नसल्यामुळें तोहि हंसत जात असें. कोणी मुक्तिफौजवाला आला कीं, "साब हमकू

**इसा मसीहमे लेते ?"**

( खिस्तीधर्मात घेतां ? ) असें तें विचारींत. हा त्यांचा निव्वळ मजेखातर खेळ चालत असें. एकादां गरीबसा वॉर्डर चालला कीं, एकानें म्हणावें 'अरे यही है' दुसऱ्यानें म्हणावें 'अरे नही यही तो रोटी खानेवाला है' तिसऱ्यानें म्हणावें 'भाई जाने देव ! उसकू मत बोलो. बडा राजा आदमी है' एकादां वॉर्डर चिडत असें आणि तो चिडला म्हणजे हें खदखदां हंसत असत. रात्रपाळीवाले पोलीस समोरून वळकटी घेऊन चाललें कीं, 'हां स्टेशन तो दूर है' असें हें म्हणायचेंच ! जो कैदी किंवा वॉर्डर चांगला असतो त्याला ते 'राजा' म्हणतात. 'बडा राजा आदमी है' हें जेलमधलें सर्टिफिकेट आहे. जेलमध्यें एकमेकाला वॉर्डरच्या हातीं सलाम 'भेजण्या'चा फार प्रघात आहे. टोटलची घंटा सुमारें साडेसहा वाजतां पडली म्हणजे मागल्या बराकींतलें पुढल्यांना पुढल्या बराकींतलें मागल्यांना 'अलेकुम सलाम' देत असत. आठची घंटा पडली कीं, कोणी तरी एक 'अझान्' देत असें त्या प्रार्थनेच्या वेळीं मात्र सर्व मुसलमान कैदी गप्प बसत. रात्रौ कधीं कधीं मागच्या बराकींतून अबदुल लतीफ 'अझान्' देतांना ऐकूं येत असें. त्याच्या आवाजांत जो मूर्तिमंत करुण रस भरलेला असें किंवा भक्ति दिसत असें तशी इतर कैद्यांतून दिसत नसें. दर पंधरा दिवसांनीं कांट्यावर आमचें वजन करीत तेव्हां

**बावला केसमधलें आनन्दराव फणसे**

मला पहावयास मिळत. मला माझ्या शेजाऱ्यांचा शेवटीं कंटाळा आला; कारण त्यांचा रोज रात्रौ थालीपाटाच्या धुमधडाक्यांत 'होने दो खुशी दिलकी' का जलसा चालावयाचा. शेवटीं जेलरसाहेबांना माझी जागा बदलण्याबद्दल मी विनंती केली. लागलीच दुसऱ्या दिवशीं ज्या चाळींत रा. लाड होते तिकडे एका 'सेल'मध्यें सकाळीं नेलें, पण लागलीच त्याच दिवशीं मला अपीलांत सुटावें लागलें.

पहिल्या .प्रथम साधी कैद होती तेव्हां ३३ दिवस भरावे लागले पण अपीलांत निर्दोषी सुटलों. पुढें या शेवटच्या खटल्यांत ७५ दिवस अपीलांतून सुटेपर्यंत भरले. झाली एवढी शिक्षा व ५०० रुपये दंड असा अपीलांत निकाल लागला.

. जेलमध्यें मला केस काढावे लागले नाहींत व कपडेहि अत्यंत स्वच्छ राखले जात असल्यामुळें कोणताहि नवीन कैदी किंवा वॉर्डर आलाच तर थोडा दबकतच बोलत असे. ऑफिसर फार प्रेमानें वागत असत. तुरुंगांत संबोधतांना एकेरी नांवानें हांक मारतात पण तसा अपमानास्पद प्रसंग मजवर आला नाहीं. साधारणतः जो कैदी जेलमध्यें कसल्या भानगडी न करतां शिस्तीनें वागतो त्याला सहसा त्रास होत नाहीं.

सोंगट्या खेळणाऱ्यांना "फर्जीत" माहीत असतें पण जेलमध्यें "फर्जीत" याचा अर्थ निराळाच आहे. जेलमध्यें जे पोलीस असतात त्यांना ज्या दिवशीं रात्रपाळी असते त्याच्या दुसऱ्या दिवशीं सुटी मिळते, त्याला 'फर्जीत' म्हणतात. पोलीसांचे पगार मात्र फारच कमी आहेत. जेलमध्यें तंबाखू, गांजा वगैरे कधीं कधीं सांपडण्याचें श्रेय जसें हुशार कैद्यांकडे आहे तसेंच पोलिसांच्या कमी पगाराकडे अर्थात् सरकारकडेहि आहेच. येरवडा जेलमध्यें—आणि बहुतेक ठिकाणीं हीच स्थिति—पोलीस ब्राह्मणेतर आहेत. विशेषतः मराठ्यांचा व महारांचा भरणा आहे. एक मात्र ब्राह्मण दिसला. माझ्यावरील जमादार अस्पृश्यांपैकीं होता. जमादार हा वॉर्डचा राजा असतो. चावीवाला त्याचा दिवाण असतो व वॉर्डर त्याचे सेनापति असतात आणि कैदी बिचारे गुलाम असतात असें जर थोडक्यांत वर्णन केलें तर वस्तुस्थितीला फारसें सोडून होणार नाहीं. जेलर सुपरिंटेंडेंट यांच्यापर्यंत कैद्यांचा फारच थोडा संबंध येतो, सर्व कर्तुम् अकर्तुम जमादार. जमादारानें मनांत आणलें तर कोणत्याहि कैद्याचें त्याला कांहींहि करतां येईल. अशी विलक्षण सत्ता हातीं असतांसुद्धां जमादार शक्य तोंपर्यंत कैद्यांशीं सरळपणानें वागतात आणि साहेबांकडे

रिपोर्ट करण्यापलीकडे ते कसलाच कायदा आपल्या हातांत घेत नाहींत. हवालदार, जमादार, सुभेदार असें त्यांचे हुद्दे आहेत पण सारे 'किल्लीछाप'. सुभेदाराचा युनिफॉर्म जरा निराळा असतो. जमादारासारखी त्याची अर्धी विजार नसून सबंध पँट असतें आणि कमरेस पट्टा नसतो. ऑफिसमध्येंहि कांहीं कारकून आहेत. त्यांत एक सोडून बहुतेक ब्राह्मण असावेत असें वाटतें. कारकुनांना मात्र पगार भक्कम आहेत. त्यांत 'रॅशन' वरल्या कारकुनाला कैद्यांच्या तोंडून फार शिव्या बसतांना ऐकूं येत. जराशी डाळ किंवा रोटी बिघडलेली असली कीं त्यांनीं 'रॅशन' वरच्या कारकुनाला शिव्या द्यावयाला सुरवात केलीच. कायद्याप्रमाणें जेवढें तेल मीठ मसाला भाजींत पडावयाला पाहिजे तितका पडत नाहीं अशी कैद्यांची कुरकुर असते आणि डिसेंबर [ १९२६ ] महिन्यांत कांहीं कांहीं वेळीं अशी भाजी येत असें कीं तिचें वर्णन करूनहि समजणार नाहीं ! पण जानेवारीपासून भाजी सुधारली होती. साध्या कारकुनालासुद्धां त्या कैद्यांच्या वसाहतींतील आपण कोणी तरी विशिष्ट असल्याचें वाटत असावें. कारकुनांना आणि डॉक्टरांना सर्व कैदी 'दादा' या नांवानें हांक मारीत असतात. मी देशाचे दुष्मन् केसमध्यें अपीलांत सुटलों होतों पण १५३ [ अ ] च्या खटल्यांत माझा जामीन पूर्वीच घेतला आहे हें रीतसर जेल ऑथॉरिटीजना कळल्याशिवाय मला सोडतां येत नव्हतें. अर्थात् मि. स्लेडन यांचें कोर्टांतून जामीन पटल्याबद्दलचा लखोटा घेऊन श्री. बाबुराव जेधे आले. आतां आम्हांला सोडणें प्राप्त होतेंच, पण तिथेंच जेलरसमोर दोन कारकुन [ ब्राह्मण असावेत ] लखोटा सीलबंद नाहीं म्हणून कुरकुर करूं लागले. जेलरसाहेबांनीं अर्थात् त्याकडे लक्ष्य दिलें नाहीं. दुसऱ्या खेपेसहि अशीच गंमत उडाली. १५३ ( अ ) च्या वेळेस जेव्हां आम्ही सुटण्याकरतां ऑफिसमध्यें आलों तेव्हां एक ब्राह्मण कारकून——मग त्यांना मी सुटतों हें समजून काय वाटलें कोण जाणें—उद्गारले——

कारकून——आतां पुढें काय करणार ?

मी——पहिलाच धंदा.

( पुढें गृहस्थ कांहीं न बोलतां एकाद्या हॅबिच्युअल कैद्याला जसें दच-कतात तसाच दचकून गप्प बसला. ) जेलरसाहेबांनीं, तुम्हीं नेहमीं येतां, आतां येऊं नका, असें सांगितलें. तिथें दोन ब्राह्मण कारकून आतां मी काय उत्तर देतों हें ऐकण्याकरतां अगदीं कान टवकारून होते.

'मी पुन्हां केव्हांतरी येणारच आणि मला माझ्या समाजाकरतां यावेंच लागणार' हें मजकडून त्यांना उत्तर मिळालें, यावर 'संकटांत न सांपडाल अशा तऱ्हेनेंच कर्तव्य करा' असें म्हणून जेलरसाहेबांनीं आम्हांला निरोप दिला. तेवढे वरचे ब्राह्मण कारकून सोडून प्रत्येक ब्राह्मणेतर वॉर्डर, कैदी, जमादार, सुभेदार मी सुटलों म्हणून आनंद व्यक्त करीत होता. 'साहेब, ओळख असूं द्या' असें अंमलदार म्हणे तर 'महाराज, जब सुटेंगे तब जरूर मिलेंगे' असें कैदी म्हणत. पण सुटण्याच्या वेळीं मनुष्य अति गडं-बडींत असतो. तो सगळ्यांच्या म्हणण्याला विमनस्कतेनें नुसतें

हो हो

म्हणत असतो.

जेलमध्यें एक 'शिटी' होत असते. ऑफिसरनें शिटी वाजवली कीं भराभर शिट्या वाजूं लागतात आणि सर्व कैदी एकदम बंद करतात: ही शिटी केव्हां वाजेल याचा नेम नसतो. शिटी वाजली कीं धांवपळ सुरू होते. फर्जीत गेलेले अमलदारसुद्धां अंगावर असतील त्याच कपड्यावर पट्टा व रायफल घेऊन येतात. युनिफॉर्म नसल्यामुळें त्यांचीं तीं रायफल व पट्टा शिमग्यांतल्या सोंगासारखीं दिसूं लागतात. चोहोंकडले कैदी बंद केल्याच्या शिट्या आल्या कीं टोटलच्या दोन घंटा वाजतात. या अलार्म शिटीच्या वेळींच जेलची खरी व्यवस्था दिसून येते.

जेलमध्यें देण्यांत येणारी फटक्याची शिक्षा कशी देतात ही आपल्याला कल्पना नसते. माझ्या सेलच्या दारांत बसलें कीं फटके कसे देतात हें पहावयास कधीं कधीं सांपडत असे. लग्नमंडपांत हंड्या, झुंबरें लावण्या-करतां जसें उंच स्टूल किंवा घडवंची असते त्याप्रमाणें लांकडाचा एक भक्कम

सांचा असतो. त्या घडवंचीवर आरोपीला पालथा बांधून त्याचीं सर्व वस्त्रें काढून घेतात आणि त्याच्या नितंबभागावर हुकुमाप्रमाणें वॉर्डरकडून वेताच्या छड्या मारतात. एक फटका बसला कीं, आरोपी ओरडूं लागतो. कित्येक वेळेला ऐकणाराचें हृदय विह्वल होईल अशा करुणास्पद आरोळ्या ऐकूं येतात. आमचा मुक्काम तेथें असतां या आरोळ्या पुष्कळ वेळां कानावर आल्या. फांशीच्या शिक्षेविषयीं बाहेरच्या अडाणी समाजांत निरनिराळ्या अफवा असतात. आमच्या वॉर्डच्या भिंतीपुढेंच

## फांशी देण्याची जागा

होती. फांशीचें दार नेहमीं बंद असल्यामुळें आंत काय प्रकार आहे तें फांशीं जाणाऱ्याला किंवा देणाऱ्यालाच ठाऊक ! फांशीचे आरोपी 'फांशी गेट' नांवाच्या बराकींत ठेवण्यांत येतात. फांशीच्या आरोपीला खोलीबंद ठेवतात. एक फांशीचा आरोपी जेव्हां वजन करण्याकरतां आणीत तेव्हां त्याच्या हातांत 'हातबेड्या' असत. त्याला सायंकाळीं जरा कंपाऊंडमध्येंच फिरावयास मोकळीक दिली तरीहि त्याच्या हातांत 'हातबेड्या' घालीत असत, असें वॉर्डरांच्या बोलण्यांतून मला समजलें. फांशीच्या आरोपीला इतर कैद्यांप्रमाणें काथ्याचें तरट न देतां, चटई देतात व जस्ताच्या 'थालीपाट' ऐवजीं मडक्याचीं भांडीं देतात. त्यानें गळफांस घेऊन किंवा थालीपाट डोक्यावर आपटून आत्महत्या करूं नये म्हणून ही खबरदारी घेत असावे. पण त्याला जोंपर्यंत दगडी भिंतीच्या खोलींत कोंडलें जातें तोंपर्यंत भिंतीवर धडक घेऊन त्याला आत्महत्या करतां येईल. पण असल्या आरोपींना दगडी भिंतींत न ठेवलें तर ते निसटूनहि जातील. फांशीच्या गुन्हेगाराला मागेल तें खावयास मिळतें असें आपण विशेषतः म्हाताऱ्या लोकांच्या तोंडून ऐकतों, पण तसें कांहीं एक नसून जें इतर कैद्यांना देतात तेंच अन्न त्यांना देण्यांत येतें. मात्र त्यांचा 'भत्ता' एका वॉर्डरनें ऑफिसरपुढें जाऊन खाऊन दाखवून 'पास' केल्याशिवाय देत नाहींत. जुन्या दंतकथांतून राजाचें अन्न हुजऱ्यानें खाऊन दाखविल्याशिवाय राजा खात नसे असें आपण ऐकतों. त्या राजाप्रमाणें विषप्रयोगाच्या भीतीनें हा भत्ता 'पास'

करण्याचा प्रकार असावा. फांशी सकाळीं देत असतात. सप्टेंबर माह-न्यांत मी तेथें असतांना एक फांशीवाला फांशीं जाणार होता. सकाळीं साडेसाताचा सुमार असेल, आम्हांला खोल्यांतून बंद केलें गेलें. कारण त्या वेळीं त्याला फांशी द्यावयाचें होतें. त्या दिवशीं माझ्या बराकींतल्या कैद्यांनीं 'कंजी' घेतली नाहीं. एक मनुष्य मरतो आहे म्हणून त्यांनीं त्यांच्या दृष्टीनें दुःख प्रदर्शित केलं. मी अगोदर कंजी घेऊन पिऊनहि बसलों होतों. एक पठाण कैदी म्हणाला 'क्या मास्टरभाई, तुम कंजी खलास किया ?' मी कंजी अगोदरच प्यालेलों असल्यामुळें त्यालाहि कांहीं बोलण्यास जागा नव्हती.

जेलमधल्या शिक्षांपैकीं कंजीरोटी व कंजीक्लॉथ वगैरे शिक्षा आहेत. 'कंजीरोटी' म्हणजे 'रोटींत मीठ' घालून खावयास द्यावयाची, त्याला भाजी देत नाहींत. ही रोटी साध्या रोटींतून ओळखतां यावी म्हणून त्यावर थालीपीठासारखीं बोटें रोवलेलीं असतात. 'गंजीक्लॉथ' म्हणजे तरटाची चड्डी, तरटाची बंडी आणि तरटाची टोपी. आमच्या एका भिसीवाल्याला ही शिक्षा मिळाली होती. हा 'खाकी' ड्रेस घालून तो आला म्हणजे कींव तर येत असेच पण हंसूंहि येत असे. गुळाची ढेंप जशी तरटानें मढवतात तसा हा तरटांत ठेवलेला ! तलमसुताच्या कपड्याला सोकावलेल्या 'चोर-भाई'ना हा गंजीक्लॉथ अगदीं योग्य आहे. म. गांधींच्या खादीचें महत्त्व ज्यांना पटत नसेल त्यांना एक वेळ तुरुंगांत जाण्याचा प्रसंग याव-म्हणजे बाहेर खादीची संवय झाली तर तुरुंगांत किती सोपें जाणार आहे हें त्यांचें त्यांनाच समजेल. राजर्षि शाहुमहाराजांच्या वेळीं मला पाहिजे तेवढे पैसे मिळत असल्यामुळें मला सरदारी थाटण्याची मोठीच खोड लागले होती. केशवराव जेधे यांच्या साधेपणामुळें माझा हा उंची कपडे वापर-ण्याचा जडलेला रोग नाहींसा झाला. कारण एक धनाढ्य गृहस्थ, पाहिजे तेवढ्याच कपड्यावर दिवस काढून, सार्वजनिक कामांत सारा पैसा खर्चीत आहे आणि मी दिवसांतून तीन कोट बदलीत आहें याची माझी मला लाज वाटून कोल्हापूरला नखशिखांत थाटांत रहाण्याचें मला जडलेलें

नाहींसें झालें आणि त्यामुळें तुरुंगांतला तो पावणेदोन वस्त्रांचा युनिफॉर्म चढवतांना तो माझ्या अंगाला रुतला नाहीं कीं खुपला नाहीं. म. गांधींच्या खादी चळवळीमुळें लँकेशायर लाजणार कीं मँचेस्टरला मरणार हें बाजूला ठेवून नुसत्या बहुतेक धडाडीच्या सार्वत्रिक कार्यकर्त्यांच्या नशीबीं लिहिलेला कारागृहवास हिशेबीं धरला तर खादीहि अवश्य वापरावी असें वाटूं लागतें. खादी हा पहिला पाठच म्हणतात ! शाहुमहाराजांच्या आश्रयाखालीं, सार्वजनिक चळवळीला मनुष्यस्वभावाची माहिती आणि निर्भयता या अनेक गोष्टी जरी मला लाभल्या, तरी कसलेहि श्रम न करतां खर्च होतील तेवढे पैसे लहान वयांत माझ्या हातीं येऊं लागल्यामुळें ती सार्वजनिक कार्यांत घातक होणारी डामडौलाची संवय जडलेली होती. पण इंग्रज सरकारच्या खास आश्रयाखालीं ती पार चिरडून गेली याबद्दल सरकारचे आभारच मानायला पाहिजेत. राजगृह आणि कारागृह या दोन गृहांत जेवढें अंतर आहे तेवढें कोणत्याहि दोन गृहांत नसेल, पण दोन्ही गृहांतून वावरण्याचा सुयोग आम्हांला लाभल्यामुळें त्याचा माझ्या पुढल्या आयुष्यावर चांगलाच परिणाम होईल. एके काळीं वर्षानुवर्षे मांसाच्या निरनिराळ्या राजेशाही पक्वान्नावर चटावलेली जीभ मिसीवाल्याचा ‘ भत्ता ’ मिटक्या मारून फस्त करून टाकीत असे; त्यामुळें मला आतां मनापासून भरंवसा वाटूं लागला आहे कीं, या जीवनसंग्रामांत मजवर कसलाहि खडतर प्रसंग आला तरी त्यांतून मी निभावून जाईन. तुरुंगांत जाण्याच्या वेळीं आपलें धैर्य खचेल कीं काय ही पूर्वी एकादे वेळीं तरी मनांत शंका आल्यावांचून रहात नसे. पण आतां एकदां सोडून दोनदां अनुभव आल्यामुळें त्याचें कांहीं वाटत नाहीं असें अनुभवाला येऊन चुकलें. हा माझ्या दृष्टीनें माझा फारच मोठा फायदा झाला. तुरुंगांत १०८ दिवस काढल्यामुळें माझें दोन वर्षे तरी पूर्वीपेक्षां जास्त आयुष्य वाढलें आहे.

थंड पाण्याचें स्नान किती हितावह असतें हें तुरुंगांत जाऊन शिकण्याचा आमचा योग होता. पाण्याचा नळ जमिनीपासून फार तर एक फूट उंच असेल पण त्याच नळाचें पाणी एक फूट खोलीच्या, दीडएक फूट रुंदीच्या आणि

सुमारें सातआठ फूट लांबीच्या हौदांत पडत असे. त्या हौदाला दुसऱ्या बाजूनें पाणी जाण्याकरतां एक वाट ठेवली होती. ती कपड्याची बोळ घालून बंद केली कीं हौद भरे, मग त्या हौदांतून 'पाटा' नें भराभर पाणी घेऊन अंघोळ करतां येत असे. हौदाच्या दोन्ही बाजूनें उतरती फरशी असल्यामुळें कपडे धुण्यालाहि स्वच्छ जागा असे. पहिल्या दिवशीं जेव्हां आम्हांला रिठ्यानें [ कारण त्यावेळीं साबण मिळाला नव्हता ] ती आमची स्वातंत्र्यमहाविद्यालयाचीं महावस्त्रें धुतां येईनात, तेव्हां शीख कैद्यांनीं काथ्या घेऊन फरशीवर रिठ्यांचा फेस कसा करावयाचा व मग कसे कपडे धुवायाचे हें शिकविलें. प्रथम मी बंडी भिजवून पसरली आणि त्यावरच रिठे चोळूं लागलों होतों. पुढें जेव्हां साबण आला तेव्हां आमचा चांगलाच जम बसला. जेलमध्यें हातांत साबण आला म्हणजे सोन्याची चीप हातांत येऊन जो बाहेर आनंद वाटणार नाहीं असा आनंद वाटूं लागतो. जेलच्या नियमाप्रमाणें दर तीन महिन्याला कैद्यांना

## १२ दिवस माफी

मिळत असते. वॉचमनला १४ दिवस व वॉर्डरला १८ दिवस. शिवाय कपडे व थालीपाट स्वच्छ ठेवलें तर तीहि एक ३ तीन दिवस माफी असते. या माफीकरतां कैदी थालीपाट तोंड दिसेल इतकें स्वच्छ करून ठेवतात. वर्षाला चांगल्या वागणुकीबद्दल आणखी स्पेशल २० दिवस माफी असतेच. कारकुनी काम करणाऱ्यांना म्हणजे ज्यांना रविवारींहि काम पडतें त्यांना स्पेशल माफीहि देतात. माझ्या पुस्तकावर माफी धरून दोन महिने अगोदर सुटण्याची तारीख दिली होती. ज्यांची माफी धरून निमी शिक्षा झाली आहे त्यांना कमिटीपुढें उभें करतात आणि कमिटीनें पास केलें म्हणजे त्यांना सोडून देतात. माझ्या देखत असा निम्या शिक्षेवर एक ग्रीक व एक मोगल कैदी सुटला. मात्र ही कमिटी मोठ्या शिक्षावाल्यांकरतां असते. ही कमिटी सहा महिन्यानें एकदां येतें. जन्मठेपीच्या कैद्यांना त्यांना जर अंदमानांत पाठविलेलें नसलें तर माफी धरून चौदा वर्षांनीं सोडतात. आपल्याला बाहेर चौदा वर्षें म्हणजे फारच मोठीं वाटतात पण तेथें जेलमध्यें समदुःखी बरेच

अस-

त्यामुळें कांहीं वाटत नाहीं. येरवडा जेलमध्यें असे कायमचे वसाहतवाले बरेच आहेत. जन्मठेपीच्या कैद्यांच्या पायांत पहिले सहा महिने संकलबेडी असते असें वॉर्डर म्हणत. ज्यांना ६ महिन्यांच्यापेक्षां कमी शिक्षा आहेत त्यांना माफी मिळत नाहीं.

३ महिने शिक्षा व ३०० रुपये दंड, दंड न दिल्यास ३ महिने शिक्षा अशी एकंदर ६ महिने सजा होते. परंतु त्याच्या बुकावर "माफीस पात्र नाहीं" असा शेरा मारलेला असतो. येण्याचा व जाण्याचा असे दोन महिने सोडून आपल्याला मिळणारी माफी दर महा ४ दिवसांप्रमाणें मोजतां येतें. मी दुसऱ्या खटल्यांत नोव्हेम्बर १२ तारखेला गेलों आणि ५०० रुपये दंडाबद्दलचे दोन महिने धरून ता. ११ जुलै १९२७ सालीं सुटणार होतों. दोन्ही खटले मिळून अपीलांत एकांत निर्दोषी व एकांत कमी शिक्षा झाली नसती तर आमची स्वारी

**१९२८ सालीं ऑगष्टमध्यें**

सुटली असती. पण प्रत्येक खटल्यांत शक्य तोंवर आणि शेंवटपर्यंत झगडण्याचा आमचा निश्चय असल्यामुळें आम्हांला 'देशाचे दुष्मन्' केसमध्यें यशहि आलें व १५३ (अ) मध्यें भोगलेल्या शिक्षेवर दंडावर 'अपीलांत मोकळें होतां आलें.

ब्राह्मणेतर चळवळीमध्यें तुरुंगांत जाणारे आम्हीं पहिलेच व आम्हांवरहि हा पहिलाच प्रसंग असल्यामुळें सर्व ब्राह्मणेतरांचें आमच्या खटल्याबरोबरच आमचें धैर्य कितपत टिकतें याकडे लक्ष्य लागलें होतें. फुले प्रकरणापासून चळवळीला तोंड लागलें. फुले प्रकरणामुळेंच देशाचे दुष्मन् पुस्तक निघालें. सतत वर्ष दोन वर्षे कोर्टांतून अनुभव नसतां झगडावें लागलें आणि त्यामुळें पैशाचा अतोनात चुराडा उडाला. आमचे वकील खटल्याचें महत्त्व पाहून फी करतां अडवीत नसत आणि ज्या कामाकरतां एरव्हीं त्यांनीं हजारांनीं रुपये घेतले असते तेच आमच्या केसमध्यें आम्ही देऊं त्या पैशावर भागवून घेत. ब्राह्मणेतर पक्षामध्यें इतर पक्षाप्रमाणें कांहीं कुचर, कांहीं

दीर्घद्वेषी, कांहीं परोत्कर्षासहिष्णु लोक मनुष्यस्वभावानुसार असावयाचेच. जोतीराव फुल्यांच्या वेळेपासून जहाल, मवाळ, टवाळ, गबाळ अशा सर्व पक्षाचें एकत्र झालेले ब्राह्मण जुटीनें असें आजपर्यंत कधींच धांवून आलें नव्हतें. सत्यशोधक चळवळ मारण्याकरतां सर्व ब्राह्मण एकजीव होण्याचा हा पहिलाच प्रसंग आणि अशा वेळीं जर खरोखरच्च ब्राह्मणांचें पुढारी मुत्सद्दीपणानें वागले असते तर सत्यशोधक चळवळीवर त्याचा थोडाफार परिणाम झाल्यावांचून राहिला नसता; परंतु सत्यशोधकांचें भाग्य म्हणूनच कीं काय ब्राह्मण पुढाऱ्यांना सरकारी कोर्टकचेऱ्या पहाण्याची आणि अधिकाऱ्याकडे डेप्युटेशनें नेण्याची बुद्धि सुचली आणि त्यामुळेंच सत्यशोधकाचें दहा वर्षांचें कार्य एका वर्षांत पार पडलें. मी आणि माझे मित्र रा. केशवराव जेधे किंवा ब्राह्मणांच्या आटोपशीर भाषेंत बोलायचें म्हणजे

## जेधे-जवळकर

असा आम्हां दोघांवर एक विशिष्ट कंपू म्हणून ब्राह्मणेतर पक्षांतून बाजूला काढून शाब्दिक हल्ले करण्याचे प्रयत्न होत असत. परन्तु त्यांना ही त्यांची चूक लवकरच कळून आली. अर्धकच्चे किंवा ज्यांना स्वतःच्या प्रतिष्ठेपुढें कांहीं दिसत नाहीं किंवा ' जेधे–जवळकरां 'ची वैयक्तिक स्पर्धा करणारे जे कोणी ब्राह्मणेतर होते त्यांना ही संधी उत्तम सांपडली होती. जेधे–जवळकरांना–निदान नुसत्या जवळकरांना तरी ब्राह्मणेतर पक्षांतून नामोहरम करण्याची उत्तम पर्वणी आली होती. ज्यांना ब्राह्मणेतर पक्षाचें ध्येय तर राहूंद्याच पण नांवसुद्धां पसंत नाहीं अशी ख्याती असलेले ' अपघातजन्य पुढारी ' वर्तमानपत्राकडे धांवा घेऊं लागले. ' नाहीं हो नाहीं आमचा जेधे–जवळकरांशी मुळींच संबंध नाहीं ' असें भीतीनें म्हणा किंवा मुद्दाम म्हणा पण प्रसिद्ध करूं लागले. गरीब बिचारे पोटार्थी तरूण या बड्यांच्या होला हो ठोकून वाहत्या गंगेंत हात धुवून घेऊं लागले आणि असा कांहीं विलक्षण काळ आला कीं, जो चळवळीच्या नांवावर कातडी बचावून उघड उघड तुंबडी भरतो तो शहाणा पुढारी आणि जो पदराला खार लावून चामडीहि लोळवून घेतो तो बेवकूफ ! ज्यांना जन्मांत स्वार्थत्याग, धैर्य किंवा सार्वज-

निक काम याची स्वप्नांत कल्पनाहि नाहीं किंवा असून तिचा फायदा घेण्यापेक्षां तिचा दुसरा उपयोग माहीत नाहीं; जे ब्राह्मणेतर पक्षाचे श्राद्ध घालण्यासहि तयार होतील तेच हरीचे लाल अशा आणीबाणीच्या वेळीं कैवारीपणाचें मोठें सोंग घेऊन पुढें येऊं लागले. इथून पुढें चळवळीमध्यें धैर्यानें पडणाऱ्या

## ब्राह्मणेतर तरुणांना

माझ्या अनुभवाचा झाल्यास उपयोग होईल म्हणून मुद्दाम माझी इच्छा नसतां या गोष्टी मला उजेडांत आणाव्या लागत आहेत. माझ्यावर झालेले हल्ले किंवा माझा निःपात करण्याकरतां झालेले प्रयत्न जर उजेडांत आणले तर पुढल्या तरूण वीरांना त्यापासून खात्रीनें फायदा होईल. प्रसंग कसलाहि असो, प्रतिस्पर्धी कितीहि प्रबळ असो जनता मर्दावर फिदा असते हें प्रत्येक तरुणानें लक्षांत ठेवावें. ह्या मर्दपणाचा आपण नेकीनें देशो-द्धाराकरतांच जर उपयोग करीत असलों तर त्याला जनता कधींहि नजरे-आड करीत नाहीं हा अढळ विश्वास ठेवावा. मधल्या ढगामुळें कदाचित काळ लागेल, पण शेवटीं यश हें येणारच. बाकीचे कोणीच काम करीत नाहींत मग आपलेंच काय घोडें अडलें आहे असा स्वप्नांतसुद्धां विचार शिवूं देऊं नये. कारण बाकीचे कोणी करीत नाहींत म्हणून तर आप-ल्यावर दसपट जबाबदारी पडत असते. बाकीचे सगळेच कार्य करीत असल्यावर मग आपल्या कामाची तरी जरूर काय ? आजपर्यंत ब्राह्मणेतर चळवळीला

## सरकारशीं विरोध

हा मुळींच माहीत नव्हता त्यामुळें सरकारच्या शब्दावर कसरत करणारे लोक पुढारी होऊन बसले होते. पण गव्हर्नरांच्या मानपत्रालाच विरोध करून श्री. जेधे यांनीं ब्राह्मणेतर पक्षाच्या नव्या युगाची सुरवात केली आहे, आणि आजच्या ब्राह्मणेतर पक्षाची सरकारनें केलेली संभावना लक्षांत घेतली तर श्री. जेधे यांनीं केलें तेंच योग्य केलें आणि नुसत्या मानपत्रांना विरोधच काय पण सरकारचा निषेध करण्यासाठींसुद्धां खलिते रवाने होत आहेत. कांहीं

दा. क्र. ३११२

दिवसांनीं असा योग येईल कीं, राजकीय गुलामगिरीच्या पाळेंमुळें खणण्यांत प्रत्येक सत्यशोधक गुंगलेला दिसेल. पुढाऱ्यांत कांहीं मेल गाड्या असतात आणि कांहीं माल गाड्या असतात. दोन्ही रुळावरूनच जायच्या पण वेगांत फरक असतो. तेव्हां आपण जें करतों तें लोकापवादास पात्र झालें तरी तें देशाच्या हिताचें आहे आणि आपला स्वार्थ साधण्याचा आपण प्रयत्न करीत नाहीं अशी मनाची पक्की खात्री असल्यावर मग कोणाचीहि पर्वा करूं नये. ‘ पुढारपण ’ हें एक मोठें प्रलोभन आहे; तें ज्याला भगीरथ परिश्रमानें प्राप्त झालेलें असतें तो त्याचा उपयोग कधींहि उधळ्यासारखा करीत नाहीं. पण कोणाकोणाला निव्वळ अपघातानें पुढारपण लाभत असतें. असले अपघातजन्य पुढारी आपलें बेगडी वर्चस्व टिकावें म्हणून हरप्रकारच्या युक्त्या लढवित असतात आणि स्वपक्षाच्या तंगड्याच तोडून न थांबतां त्याच्या नरडीवरहि स्वार्थाचें नख रोंवल्याशिवाय राहात नाहींत. कांहीं कांहीं पुढारी म्हणविणारे ध्रुव परोपजीवि असतात. म्हणजे ज्यांच्यामुळें पुढारपण स्थिर होईल अशाच लोकांच्या मतावर यांचा भाता सुरूं असावयाचा. कांहींचे चळवळीचा फायदा कसा घ्यावा यांत सारें धोरण घुटमळून पडलेलें असतें, नवीन किंवा ज्याला खरोखरीच कार्य करावयाचें आहे अशा जुन्याहि समाजसेवकानें एक गोष्ट नेहमीं लक्षांत ठेवावी. आपल्या धैर्याचा, आपल्या औदार्याचा व स्वार्थत्यागाचा उपयोग एखाद्या मायावी गोडबोल्या स्वार्थी माणसाच्या अघोर तृष्णेस होऊं नये. चळवळीमध्यें फायदा घेण्याकरतांच ज्यांना यावें लागतें असले स्वार्थी लोक प्रथम पोटार्थी माणसांना वश करून घेत असतात. सेनापति पासून ते दुजऱ्या भाटापर्यंत यांना रिक्रूट मिळतात. मग त्या रिक्रूटाच्या करवीं पहिल्या जूटींत फूट उत्पन्न करण्याचा प्रयत्न करीत असतात आणि पैशामुळें त्यांना अपयश येतेंच असें ठरलेलें नाहीं. या बाबतींत माझा अनुभव अत्यंत कटु आणि अंगावर शहारे आणणारा आहे. दाही दिशांना संकटांनीं ग्रासून टाकलें आहे. उद्यां काय होईल याचा आज नेम नाहीं अशा भयंकर वेळीं सच्च्या दिलाचे लोक आपण मोजूं लागलों म्हणजे निराशेनें क्षणभर हृदयाला धक्का बसल्या-

वांचून राहात नाहीं. एकाद्या साध्या गोष्टींत जर हा अनुभव तर मातृभूमीकरतां कसल्याहि संकटांत उडी घालण्यास हे लोक कसें तयार होतील अशी खंत वाटूं लागते. पुढारी म्हणविणारे किंवा त्यांच्याकडून एकादा अर्धा तुकडा मिळेल या आशेनें गोंडा घोळणारे दगलबाज लोक आपआपले डाव साधूं लागतात. दुसऱ्याच्या सरणावर आपला भात शिजवून घेण्याची प्रवृत्ति जोंपर्यंत आम्हां हिंदु लोकांत आहे तोंपर्यंत गुलामगिरींत खिचपतच पडावें लागणार काय ? संकटांत सांपडलेल्या माणसाला आम्ही जास्त छळलें नाहीं हे मोठे उपकार केले असें निर्लज्जपणानें म्हणण्यास देखील असले लोक कचरत नसतात. सरकारी लोखंडी कड्याच्या तुरुंगाची मला भीति वाटली नाहीं. ब्राह्मणांच्या सभेंतून होणारा शिव्यांचा वर्षाव ऐकून मला खदखदां हसूं येत असें पण स्वपक्षांतील पोटार्थी पुढाऱ्यांच्या वर्तनांतला पक्षद्रोही स्वार्थ मात्र खेद आणीत असे. मला या सर्व केसीसमध्यें सबंध ब्राह्मणेतरांकडून मदत झाली आहे, पुढाऱ्यांकडूनहि झाली आहे; भावानें म्हणा भीतीनें म्हणा पण कोणत्याहि ब्राह्मणेतराला माझ्या इतका एकमुखी आणि एकसूत्री पाठिंबा मिळाला नाहीं याबद्दल सर्वांनी मला आभार मानले पाहिजेत. पण हा पाठिंबा मिळण्यास खरें कारण मी नसून ज्या एखाद्या अर्ध्या ब्राह्मणेतरानें त्या वेळेस डाव खेळण्याचा उपक्रम आरंभला ते आहेत. ब्राह्मणसमाजाशीं मी झगडत आहे आणि अशा ऐन बाणीच्या प्रसंगीं माझे पाय तोडण्याचा आपल्याच लोकांकडून प्रयत्न होत आहे ही गुणगुण ब्राह्मणेतर जनतेच्या कानांवर गेल्यावांचून राहिली नाहीं आणि जनतेचा भरभक्कम पाठींबा आहे अशी कांहीं पुढाऱ्यांची खात्री झाल्यामुळें नाक डोळे मुरडीत कां होईना आमच्या हातांत हात घालणें त्यांना भाग पडलें.

## जेधे-जवळकरांशीं

आमचा संबंध नाहीं म्हणविणारे वीर जेधे जवळकरांकरतां आम्ही अमुक अमुक केलें म्हणून आम्हांला मतें द्या असें सर्टिफिकेट जनतेला दाखवूं लागले हा अद्‌भुत रम्य अनुभव पुढल्या पिढीला खास उपयोगी पडेल. आपण आपले लोक आहेत त्यांच्यावर नेहमीं प्रेमच करीत राहावें. त्यांनीं जरी आप-

त्याला झिडकारलें तरी मनांत कसलेंहि कपट न ठेवतां त्यांना ताळ्यावर आणण्याचा प्रयत्न करावा पण त्या प्रयत्नांत खुनशीपणा नसावा; सामान्य माणसें असतात तीं अशा वावटळीच्या वेळीं इतकीं कांहीं बावचळतात कीं, त्यामुळें त्यांचें हसूं येऊं लागतें. देशासाठीं बेफाम बनणाऱ्या तरुणानों ! कोणाच्या आधारावर मात्र अवलंबून बसू नका! स्वतःच्या हिंमतीवर विश्वास ठेवा ! आत्मयज्ञ केल्यावर आपल्या मागें किती येतील याची वाट पाहूं नका कारण त्यांत तुम्हांला निराश व्हावें लागेल. आपल्याला जें वाटतें पटतें त्याकरतां आपल्याला जें करणें प्राप्त आहे ते स्वतःच्या जीवावर बजवा.

---

...का ग्रंथ संग्रहालय, ठाणे. ...
अनुक्रम ............ वि: ........
...... नों. दि: ........

सर्व तऱ्हेचीं शालोपयोगी मराठी, इंग्रजी व गुजराथी पुस्तकें,

वेदांतपर ग्रंथ, नाटकें, कादंबऱ्या, एक्सरसाइजेस,

ड्रॉइंग बुकें, कम्पास बॉक्सेस व ड्रॉइंगला

लागणारे जिन्नस मिळण्याचें ठिकाण

ल...

प्रार्थना... ...बई.

REFBK-0003322

REFBK-0003322

म. ग्रं. ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. 3322
... (स्थळ प्रत)